[redacted]. स. ठाण
विषय निबंध
न. नं. २८८
[redacted]

# श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर

यांचीं

# भाषणें.

'जैनेन्द्र' प्रिंटिंग प्रेस कोल्हापूर.

REFBK-0001750

सन १९२० इसवी.

ग्रंथ संग्रहालय
नि. ३००
ता.........


# श्रीमन्महाराज शाहू छत्रपति

## सरकार करवीर

यांचीं

# भाषणें.

'जैनेन्द्र' प्रिंटिंग प्रेस कोल्हापूर.

सन १९२० इसवी.

ग्रंथ संग्रहालय
दा. क. ९७५०

REFBK-0001750

सं. नि. ३२८

१०७५०

### खामगांव येथील अकरावी

# मराठा शिक्षण परिषद.

## अध्यक्ष श्री. महाराज शाहू छत्रपति सरकार, करवीर यांचें भाषण.

खामगांव, ता० २७।१२।१७

मिस्तर स्टॅन्डन, भगिनींनों, व बंधूंनों,

मराठा समाजानें आजच्या प्रसंगीं हजर राहण्याबद्दल मजला मनोभावानें आमंत्रण केलें, याचा मला अतिशय बहुमान वाटत आहे. मी एथें आज महाराजा या नात्यानें आलों नाहीं, परंतु एक मराठा असें समजूनच आलों आहे. आपण सर्व मजला आपल्यापैकींच एक, मानाल, अशी आशा आहे. आपण मला हवे तर शिपाईगडी म्हणा, अगर शेतकरी म्हणा, किंवा जे कांहीं रुचेल ते म्हणा. माझ्या कुलपरंपरेच्या वहिवाटीस अनुसरून आपणांपैकीं रणशूर, मला शिपाईगडी मानतील, आणि शेतकरी असतील ते पाटील किंवा शेतकरी

असें मानतील. कार्यबाहुल्यामुळें अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत या परिषदेस हजर राहण्याचा मला निश्चय करितां येईना. परंतु आपणां सर्वांना एथें भेटण्याची बहुमोल संधि हातची दवडूं नये, असा मी निश्चय केला. माझें वडिलोपार्जित गांव वेरूळ येथून जवळच आहे. येथेंच माझ्या घराण्याचा पहिला उत्कर्ष ह्मणजे पाटीलकी वतन आह्मी संपादिलें. या वतनाबद्दल मला अद्याप अत्यंत आदर वाटत आहे, ह्मणूनच मी माझ्या स्वतःच्या मंडळीमध्यें एक शेतकरी व पाटील या नात्यानें आलों आहे. ह्मणून माझा आनंद द्विगुणित होत आहे. सद्गृहस्थहो, आमच्या समजापैकीं दोन सुप्रसिद्ध व्यक्तींचा उल्लेख कृतज्ञतापूर्वक करणें जरूर आहे. ते गृहस्थ ह्मणजे श्री. खासेसाहेब पोवार, व मि. खासेराव जाधव, हे होत यांच्याच अत्याग्रहामुळें मला एथें येणें भाग पडलें, आणि याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानितों मि. खासेरावसाहेब यांची कर्तबगारी, स्वार्थत्याग आणि अनेक बाबतींत दिसून येणारी हुषारी, हीं सुप्रसिद्ध आहेत तीं एथें सांगण्याची जरूरी नाहीं. आमच्यामध्यें त्यांनीं श्रेष्ठत्व मिळविलें आहेच. आणि जरी त्यांच्यामध्यें महत्वाकांक्षेचा अभाव, आणि नशीबावर हवाला ठेवण्याची थोडीबहुत प्रवृत्ति हे दोन दोष आहेत, तथापि ते आज कोणत्या दर्जाला पोंचले असते, याची कल्पना आपणच करावी. माझ्या मतें ते आज हिंदुस्थानांतील एक प्रमुख पुढारी आहेत, आणि त्यांची कर्तबगारी, बुद्धिमत्ता आणि समाजांतील दर्जा, यांबद्दल मला त्यांचा हेवा वाटतो. श्री.

खासेसाहेब, यांच्या अंगचा उत्साह आणि कर्तबगारी, या दोन गुणांमुळें ते जेथें जातील, तेथें त्यांची प्रशंसाच होईल. सरदारघराण्यांतील लोकांमध्यें, हें खरोखर भूषण आहे, आणि त्यांचेबद्दल मला फारच अभिमान वाटत आहे. त्यांच्या योग्यतेचे आणि कर्तबगारीचे आणखी थोडे तरी राजपुत्र आमच्यामध्यें निपजावेत, अशी माझी इच्छा आहे. शिक्षणानेंच आमचा तरणोपाय आहे, असें माझें ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याहि देशाची उन्नति झाली नाहीं, असें इतिहास सांगतो. अज्ञानांत बुडून गेलेल्या देशांत उत्तम मुत्सद्दी, व लढवय्ये वीर, कधींहि निपजणार नाहींत. ह्मणूनच सक्तीचें, व मोफत शिक्षणाची, हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतींत आमचा गतकाल, ह्मटला ह्मणजे, इतिहासांतील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीनें, विद्येचा मक्ता घेतला होता. मनु आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनीं, त्या त्या वेळेच्या, ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचिले, आणि कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यांत आले. त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ, आणि वेद हे सुद्धां वाचण्याची त्यांना मनाई होती. हिंदुधर्माशिवाय इतर कोणत्याहि धर्मानें अशा आंधळ्या व दुःखकारक परिणाम करण्याबद्दल प्रमुखता मिळविली नाहीं. गेल्या साठ वर्षांमध्यें ह्मणजे इ. स. १८५७ सालानंतर, प्रजावत्सल, ब्रिटिश सरकारानें सर्वांना सरसहा

शिक्षणाचीं द्वारें खुलीं केलीं आहेत, आणि त्यामुळें मला वाटतें, आह्मी बरीच प्रगति केली आहे.

स्वराज्य अशी ओरड चोहोंकडे ऐकूं येत आहे. आह्मी स्वराज्यास पात्र आहोंत, किंवा नाहीं, हाच एक अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. स्वराज्य आह्मास पाहिजे आहेच. त्या योगानेंच आमच्यांत चैतन्य उत्पन्न होईल. सार्वभौम ब्रिटिश सरकारांनींच, आमच्या मनांत स्वराज्याची कल्पना प्रेरिली आहे; आणि जिंकलेल्या लोकांच्या प्रगतीला, ते बिलकूल प्रतिकूल नाहींत. मनूप्रमाणें त्यांनीं प्रगतीला अडथळा केला नाहीं, याबद्दल आह्मी त्यांचे फार कृतज्ञ आहोंत, इतकेंच नव्हे, तर आमची प्रगति व्हावी, ह्मणून ते निरंतर उत्सुक असतात. स्वराज्यासारख्या अत्यन्त महत्वाच्या आणि व्यापक प्रश्नाचा सांगोपांग रीतीनें विवेचन करण्याचा आजचा प्रसंग नाहीं. तथापि या बाबतींत लॉर्ड सिडेनहॅमसाहेबां-प्रमाणेंच माझें मत आहे. ते माझे मित्र असून मी त्यांच्या गुणांचा चाहता आहे. लॉर्ड सिडेनहॅमसाहेबांचें असें मत आहे कीं, जोपर्यंत हिंदुस्थान जातिबंधनानें निगडित राहील, तोंपर्यंत स्वराज्यस्थापनेपासून मिळणारे संपूर्ण फायदे त्यांस घेतांच येणार नाहींत. यांना अशी भीति वाटते कीं, येथील सत्ता, उच्च वर्गाच्या हातीं जाईल. विचारांतीं माझें मत झालें आहे कीं, आमचीं सध्याचीं जातिबंधनें तोडून टाकण्याचा काळ येईलच येईल. आमच्या नैतिक आणि

सांपत्तिक प्रगतीच्या हिताकडे लक्ष देऊनच वरील स्थिति यावी, अशी माझी इच्छा आहे. जोंपर्यंत आमच्यामध्यें जातीजातींतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहेत, तोंपर्यंत आम्ही आपआपसांत झगडत राहणार, आणि आमच्या हितवृद्धीस अपाय करून घेणार. आमच्यांतील अंतस्थ कलह नाहींसे करण्यास आणि आम्हांला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरितां ही अनर्थकारक जातिपद्धति झुगारून देणें आम्हांला अत्यंत अवश्य आहे, हें आपल्या लक्षांत आलें असेलच. क्षत्रियांच्या निर्मूलनाविषयींच्या पौराणिक कथेचा येथें निर्देश करणें अप्रासंगिक होणार नाहीं, मराठे लोक आपल्यास क्षत्रिय म्हणवितात, हें आपणांस माहित आहेच. पांडवांच्या कालापासून ते लढवय्ये लोकांत प्रमुख आहेत. आमच्या क्षत्रिय कुलाचें निर्मूलन झालें आहे, असें आम्हीं बिलकूल कबूल करीत नाहीं. आमचा सध्याचा अगणित समाजच या गोष्टीला खोटें ठरवितो. एक वेळ नव्हे, तर एकवीस वेळ पृथ्वी निःक्षत्रिय केल्याचा पौराणिक कथेचा अर्थ, निराळ्या तऱ्हेनें लावितां येईल. शेतकी आणि लढवय्येपणा हे दोन्ही गुण नेहमीं एकत्र असतात; आणि शेतकरीवर्गाला तिसऱ्या वर्णाच्या हलक्या पायरीला पोंचविल्यामुळेंच ही निर्मूलनाची कल्पना अस्तित्वांत आली असावी; आणि तिचें खंडण वेळींच न झाल्यामुळें तिजवर विश्वास बसला असावा. अशा प्रकारच्या नेहमीं आढळून येणाऱ्या स्मृतींतील लेखांवरूनच क्षत्रियांचा प्रचंड समुदाय

नाहींसा झाला असावा, असें मानण्यांत आलें. त्यापुढील कालांत होऊन गेलेल्या लेखकांनीं एक पाऊल पुढें टाकून क्षत्रियांना वैश्यांच्या पायरीवरून ढकलून देऊन थेट शूद्रांच्या पायरीस आणून पोंचविलें. हा सर्व पक्षपाती समाजाच्या चळवळीचा परिणाम आहे. जगाच्या इतर भागांत, उदाहरणार्थ, जपान देशांत, जें कांहीं घडून आलें आहे, त्यावरूनही आमची जातिपद्धति मोडण्याची जरूरी आहे, असें माझें ठाम मत आहे. अशा प्रकारचा अवश्य फेरफार घडून आणणें हें आमचें ध्येय असावें. मराठा आणि ब्राह्मण यांनीं मला या कामीं पूर्ण पाठबळ दिल्याशिवाय, मला किंवा माझ्या दर्जाच्या कोणाहि मनुष्याला यश येण्याची आशा करणें कधीं तरी शक्य आहे काय? हल्लींच्या स्थितींत, आमचें ध्येय साध्य करण्यासाठीं जें कर्तव्य आह्मांस करावयाचें, तें, आमचा समाज सुशिक्षित करणें व त्याचीं मनें तयार करणें हें होय. ह्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाचा उलगडा करण्याचा हा फक्त एकच मार्ग आहे, ह्मणूनच प्रत्येक समाजानें आपल्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाकरितां झटणें अगत्याचें आहे. निरनिराळ्या समाजांतील लोकांना, शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीनें अनुसरित आहे, आणि माझ्या आयुष्याच्या पुढील कालांत तीच पद्धत सुरू ठेवण्याची माझी इच्छा आहे. निरनिराळ्या जातींना स्वतःची उन्नति, करून घेण्याच्या प्रयत्नांत, मी प्रोत्साहन, दिलें आहे, हें कळविण्याची मला

परवानगी असावी. मराठा जातींतील प्रमुख कुटुंबांना, मी याच दिशेनें मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. पुनः जरूरीची गोष्ट ही कीं, जातिपद्धतीच्या शृंखला, तोडून टाकण्याचें ध्येय, साध्य करण्याकरितां आणि परस्परांचीं मनें एक करणें असेल तर परशुरामास रामानें जिंकिलें तो राम क्षत्रिय होता, आणि परशुराम हा ब्राह्मण होता, असल्या प्रकारच्या गतकालीन ऐतिहासिक गोष्टी आह्मी साफ विसरल्या पाहिजेत. जर असल्या गोष्टींची आठवण आह्मी सदोदित ठेऊं लागलों, तर राम आणि परशुराम यांच्यासारखींच भांडणें आमच्यामध्यें चालू राहतील अशी मला खात्री आहे. हे जातिकलह, एकदांचे चिरकाल गाडून टाकले पाहिजेत. उच्च कुलामुळें, अथवा वतनदारपणामुळें, येणारा सामाजिक दर्जा, जगांत सर्व देशांत, व सर्व सुधारलेल्या समाजांत, प्रचलित आहेच. राष्ट्राची उभारणी करण्याच्या बाबतींत, हा दर्जा कधींहि आड आलेला नाहीं. जातिपद्धतिइतकी ही गोष्ट वाईट नाहीं. जन्म सिद्ध हक्काबरोबर कर्तव्यकर्म व जबाबदारी यांची जोड असते. सुधारणेच्या सर्व चळवळींत पुढाकार घेणें हें उच्च वर्णाचें कर्तव्यकर्म आहे. जपान देशांतील सामुराई जातीनें, ह्मणजे त्या राष्ट्रांतील क्षत्रियवर्णानें, त्यांच्या जातिनिर्बंध मोडून टाकण्याचे बाबतींत पुढाकार घेतला. सतराव्या शतकांत होऊन गेलेल्या, आमच्यांतील थोर व पूज्य विभूति, श्री. म. छत्रपति, शिवाजी महाराज यांनीं आपणांपुढें ठेवलेलें ध्येय आज विसाव्या शतकांत, आपण आपल्या नजरेपुढें ठेविलें

पाहिजे, व त्यांचें अनुकरण केलें पाहिजे. मला सांगण्यास दिलगिरी वाटते कीं, मीमांसा संस्थेच्या स्थापनेपासून, जुन्या-पुराण्या, व निरुपयोगी कल्पनांचें, पुनरुज्जीवन होण्यचा संभव आहे. असल्या पुढारी अर्वाचीन ध्येयाकडे लक्ष देण्याचें जितकी काळजी वाहतील, तितकें चांगलें. थोरल्या शिवाजी महाराजांनीं, जें उदाहरण घालून दिलें आहे, त्याकडे त्यांनीं दुर्लक्ष करूं नये. फलटणच्या निंबाळकर घराण्यापैकीं, एका पुरुषानें, मुसलमानी धर्माची दीक्षा घेऊन एका मुसलमान स्त्रीशीं लग्न केलें होतें, त्या पुरुषास त्या थोर विभूतीनें पुनः आपल्या जातींत घेतलें, आणि आपल्या परमपूज्य मातोश्री श्री. जिजाबाईसाहेब यांच्या समतीनें त्यांनीं निंबाळकरांच्या मुलाशीं आपल्या स्वतःच्या मुलीचा विवाह करून दिला.

खरोखरीच राष्ट्राची उभारणी, व राष्ट्राची घटना, या दोन गोष्टींचें हें एक सुंदर उदाहरण आहे. आपल्या देशांतील या थोर विभूतीला, बहुमान व अत्यादर दाखविण्याचा एकच मार्ग ह्मटला ह्मणजे, त्यांनीं घालून दिलेला कित्ता गिरविणें, व त्यांचे मार्गाचें अवलंबन करणें हा होय. जितक्या लौकर आमचीं जातिबंधनें आह्मी तोडून टाकूं, तितक्या लौकर आपली स्वराज्याबद्दलची लायखी वाढत जाईल, व हें तत्व, ज्या दिवशीं, आमचे मनांत बिंबेल, तोच राष्ट्राचा सुदिन होय. जपान देशानें एका तडाक्यांत जातिबंधनें, नाहींशी केलीं, असें सांगतात, आणि त्याचा परिणाम आपणांस दिसतच आहे. त्या राष्ट्राची

आजकाल जगांतील अत्यंत बलाढ्य व प्रमुख राष्ट्रामध्यें गणना होत आहे. महात्मा शिवाजी महाराज आणि थोर अकबर यांचा मी चहाता आहे. सर्व हिंदुस्थान देश एकवट करण्याइतकी त्यांची दूरवर दृष्टि व उदात्त ध्येय होतें. या राष्ट्रविभूतींचें आह्मी अनुकरण केलें पाहिजे. या सात्विक पुरुषाबद्दल, बहुमान वाटत असल्यामुळें नुकत्याच उल्लेख केलेल्या चातुवर्ण्यव्यवस्थेच्या स्थापनेची चळवळ मला पसंत नाहीं; आणि याच कारणासाठीं सत्यशोधक समाज, ब्रह्मसमाज, किंवा ज्या समाजाच्या योगानें निरनिराळ्या जातींमध्यें मत्सरभाव उत्पन्न केला जाईल, अशा कोणत्याहि समाजाशीं मी संबंध ठेऊं इच्छित नाहीं. या आमच्या थोर देशाच्या नैतिक, आणि सांपत्तिक प्रगतीचे कामीं, आणि सार्वजनिक हितासाठीं निरनिराळ्या जातींचें एकीकरण करण्याचें आपण शक्य तितके प्रयत्न करूं या. जर हल्लींची जातिव्यवस्थाच कायम राहिली, तर ज्या रीतीनें हल्लीं स्वराज्याचा अर्थ समजला जातो, तें स्वराज्य ह्मणजे मूठभर लोकांच्या हातीं सत्ता जाणें, हें होय. याचा अर्थ, मी स्वराज्याच्या चळवळीच्या विरुद्ध आहे, असें समजावयाचा नाहीं, हें पुनः मी एकवार सांगतों. आह्मांला स्वराज्य पाहिजेच. जातिभेदापासून होणारे अनिष्ट परिणाम, नाहींसे होईतोपर्यंत, हल्लींच्या प्रसंगीं आपणांस ब्रिटिश सरकारचा आश्रय, व मार्गदर्शकता यांची जरूरी आहे. केवळ अल्प सत्ता उच्च वर्गीयांच्या हातांतच जाण्यांत स्वराज्याचें पर्यवसान होऊं नये, म्हणून निदान दहा वर्षेपर्यंत तरी आम्हांला जातवार

प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळें आमचे हक्क काय आहेत, याचें आम्हाला शिक्षण मिळेल. एकवार तें आह्मांला समजलें, ह्मणजे जातवार प्रतिनिधितत्वाची जरूरी राहणार नाहीं. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्यानें आमच्या म्युनिसिपालिटीचा शोचनीय अनुभव आह्मांपुढें आहेच. या संस्थांतून कनिष्ट जातीचें प्रतिनिधित्व, नांवाचेंच आहे, ह्मणून अशा तऱ्हेची चूक पुनः होऊं देऊं नये. यास्तव शिक्षणाचा प्रश्न आणि त्याचीं निरनिराळीं स्वरूपें यांजकडे प्रथमतः आमचें लक्ष गेलें पाहिजे. आह्मी शेतकरी किंवा सैनिकच होऊन रहावें, ही स्थिती आह्मांला समाधानकारक नाहीं. ह्मणून व्यापार धंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यांत आह्मांस शिरण्याची जरूरी आहे. हल्लीं व्यापार व उद्दीम यांत आह्मी पडतच नाहीं. विसाव्या शतकांत राष्ट्रांची उन्नति, व्यापार व तत्संबंधीं चळवळ यांवर अवलंबून आहे. खरोखर व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्राचा धर्मच झाला आहे. येथें धर्म ह्मणजे बुद्धियुक्त स्वहित साधणें असें मी समजतों. व्यापार करण्याचें साहस आह्मीं केलें नाहीं, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील. व्यापारासंबंधींच्या चळवळीवर माझा पूर्ण विश्वास असल्यामुळें मी माझ्या दोघां मुलांना व दुसऱ्या जवळच्या आप्तांना व्यापारांत घेतलें आहे. आणि मला सांगण्यास समाधान वाटतें कीं, त्यांनीं तो धंदा मोठ्या आनंदानें स्वीकारला आहे, एवढेंच नाहीं, तर त्यांत ते चांगल्या रीतीनें पुढें येत आहेत. शेतकीच्या व्यवसायामध्यें जरी आमच्यांतील बहु-

नेक लोक गुंतले आहेत, तथापि त्यांतसुद्धां शिक्षणाची आम्हांस जरूरच आहे. शिक्षणाची जरूरी नाहीं, अशी कोणतीहि चळवळ नाहीं. आह्मी कसें खावें, श्वास कसा घ्यावा, हेंहि आह्मांस शिकलें पाहिजे. हें सांगणें जरासें चमत्कारिक दिसतें, तथापि ही गोष्ट खरी आहे. हल्लींच्या काळीं शेतकी, इतकी कांहीं पद्धतशीर झाली आहे कीं, ज्याला यांत यश मिळवावयाचें आहे, त्याला त्या विषयावरील पुस्तकें वाचतां आलीं पाहिजेत व समजलीं पाहिजेत. सांप्रतच्या महायुद्धांत, मराठे लोकांनीं, आपल्या इतिहासप्रसिद्ध रणवीरांची कीर्ति कायम ठेविली आहे, आणि त्याच प्रमाणें आपल्या राज्यकर्त्यांविषयीं राजनिष्ठा दाखविली आहे. जरी आमची लोकसंख्या मोठी आहे, तरी आमच्या दुर्बळतेमुळें, या राक्षसी लढाईंत, साम्राज्याचें कामीं, द्रव्यबळ, व मनुष्यबळ, यांची पुरेशी मदत करितां आली नाहीं. तथापि या आणिबाणीच्या प्रसंगीं आह्मी, सरकारला, यथाशक्ति द्रव्यबल, व मनुष्यबळ, सैन्यबल, यांची मदत करण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. अर्वाचीन युद्धपद्धतींत, शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे. प्रत्येक सैनिकास संग्रामशास्त्रावरील पुस्तकें वाचतां आलीं पाहिजेत. या ठिकाणीसुद्धां शिक्षणाचा प्रश्न आपल्यापुढें येतो. जर मराठे लोकांना शिक्षण मिळेल, तर ते खात्रीनें अधिक चांगले योद्धे होतील. हल्लींच्या लढाईच्या दिवसांत, तोफखान्यावरील लोक उत्तम गणिती असले पाहिजेत. ह्मणून हीच गोष्ट पुनः पुनः

प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळें आमचे हक्क काय आहेत, याचें आम्हाला शिक्षण मिळेल. एकवार तें आह्मांला समजलें, ह्मणजे जातवार प्रतिनिधितत्वाची जरूरी राहणार नाहीं. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्यानें आमच्या म्युनिसिपालिटीचा शोचनीय अनुभव आह्मां-पुढें आहेच. या संस्थांतून कनिष्ट जातीचें प्रतिनिधित्व, नांवा-चेंच आहे, ह्मणून अशा तऱ्हेची चूक पुनः होऊं देऊं नये. यास्तव शिक्षणाचा प्रश्न आणि त्याचीं निरनिराळीं स्वरूपें यांज-कडे प्रथमतः आमचें लक्ष गेलें पाहिजे. आह्मी शेतकरी किंवा सैनिकच होऊन रहावें, ही स्थिती आह्मांला समाधानकारक नाहीं. ह्मणून व्यापार धंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यांत आह्मांस शिरण्याची जरूरी आहे. हल्लीं व्यापार व उदीम यांत आह्मी पडतच नाहीं. विसाव्या शतकांत राष्ट्रांची उन्नति, व्यापार व तत्संबंधीं चळवळ यांवर अवलंबून आहे. खरोखर व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्रांचा धर्मच झाला आहे. येथें धर्म ह्मणजे बुद्धियुक्त स्वहित साधणें असें मी समजतों. व्यापार कर-ण्याचें साहस आह्मीं केलें नाहीं, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील. व्यापारासंबंधींच्या चळवळीवर माझा पूर्ण विश्वास असल्यामुळें मी माझ्या दोघां मुलांना व दुसऱ्या जवळच्या आप्तांना व्यापारांत घेतलें आहे. आणि मला सांगण्यास समाधान वाटतें कीं, त्यांनीं तो धंदा मोठ्या आनं-दानें स्वीकारला आहे, एवढेंच नाहीं, तर त्यांत ते चांगल्या रीतीनें पुढें येत आहेत. शेतकीच्या व्यवसायामध्यें जरी आमच्यांतील बहु-

तेक लोक गुंतले आहेत, तथापि त्यांतसुद्धां शिक्षणाची आह्मांस जरूरच आहे. शिक्षणाची जरूरी नाहीं, अशी कोणतीहि चळवळ नाहीं. आह्मी कसें खावें, श्वास कसा घ्यावा, हेंहि आह्मांस शिकलें पाहिजे. हें सांगणें जरासें चमत्कारिक दिसतें, तथापि ही गोष्ट खरी आहे. हल्लींच्या काळीं शेतकी, इतकी कांहीं पद्धतशीर झाली आहे कीं, ज्याला यांत यश मिळवावयाचें आहे, त्याला त्या विषयावरील पुस्तकें वाचतां आलीं पाहिजेत व समजलीं पाहिजेत. सांप्रतच्या महायुद्धांत, मराठे लोकांनीं, आपल्या इतिहासप्रसिद्ध रणवीरांची कीर्ति कायम ठेविली आहे, आणि त्याच प्रमाणें आपल्या राज्यकर्त्याविषयीं राजनिष्ठा दाखविली आहे. जरी आमची लोकसंख्या मोठीं आहे, तरी आमच्या दुर्बळतेमुळें, या राक्षसी लढाईत, साम्राज्याचें कामीं, द्रव्यबळ, व मनुष्यबळ, यांची पुरेशी मदत करितां आली नाहीं. तथापि या आणिबाणीच्या प्रसंगीं आह्मी, सरकारला, यथाशक्ति द्रव्यबल, व मनुष्यबळ, सैन्यबल, यांची मदत करण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. अर्वाचीन युद्धपद्धतींत, शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे. प्रत्येक सैनिकास संग्रामशास्त्रावरील पुस्तकें वाचतां आलीं पाहिजेत. या ठिकाणींसुद्धां शिक्षणाचा प्रश्न आपल्यापुढें येतो. जर मराठे लोकांना शिक्षण मिळेल, तर ते खात्रीनें अधिक चांगले योद्धे होतील. हल्लींच्या लढाईच्या दिवसांत, तोफखान्यावरील लोक उत्तम गणिती असले पाहिजेत. ह्मणून हीच गोष्ट पुनः पुनः

सांगावी लागते, आणि सर्व स्थितीचा विचार करितां एकच तत्व निघतें, तें हें कीं, प्रत्येक मराठा चांगला सुशिक्षित झाला पाहिजे. हल्लींच्या लढाईनें आपणांस साम्राज्याची सेवा करण्याची सुसंधि आणून दिली आहे. असली संधि पूर्वी कधीं आली नव्हती, व पुढें कदाचित् येणार नाहीं. अर्थातच अशा प्रसंगीं आपल्या सरकारला मदत करणें हें सर्व जातींच्या व पंथांच्या लोकांचें कर्तव्य आहे, परंतु इतरांपेक्षां आमच्या मराठा ज्ञातीचें हें पवित्र कर्तव्य आहे, असें मी समजतों, आणि या प्रसंगीं त्यांनीं पुढें येऊन पूर्वार्जित क्षात्रतेजाच्या परंपरेला शोभेल, असें वर्तन केलें पाहिजे. यावेळीं जर आह्मी कर्तव्य परान्मुख झालों, तर त्याबद्दल आह्माला नेहमीं शोक करावा लागेल.

माझ्या तेरा लाख जमाबंदीच्या, व सहा लाख लोकवस्तीच्या, संस्थानानें, हल्लींच्या लढाइच्या प्रसंगीं, कोणती कामगिरी केली आहे, व करावयाची योजिली आहे, हें आपणांपुढें ठेवण्यास मला आनंद वाटत आहे. आह्मी युद्धकर्जाकडे वीस लाखांहून जास्त रक्कम दिली आहे, आणि इतर रीतीनेंहि दोन लाख रुपयांपेक्षांहि जास्त मदत दिली आहे. शिवाय आमचेकडे लष्करभरतीचें काम सोंपविल्यापासून दरमहा सुमारें दोनशें रिक्रूट, ह्मणजे नवे सैनिक, आह्मी पुरवीत आहोंत, आणि या महिन्याचा आंकडा तीनशेंपर्यंतसुद्धां वाढेल, हें कळविण्यास मला आनंद वाटत

आहे. आत्मश्लाघेच्या प्रेरणेमुळें वरील सविस्तर हकीकत मी सांगत आहे, असें नसून साम्राज्याबद्दल जें माझें कर्तव्य आहे, तिकडे पूर्ण लक्ष देऊन तें मी नम्रपणें करीत आहे, हें दाखविण्याकरितांच मी वरील गोष्टीचा उल्लेख करित आहे. आधी करावें, मग बोलावें, या तुकाराम महाराजांच्या वचनाला अनुसरून मी माझें कर्तव्य करीत आहे. ह्मणून माझें तुह्मां सर्वांना असें सांगणें आहे कीं, सार्वभौम सरकारासंबंधीं जें तुमचें कर्तव्य आहे, तें शक्य तितक्या उत्तम रीतीनें पार पाडा. आमच्या सामाजिक चालीरीतींत, सुधारणा करणें, इत्यादि अनेक विषयांचा उल्लेख करण्याची माझी इच्छा होती. माझे मित्र श्री. खासेसाहेब पोवार, हे या ठिकाणीं आमचेमध्यें आहेत, ह्मणून मला आनंद वाटतो. गेल्या सालच्या, सातारा, येथें भरलेल्या आपल्या परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं या प्रश्नाचें मुद्देसूद रीतीनें, व सविस्तरपणें, विवेचन केलें आहे. त्यांनीं त्या वेळीं केलेला उपदेश इतका उत्तम आहे कीं, त्या वेळेस केलेल्या सर्व सूचना अमलांत येईपर्यंत त्या उपदेशाचा पुनः पुनः किती वेळां उच्चार केला, तरी योग्यच होईल. ज्या अर्थी माझीं मतें त्यांच्या मताशीं जुळतात, त्याअर्थी माझे वतीनें या विषयावर बोलण्याबद्दल मी त्यानांच सूचना करण्यांपलीकडे मी कांहीं अधिक करीत नाहीं. आपली रजा घेण्याचे पूर्वीं, माझ्या जातीच्या समुदायामध्यें, हजर असण्याबद्दल, व यंदाच्या बैठकीच्या अध्यक्षत्वाचा, मान मला दिल्याबद्दल मी आपले एकवार पुनः आभार मानीत

आहे. या सभेचें सर्व अधिवेशन संपेपर्यंत कांहीं निकडीच्या कामामुळें मला आपणांमध्यें हजर राहतां येत नाहीं, म्हणून मला दिलगिरी वाटत आहे. यापासून आपल्याला पुष्कळ निराशा उत्पन्न होईल, याची मला जाणीव आहे, परंतु या अधिवेशनाच्या मध्येंच मी आपणांस सोडून जात आहे, याबद्दल मला किती वाईट वाटत आहे, याची कल्पना आपणांस होणें शक्य नाहीं. हें जग तडजोडीचें आहे. आपल्या प्रगतीच्या चाल-लेल्या कामीं मला खरोखर कळकळ वाटते, हें दाखविण्याक-रितां मला आपल्या सहवासांत थोडा तरी काळ घालवावा, असें वाटत होतें, आणि जरी शरीरानें मी आपल्यामध्यें हजर नसलों, तरी असल्या प्रसंगीं मी मनानें हजर आहेच. या गोष्टीवर आपण मेहेरबानी करून विश्वास ठेवावा. ईश्वर आपल्या हल्लींच्या प्रयत्नांत साहाय्य करो, आणि आपल्या सुधारणेच्या मार्गांत आपणांवर कोणतेंही संकट न येवो, असें मी इच्छितों. ज्या थोर सार्वभौम ब्रिटिश छत्राखालीं आपली राजनिष्ठा दाख-विण्याचा अभिमानास्पद हक्क आपल्यास प्राप्त झाला आहे, त्या राष्ट्राला सांप्रतच्या युद्धांत विजयश्री माळ घालो, अशी आपण सर्व त्या परमकृपाळू परमेश्वराची मनोभावानें प्रार्थना करूं या. आतां जें मी इंग्रजींत भाषण केलें, तेंच स्वतःच्या करामतीनें पुढें आलेले माझे मित्र व नातेवाईक सरदार रावसाहेब सरनोबत हे आपल्यास मराठी भाषेंत वाचून दाखवितील.

( विद्येत मागासलेल्या वर्गातील लोकांची जाहिरसभा. )

मुंबई– तारीख १० नोव्हेंबर सन १९१८ इ०

**माझे देश व ज्ञातिबांधवहो !**

आजच्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यास आपण मला निमंत्रण केलें आहे. हें अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला विशेष आनंद व अभिमान वाटत आहे, कारण मी आपल्यापैकींच एक आहे. मागसलेल्या लोकांचा मार्गदर्शक होऊन त्यांना उच्चस्थिति प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यांत मला आनंद वाटतो. मी आपला पुढारी झालों तरी आपणाला केव्हांही भलत्या मार्गानें नेणार नाहीं याविषयीं खात्री असूंद्या. आजच्यासारख्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला जितका आनंद वाटतो आहे, तितका आनंद एखाद्या पुढारलेल्या लोकांच्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यांत मला खास वाटला नसता व अशा लोकांच्या सभेचा अध्यक्ष मी होतही नाहीं; कारण ते आपल्या पायावर उभे राहण्यास पूर्ण समर्थ आहेत. ते लोक कधीं कधीं मला बहुमान देण्याकरितां बोलावतात तरी मी ह्या कामास योग्य नाहीं असें समजून मी त्यांची विनंती मान्य करीत नाहीं. कारण मजपेक्षां दुसरे लायख लोक पुष्कळ आहेत त्यांनं हें काम करावें असें मी त्यांना सांगतों.

दर पांच वर्षांनीं नवे गव्हर्नरसाहेब येतात, व पूर्वींचे जातात असें नेहमीं होत असतें. परंतु आपणासारख्या गरीब व अशिक्षित ह्मणून मुक्या मजुरदारांची अशा प्रकारची प्रचंड सभा कोणाही गव्हर्नर साहेबासंबंधानें आजवर भरली नव्हती. मग आजच अशी सभा भरत आहे याचें प्रयोजन काय? असा प्रश्न सहाजिकपणें उपस्थित होतो. या प्रश्नाचें उत्तर माझे मित्र सर नारायणराव चंदावरकर यांनीं नुकतेंच दिलें आहे. ते ह्मणतातः—" या ( लॉर्ड विलिंग्डन ) गव्हर्नर साहेबाप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही गव्हर्नरांनीं इतक्या आस्थेनें व नेटानें सर्वांच्या विशेषेंकरून गरीब लोकांच्या आयुष्य-क्रमाशीं संबंध ठेविला नव्हता. अशिक्षित बहुजनसमाजांत गव्हर्नरसाहेब मिसळत, व त्याविषयीं त्यांस सहानुभूति वाटे; इतकेंच नव्हे तर त्यांच्या मनामध्यें यांनीं आपल्याविषयीं भरंवसा व प्रेम उत्पन्न केलें होतें.

लॉर्ड विलिंग्डन साहेब आपणावर प्रेम करितात व आपणही त्यांच्यावर प्रेम करित आहों. तें आपलें प्रेम व त्यांचेविषयीं आपले ठायीं असलेला आदर जाहीररीत्या व्यक्त करण्याकरितां आजरोजीं आपण येथें जमलों आहों.

नामदार गव्हर्नर साहेब यांच्या पत्नी लेडी विलिंग्डन ह्याही आपल्या अंगच्या दया, परोपकार, दाक्षिण्य इत्यादि थोर सद्गुणांनीं फार लोकप्रिय झाल्या आहेत. हार्डिंग

हॉस्पिटल हें तर केवळ त्यांच्याच प्रयत्नाचें फळ आहे. इतकेंच नव्हें तर, नामदार गव्हर्नर साहेबांना आपल्या कामांत जें नावाजण्यासारखें यश मिळालें आहे; त्याचें बरेंच श्रेय त्यांच्या अर्धांगीकडे आहे; व ही गोष्ट उभयतांसही भूषणावह आहे. लेडी विलिंग्डन ह्या लॉर्ड ब्रेसी यांच्या कन्या होत. हें घराणें जुनें व नामांकित असून भूतदया, औदार्य इत्यादि उदात्त गुणांनीं हें पुढें आलेलें आहे; ह्मणून लेडी विलिंग्डन यांचेवरही हे आनुवांशिक संस्कार व्हावेत यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

लॉर्ड विलिंग्डन साहेब आज इतके लोकप्रिय झाले आहेत त्यास केवळ त्यांच्या अंगचे गुण कारणीभूत आहेत. त्यांचे अंगभूत गुण प्रसंगविशेषीं कसे दृष्टोत्पत्तीस आले, व त्यांच्या कर्तबगारीची साक्ष कशी पटूं लागली हें मी आपणांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. गेल्या एप्रिल महिन्यांत मुंबई येथें भरलेल्या वॉर कॉन्फरन्सचे वेळीं त्यांनी जें भाषण व आचरण केलें त्यावरून ते किती निर्भीड व स्पष्टवक्ते आहेत हें चांगलें दिसून आलें. आपलें कर्तव्य बजावण्यांत ते आपल्या शरीराचीही पर्वा करीत नसत. गेल्या दोन वर्षांत शारीरिक व मानसिक त्रास सोसून ते आपल्या इलाख्यांत चोहोंकडे फिरले व कर्तव्य ह्मणून लढाईला शक्य ती मदत केली. हे प्रेमळ स्वभावाचे असल्यामुळें दररोज हॉस्पिटलमध्यें जाऊन जखमी शिपायांची विचारपूस करीत.

ह्या कृतीचा रयतेवर कसा इष्ट परिणाम झाला हें युद्धकर्जाच्या आंकड्यांवरून स्पष्ट होतें. पहिल्या युद्धकर्जांत मुंबई इलाख्यानें आघाडी मारिली व दुसऱ्या युद्धकर्जांतही बंगाल इलाख्याच्या खालोखाल जागा पटकाविली. आपल्या इलाख्यांतील युद्धकर्जे इतकें यशस्वी होण्यास बहुतेक अंशीं ना. गव्हर्नरसाहेब कारणीभूत आहेत असें ह्मटल्यास अतिशयोक्तीचा प्रकार आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. खरी परिस्थिति अंतःकरणपूर्वक लोकांचे पुढें मांडून पैसा जमा करण्याचे वेळीं लोकांत अस्वस्थता होऊं दिली नाहीं व मागसलेल्या लोकांकडून जी मदत मिळाली त्याजबद्दल त्यांनीं कृतज्ञता व्यक्त केली. परवांच कलकत्ता व मद्रास येथें बाजारलुटीचे जे दंगे झाले तसल्या प्रकारचे दंगे आपल्या इलाख्यांत त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें होऊं दिले नाहींत. त्यांना sporting ची विशेष आवड आहे. विलिंग्डन स्पोर्टस क्लब ह्या संस्थेचे हे उत्पादक असून या संस्थेंत आपणांस त्यांच्यामध्यें मिसळूं दिल्यानें आपला विशेष फायदा होणार आहे. sporting ची त्यांना इतकी आवड आहे तरी कर्तव्य बजावीत असतां ते हें सर्व बाजूस ठेवीत असत. संस्थानिकांना स्वतंत्र राजाप्रमाणें वागविण्याची यांनीं शक्य तितकी खटपट केली. यांच्यांतील विशेष गुण ह्मटला ह्मणजे मध्यरात्रींसुद्धां कोणी जरूरीच्या कामाकरितां त्यांचेकडे गेला तरी त्यास मज्जाव नाहीं. ह्या सर्व गुणांमुळेंच ते आह्मांस आज हवेसे झाले आहेत.

मुंबई शहर हें व्यापार व उद्योगधंदा या बाबतींत सुप्रसिद्ध आहे. धनिकांचें भांडवल व कारखानदारांचें व्यवस्थाचातुर्य याव-रींच हा व्यापार व उद्योगधंदा अवलंबून आहे अशी आजपर्यंत इकडच्या प्रांतीं समजूत होती. पाश्चात्य देशांत भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग आहेत. तिकडेही भांडवलवाले लोकांची मजूरदार लोकांवर बेसुमार सत्ता चाले. पण आतां मजूदार लोकांनीं आपले संघ बनविले आहेत. गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते पण अशा अनेक काड्यांचा वेठ वळला तर त्यानें हत्तीलाही बांधतां येईल. मजूरदार लोकांना विलायतेंत मजुरी वाढवावी एवढ्याकरितांच झगडावें लागतें. तेथील समाजामध्यें कोणत्याही दर्जास पोहो-चण्यास जन्मसिद्ध अडचणी मुळींच नाहींत, त्यामुळें ते उच्च वर्गांत सहज रीतीनें मिसळतात तशी स्थिति आमच्या इकडे नाहीं. विलायतेंत मजुरदार लोकांच्या संघांना पुष्कळ महत्व आलें आहे, व त्या लोकांतीलच प्रतिनिधी पार्लमेंट सारख्या संस्थांत व प्रधानमंडळांत शिरले असून ते आपल्या वर्गाच्या हिताचें योग्यरीतीनें संरक्षण करीत आहेत.

आतां आपल्या हिंदुस्थानांतील स्थिति पाहूं गेल्यास इकडे मुख्य मागसलेला वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा आहे, व मीहि त्यांपैकींच एक आहे. कारखान्यांत मजुरी करणारे आपण सर्व शेतकरीच आहां; तेव्हां सर्वांविषयीं एकत्र विचार करणें सोयीचें आहे. मजुरदार व इतर मागासलेले

वर्ग यांच्या हितांचें संरक्षण करणें या हिंदुस्थान देशांतही जरूरीचें आहे. येथें सुशिक्षित व मागसलेले यांच्यामधील प्रश्न अगदीं अलीकडचा आहे. जातीभेदामुळें हिंदुसमाजाचें अत्यंत नुकसान झालें आहे असें माझें ठाम मत आहे. ख्रिश्चन, मुसलमान, बुद्धधर्मीय वगैरे लोक आमच्या मागसलेल्या समाजाशीं प्रेमळपणानें व सहानुभूतीनें वागतात. त्यामुळें हे लोक परधर्मीय असूनही आम्हांस त्यांचेविषयीं जास्त आपलेपणा वाटतो. मजूरदारांचे हितसंबंध भांडवलवाल्यांच्या हितसंबंधाशीं विरोधी असल्यामुळें ह्या मंडळींतील प्रतिनिधींकडून मजूरदार लोकांच्या हक्कांचें रक्षण होत नव्हतें अशी स्थिति इंग्लंडांत होती. तसलीच स्थिति येथेंही आहे. पुढारलेल्या वर्गाकडून मागासलेल्यांच्या हितसंबंधाचें रक्षण होणें शक्य नाहीं, याजकरितां जातवार किंवा वर्गवार मतदार संघातर्फे त्यांच्यांतील प्रतिनिधी निवडून आले पाहिजेत, अशा विशेष योजना केल्या पाहिजेत असें माझें पूर्वीपासून मत आहे, व त्याप्रमाणें शक्त्यनुसार मी खटपटही करीत असतों.

इंग्लंडांत मजुरदारांनीं आपल्या उन्नतीकरितां आपले संघ स्थापन करून स्वावलंबनाचे मार्ग स्वीकारले. त्याप्रमाणें *आपण आपले सुव्यवस्थित संघ तयार केले पाहिजेत. आपल्या मुलांबाळांस शिक्षण देऊन व आपलें आरोग्य वाढविण्याचें प्रयत्न करून आपली उन्नति आपणच करून घेतली पाहिजे.*

दुसरा आपल्याकरितां कांहीं करील अशी अपेक्षा करणें केव्हांही कमीपणाचें आहे; हीं गोष्ट अहर्निश लक्षांत ठेवा. परधर्मापासून आपल्या धर्मावर आलेले संकट आपल्याच लोकांच्या मदतीनें श्रीशिवछत्रपति महाराजांनीं निवारण केलें. आजही आमच्या धार्मिक, आर्थिक व अशाच इतर हक्कांवर संकट आमच्या देशाच्याच पुराणमताभिमानी वर्गाकडून झालें आहे तें दूर करण्यास आपण सर्वांनीं झगडलें पाहिजे. हा झगडा पूर्वीसारखा तरवारीच्या सहाय्यानें करावयाचा नाहीं. आतां सर्वांस समदृष्टीनें पाहणारें व दीनांची कळकळ बाळगणारें इंग्रजी राज्यछत्र आपणांवर आहे. त्यामुळेंच आम्हांला थोडेंबहुत समजूं लागून, आपण एकत्र जमलों आहों. आमच्या शिक्षणाला इतक्या अडचणी होत्या कीं, खुद्द सातारचे महाराजांना मध्यरात्री शिक्षण घ्यावें लागत असे, मग इतरांची ती काय कथा. परंतु तो काळ आतां उरलेला नाहीं. आम्हांस लिहिणें, वाचणें शिकण्यास प्रतिबंध नाहींसा झाला आहे. याचें कारण आपणा सर्वांकडे समदृष्टीनें पहाणारें इंग्रजांचें एकछत्री राज्य हें होय. याकरितां आपण त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. मोफत व सक्तीचें शिक्षण लवकरच सुरू होईल असें मला वाटत होतें; परंतु मागासलेल्या जातींचे प्रतिनिधी कौन्सिलांत असल्याशिवाय ह्या प्रश्नाची उठावणी लवकर होईल, असें दिसत नाहीं. याजकरितां शांततेच्या मार्गांनीं आपण आपला उद्दिष्ट हेतु साध्य केला पाहिजे. ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटी न सोडता अव्याहत प्रयत्न हींच आमचीं ह्या झगड्यांतील शस्त्रें आहेत.

मागसलेल्या लोकांच्या उन्नतीकरतां माझे कैलासवासी मित्र न्यायमूर्ति रानडे व गोपाळराव गोखले यांनीं पुष्कळ श्रम केले. मागसलेल्या लोकांत विद्येचा प्रसार होण्याकरितां विशेष प्रयत्न केले पाहिजेत, ही मूळ कल्पना मला त्यांच्यापासूनच आली. आजच्या काळीं देखील नामदार सर शंकरन् नायर, ना. सर इब्राहिम रहिमतुल्ला, ना. पटेल, मि. गांधी मद्रासचे डॉ० नायर व रा. ब. त्यागराज चेट्टी, व या इलाख्यांतील माझे मित्र रा. कोठारी, व्होरा, लठ्ठे, मुकुंदराव पाटील, तसेंच येथीलही कांहीं निरलस मंडळी ( ज्यांची नांवें सांगण्याची आवश्यकता नाहीं ) ह्या दिशेनें प्रयत्न करीत आहेत; परंतु अशांची संख्या फारच थोडी आहे. म्हणून आमच्यांतील तरुण मंडळीनें स्वार्थत्यागपूर्वक समाजकार्यास वाहून घेऊन, आपल्या ज्ञातिबांधवांची उन्नति करावी, असें माझें त्यांना आग्रहपूर्वक सांगणें आहे.

इंग्रज लोक कसे दिलदार आहेत, त्यांना रयतेच्या कल्याणाची व उन्नतीची किती कळकळ आहे याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आमचे गव्हर्नरसाहेब व त्यांच्या पत्नी हीं होत. त्याचप्रमाणें सर वुइलियम वेडरबर्न, ह्यूम, सर जॉर्ज बर्डवुड, वगैरे लोक आमच्या देशाकरतां कसे झटले हें मी आपणांस सांगितलें पाहिजे असें नव्हे. हल्लींही माझे परम मित्र सर वालेंटाइन चिरोल व लॉर्ड सिडेनहाम हे आपल्या मागसलेल्या वर्गाच्या हिताकरितां निरपेक्ष बुद्धीनें प्रयत्न करीत आहेत. अशा प्रकारचे उदार मनाचे लोक आपणांस सदा लाभल्यास

आपली उन्नति आपाल्यानें होईल यांत संदेह नाहीं. यासाठीं लॉर्ड विलिंग्डन यांची कारकीर्द आपणावर आणखी पांच वर्षें असावी अशी जी आपली मागणी आहे ती अगदीं रास्त आहे. आपल्या आजपर्यंतच्या मुख्य वर्गास आतां वाचा फुटली आहे व आपण आपलीं गाऱ्हाणीं सांगूं लागलों आहों. इंग्रज लोक हे बहुमताचे मोठे चहाते आहेत नवीन येणाऱ्या गव्हर्नरसाहेबांस मुंबई व मद्रास सारखेंच; पण येथें राहून लोकप्रिय झालेले गव्हर्नर येथेंच राहूं देणें सर्व दृष्टीनें हिताचें आहे. म्हणून आपली एवढ्या समाजाची मागणी आपलें सरकार शक्य तितकी मान्य करील अशी मला उमेद आहे.

हिंदुस्थानची राजनिष्ठा अढळ आहे असें या लढाईनें सर्व जगास स्पष्ट कळलें आहे. या प्रसंगी आपल्या देशांतील मागासलेल्या लोकांकडूनच सरकारास फार उत्तम प्रकारची मदत झाली आहे. त्यांनीं रणांगणावर शौर्य गाजवून आपलें क्षात्र-तेज जगाचे निदर्शनास आणून दिलें आहे. असें असतां भावी राज्यसुधारणेंत अशा लोकांचे हक्क राखून ठेवण्याची तजवीज कर-ण्यांत आलेली नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. महायुद्धांत ज्यांनीं आपल्या बादशहाकरितां प्राणांचीही आहुती दिली त्यांच्या ज्ञाति-बांधवांस सरकारनें विसरूं नये एवढेंच आमचें म्हणणें आहे.

आतां लढाई बहुतेक संपल्यासारखी झाली आहे. ईश्वरानें सत्पक्षास यश दिलें असून, जुलमी राजसत्तेचा नायनाट होण्याची वेळ जवळ आली आहे. बेलजम, सर्व्हिया वगैरे लहान राष्ट्रांवरील जुलूम जबरदस्ती नाहींशी करण्यास ज्याप्रमाणें इंग्रज

सरकारनें कंबर बांधली त्याप्रमाणें त्यांना मागसलेल्यांच्या उन्नतीकरितां करावयाचें आहे व त्यासाठीं पुढारलेल्यांच्या मनाविरुद्ध बऱ्याच गोष्टी त्यांना कराव्याही लागतील. जातवार प्रतिनिधीच्या तत्वासाठीं माझे मित्र व या कामांतील मार्गदर्शक लॉर्ड सिडेनह्यामसारखे आपल्या सर्वांच्या पूर्ण परिचयाचे थोर व वजनदार गृहस्थ विलायतेस खटपट करीत आहेत व या त्यांच्या प्रयत्नास यश येईल अशी मला उमेद आहे. मात्र, आपण ह्या बाबतींत आपलें कर्तव्य ह्मणून शक्य तितक्या जोराचे प्रयत्न सुरू ठेवले पाहिजेत. असो.

शेवटीं बेलजम व सर्व्हिया यांचेंच उदाहरण मी आपणांपुढें ठेवितों. जर्मनी, आस्ट्रिया यासारखीं प्रबळ राष्ट्रें चालून आलीं असतांही व त्यांचेपुढें आपला निभाव लागणार नाहीं अशी खात्री असतांनाही त्यांनीं हिंमतीनें युद्ध सुरू केलें व नांवाजण्यासारखे पराक्रम करून आपली योग्यता जगास दाखविली. विपत्तिकाळीं धीर सोडला नाहीं यामुळें त्यांस आतां यश येत आहे. तसेंच आपणही आपल्या हक्काकरितां झगडत राहिलें पाहिजे. ईश्वर सत्पक्षास जय देईल अशी खात्री बाळगा आणि आपल्या मागसलेल्या वर्गाकरितां कळकळ बाळगणारे लॉर्ड विलिंग्डनसाहेब ह्यांची सुखद कारकीर्द आणखी पांच वर्षे आह्मांस लाभो व ती मिळण्याकरितां आपण जे यत्न करीत आहों त्या यत्नांला यश मिळो अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

( विद्येत मागासलेल्या वर्गांतील लोकांची जाहिरसभा. )

मुंबई– तारीख २४ नोव्हेंबर सन १९१८ इ०

**माझे देश व ज्ञातिबांधवहो !**

गेल्या तारीख १० नोव्हेंबर रोजीं परळ येथें भरलेल्या प्रचंड सभेंत मी आपणा सर्वांच्या मनांत घोळत असलेलेच विचार बोलून दाखविले, व पाश्चात्य देशांत मजूरदार वगैरे लोकांचे संघ आहेत तसे संघ आपणही करावें व एक जुटीनें आपली उन्नती करून घ्यावी, असें आपणास सांगितले. त्या प्रमाणें peoples union ह्मणजे लोक संघ या नांवांची संस्था आपण काढली, हे फार चांगले केले. इंग्लंडांत भांडवलवाले व मजूर असे दोन प्रबल पक्ष आहेत व त्यांचे हितसंबंध परस्पर विरोधी आहेत, अशी आजपर्यंतची समजूत आहे. वास्तविक पाहतां ज्यानें त्यानें आपले वाजवी हक्क तेवढेच संभाळले व दुसऱ्याचे वाजवी हक्कास विरोध केला नाहीं ह्मणजे तंट्यास जागा राहत नाहीं. तशी बुद्धी वरीष्ट दर्जाचें लोकांस होईल व दाबून टाकलेल्याना मान वर करण्यास संधी मिळेल, तो सुदिन होय. हा सुदिन लवकरच उगवेल, अशी आशा वाटत आहे. हिंदुस्थानांतही ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे पक्ष पडले आहेत व त्यांच्यांतील विरोध दिवसे दिवस स्पष्ट होत आहे. ब्राह्मणेतर वर्ग बहुतांशी अज्ञानांत गढला असल्यानें त्यांची अवनति

झाली व त्यांस गुलामाची स्थिती आली आहे. त्यांच्या श्रमावर शारिरिक कष्ट न करणारे लोक पोसले जात आहेत, व त्यांस कधीं कधीं चिथवून भलते मार्गास लावतात अशा स्थितींतच पश्चिम दिशेकडील भांडवलवाल्यां सत्तेचें तत्व इकडील कारखान्यांत शिरल्यानें गरीब मजुरांची स्थिति जास्तच कष्टमय झाली आहे. ही स्थिती सुधारण्यास संघटित प्रयत्न जोरानें स्वार्थ त्याग पूर्वक केले पाहिजेत. आपण तसे करित आहा ही अभिनंदनीय गोष्ट आहे. ब्राह्मणसभा, शंकर वाडी, मीमांसा विद्यालय वगैरे आपल्या करितां स्वतंत्र संस्था ब्राह्मणांनीच काढून इतरांस वगळले आहे व अशा रीतीनें फुटीचा पाया घातला आहे. वास्तविक पाहतां सर्वांशी एकत्वानें वागून एकीचें व प्रेमाचें उदाहरण सुशिक्षित आणि समंजस वर्गानें घालून दिले पाहिजे होतें, पण आज ते तसें करित नाहींत. हे काम आर्यसमाजानें हातीं घेतले आहे. आर्यसमाजाचा महशूर नरवीर सरप्रतापसिंह महाराज यांचा मी अनुयायी आहे. त्या मताच्या ग्रंथाचें वाचनही मी बरेच केले आहे. आर्य समाजाची मतें दयानंद सरस्वतीचीच आहेत असें नाहीं; वेदांतील अनादि तत्वेंच स्वामी दयानंद, नित्यानंद, माझे मित्र पंडित आत्माराम व स्वामी परमानंद वगैरे प्रज्वलित करीत आहेत. धर्मोपदेशकांची व उपाध्यायांची जात बनवून जी नवीन नवीन तत्वें धर्मांत घुसडविली आहेत त्यांचा नायनाट करण्याकरितां या साधुपुरुषाचे प्रयत्न चालू आहेत. त्याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे जितके थोडेच. मी आर्यसमाज

मताचा कसा झालों हे थोडक्यांत सांगतो. क्षत्रिय कुलावतंस महाप्रतापी महाराज प्रतापसिंह हे युद्धाच्या आरंभापासून फ्रान्स मध्यें लढत आहेत हे व मी एका स्टीमरनें राज्यारोहण समारंभा करितां विलायतेस गेलों, तेव्हां त्यांनीं मला हीं मतें समजावून दिली. त्यानंतर बरेच वर्षांनीं पंडित आत्माराम यांची गांठ पडली. तेव्हां पासून मी अलीकडे या समाजाचा झालों. हल्लींचे कुचविहारचें महाराज ब्रह्मसमाजिष्ठ आहेत. आर्यसमाज, ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज हे कां उत्पन्न झाले याचें थोडक्यांत उत्तर धर्मोपदेशक बनलेल्या जातीचें जुलमी जूं झुगारून देण्याकरितां हे आहे. आपले संघ बनवून भांडवलवाल्यांचा जुलुन नाहींसा करणे जितकें महत्वाचें आहे त्यापेक्षांही हें बनावटी धार्मिक जूं काढून टाकणे जास्त जरूरीचें आहे व याकरितांच मी आर्यसमाजास चहातों. पण बनावटी धर्मवाले आर्यसमाजास विरोध करतात. लॉर्ड किचनेर, लॉर्ड फ्रेंच वगैरे योद्धे आर्यसमाजमतानें आर्य क्षत्रिय आहेत, व त्यांस आर्यधर्मी होता येईल. याप्रमाणें आर्यसमाज हा आम्ही व इंग्रजराष्ट्र यांस ऐक्यानें जोडणारी साखळी आहे. याचे मोठे उदाहरण महाराज प्रतापसिंह हे होत.

बरें असो. ब्राह्मण व ब्राह्मणेतर या मधील ही फूट लवकरच नाहींशी होईल व सर्वांचे ऐक्य होईल अशी मला मोठी आशा आहे, परंतु जोपर्यंत त्यांच्या अशा स्वतंत्र संस्था चालू आहेत व त्यांत इतरांचा प्रवेश होत नाहीं तो पर्यंत आपणही आपली संस्था

निराळीच चालविणे भाग आहे. याकरितां ब्राह्मणेतर लोकच आपले संघांत घ्यावयाचे असा आपला नियम चालू स्थितीस गैर ह्मणतां येत नाहीं. आमच्याकडे आहे त्याप्रकारचा जातिभेद दुनियेत कोठेंही सांपडावयाचा नाहीं. कोणत्याही देशांत उपाध्यायांची स्वतंत्र जात नाहीं. आमचेकडेही वेदकाली ती नव्हती, पण अलिकडेच ती उत्पन्न झाली आहे त्यायोगानें पुढारलेल्या थोड्या लोकांच्या हातीं सर्व सत्ता जाऊन त्यांची एक आलिगार्किच झाली आहे व बहुजन समाजाला जरूर तितकी मदत होत नसून त्यांच्या हिताकडे व सुधारणेकडे दुर्लक्ष होत आहे. याकरितां आपला स्वावलंबनाचा मार्ग योग्यच आहे. अशा या आपल्या संघाच्या मार्फत बोलावलेल्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास मला फार आनंद वाटत आहे.

महायुद्धाचा शेवट झाला व दोस्त राष्ट्रास पूर्ण यश मिळालें याबद्दल आनंद प्रदर्शनार्थ आजची सभा भरविली आहे. या लढाईसंबंधानें चार शब्द सांगणे प्रसंगास अनुसरून आहे. ही लढाई "बळी तो कानपिळी" हें तत्व स्थापित करण्याकरितां सुरू करण्यांत आली. सन १८७० साली जर्मनीनें फ्रान्सचा पूर्णपणें पराभव करून दोन प्रांत व लढाईचा खर्च ह्मणून अब्जावधी रुपयांची संपत्ति हिसकावून घेतली; यामुळें जर्मनीची महत्वाकांक्षा जास्तच वाढली. युरोपांत सर्वांत बलाढ्य असें तें राष्ट्र ठरलें व तेथील राजकारणांत जर्मनीचे मतास फार मान मिळूं लागला. पण एवढ्यानेंच जर्मनीची तृप्ती झाली नाहीं.

युरोपांतच नव्हे, तर सर्व जगांत आपल्या इच्छेला सर्वांनीं मान वाकविली पाहिजे, आपल्या शब्दाशिवाय पानही हालतां कामा नये, अशी दांडगी हांव जर्मनीस सुटली. ही सफल होण्याकरितां जर्मनीनें आस्ट्रिया व इटलीसह तीन देशाचें एक कूट बनविलें. यापासून आपणास फार धोका आहे असे जाणून फ्रान्स व रशिया यांनीं एकमेकांचे रक्षण करण्याचा तह केला.

फ्रान्स कमकुवत झाला आहे, तेथील लोकसंख्या फार वाढत नाहीं, तेव्हां त्यास पाहिजे तेव्हां दाबतां येईल, अशी जर्मनीस खात्री होती. पण इंग्रजाचें सर्व जगावरील साम्रज्य व अवाढव्य व्यापार यांचा हेवा त्यास फार आहे व इंग्रजाना खालीं कसें आणावें याचे विचार जर्मन कैसरच्या व त्यांच्या मुत्सद्यांच्या डोक्यांत सारखे खेळत असत. जर्मन प्रजेंत इंग्रजाविषयीं अत्यंत द्वेष उत्पन्न करण्याची अतोनात खटपट करून त्या कामीं त्यांनीं चांगलेच यश मिळविलें. हें जाणून इंग्रजांनीं फ्रेंचाबरोबर जास्त स्नेहसंबंध ठेविला, इंग्रजांची शक्ति त्यांच्या साम्राज्यावर आहे, तेव्हां त्या साम्रज्यांतील महत्वाच्या भागास ह्मणजे हिंदुस्थानास शह द्यावा व आपलेही साम्राज्य मोठे पसरावें या करितां मेसापोटेमिया ताब्यांत आला पाहिजे, असें जर्मनीनें ठरविलें. त्यासाठीं तुर्कांच्या सुलतानास वळविण्याचे काम सुरू केलें व तुर्क लोकांवर भुरळ टाकली. या कामीं त्यांस यश आलें. पण जर्मनीचा खरा कावा दिसून

आल्यानें इटलीचें डोळे उघडलें व हें महायुद्ध सुरूं झालें तेव्हां आपल्या दोस्तांविरुद्ध ह्मणजे जर्मनी व आस्त्रिया विरुद्ध इटाली उठला. खोड्याचा अवलंब केल्यानें मित्रही शत्रु होतात. व खऱ्या पक्षाला शत्रुही मिळतो ह्याची सत्यता अशा रितीनें पटते. मेसापोटेमिया ताब्यांत राहण्याला बाल्कन द्विपकल्पांतील सर्वि-याच्या राजाची मोठी आडकाठी होती. ह्याकरितां सर्विया पादाक्रान्त केला पाहिजे असें जर्मनीनें ठरविलें व आस्त्रियाकडून कुरापत काढवून लढाईचें शिंग फुंकलें.

लढाईचे धोरण कशाप्रकारचें आहे व यांत बाहेरून दाख-विण्यांत येतो त्या पेक्षां निराळा कावा कसा आहे हें समजून येण्यास अवकाश लागला नाहीं. रशिया व फ्रान्स यांची रग जिरविल्या शिवाय सर्विया आपणांस पचणार नाहीं, अशी जर्मनीची खात्री असल्यानें या युद्धाची प्रथम पासूनच तयारी त्यानें कडेकोट ठेविली होती व रशियाची जमवाजमव होईपर्यंत फ्रान्सला चित केले पाहिजे, याकरितां त्या देशांत लवकर शिरण्यासाठीं बेलजमधून घुसण्याचें व वचनभंगाचें मोठे पापही शिरावर घेण्याचें पत्करलें. बेलजमनें नेहमीं तटस्थ राहावें, त्यानें युरोपच्या राजकारणांत बिलकूल पडूं नये, यासाठीं त्या देशांतही कोणाच्याही फौजेनें पाय घालूं नये, असा सर्व राष्ट्रांनीं करार केला होता. त्यांत जर्मनी व आस्त्रिया हेही देश होते, पण गरज ही फायदा जाणत नाहीं, असे तत्व लढवून तहास कागदाचें चिटोरें ठरवून बेलजममध्यें

जबरदस्तीनें जर्मनी घुसला; यामुळें बेल्जमच्या स्वातंत्र्य रक्षणासाठीं व आपलें सम्राज्य रक्षणासाठीं इंग्रजांसही या युद्धांत शिरावें लागलें, जर्मनीचे हेतू किती दुष्ट आहेत त्या पासून लहान लहान अशक्त राष्ट्रांचें स्वातंत्र्य कसें नष्ट होईल व जर्मनीचें वर्तन किती जुलमी व मदांधपणाचें आहे याची खात्री पटल्यानें अमेरिकाही या युद्धांत मागाहून सामील झाली.

सव्वाचार वर्षें युद्ध चाललें, पुष्कळ जयापजय झाले. पहिलीं चार वर्षेंतर जर्मनी जिंकतो व सत्यपक्षाला हार येते कीं काय, अशी भिती पडली. पण अखेर सत्यमेव जयते या तत्वाचा खरेपणा सर्व जगाचें निदर्शनास आला. जर्मनीचा पूर्ण पराभव होऊन त्याला दोस्त राष्ट्रांस शरण यावे लागलें. त्याचें तीन दोस्त तर पूर्वीच शरण आले होते. अशा रितीनें युद्धाचा शेवट होऊन सर्वांना आनंदी आनंद झाला आहे, तो व्यक्त करणें हे आपलें आजचें मुख्य काम आहे.

या युद्धांत हिंदुस्थान देशानें मोठीं कामगिरी बजाविली आहे. सर्व तऱ्हेनें साम्राज्य सरकारास मदत केली व समरांगणावर लढून शूरांनीं आपलें आणि आपल्या देशाचें नांव राखिलें. आमच्या मराठे वीरांनींही थोर थोर पराक्रम केलें. क्षत्रियांचा मुख्य धर्म लढण्याचा आहे. त्या कामीं देश, परदेश, अमक्याच्या हातचें खावें, तमक्याच्या हातचें खाऊं नये, अमुक खावें, अमुक खाऊं नये अशा प्रकारचें धर्माच्या नांवा खालीं लोकांवर घातलेले मूर्खपणाचें निर्बंध याचा विचार

देखील करण्याची जरुरी नाहीं, असें जाणून त्या प्रमाणें त्यांनीं वर्तन केले आहे. अशा रीतीनें आपल्या खऱ्या धर्मास जागणारे वीरच आमच्या पेक्षां धर्म पालनाच्या कामांत पुढें आहेत; व याकरितां तेंच जास्त शुद्ध आहेत हें लक्षांत ठेवा. हे आमचें बंधू परत येतील तेव्हां त्यांचा उत्तम आदर सत्कार करून आपण सर्व पवित्र होऊं या. धर्म रक्षणाच्या सबबीवर त्यांना प्रायश्चित देण्याचा किंवा ब्राह्मणांच्या अशुद्ध पायाचें तीर्थ या पवित्र लोकांस पाजण्याचा विचार देखील आपले मनास शिवतां कामा नये. मेसापोटेमियाच्या रणांगणावर खरे क्षत्रिय व शूद्र मानलेल्या लाखों लोकांनीं केलेल्या पराक्रमाचीं वर्णनें वाचून युद्धपराङ्मुख अशा पुढारलेल्या ब्राह्मण वैश्यादिकांना लाज वाटली पाहिजे. त्यांचें अनुकरण करून लढाईस न जातां उलट नाना तऱ्हेच्या सबबी लावून लोकांत गैर समज व सरकारास अडचणी उत्पन्न करणाऱ्या लोकांस काय नांव द्यावें हें कळत नाहीं. आपल्या देशासाठीं आणि राजासाठीं आमच्या खरे क्षत्रिय व मानलेले शूद्र शिपायांनीं मोठें शूरत्व गाजविलें. गुणकर्मा प्रमाणें त्यांनीं जें क्षत्रियत्व मिळविले आहे. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. क्षत्रिय कुलांत जन्म घेतल्यानें जे क्षत्रिय होतात त्या पेक्षां या रणगाजीची योग्यता मोठी असल्यानें मी आपणां सर्वां तर्फे त्यास धन्यवाद देतों. त्यांना व त्यांच्या जातीच्या लोकांना कौंसिलांत जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क मिळूं नये असा स्वार्थी प्रयत्न करणाऱ्या पुढारलेल्या वर्गाची मला फार कीव येते.

आपमतलबी लोकांना दुसऱ्याचें न्याय्य हक्क देणें बरें वाटत नसलें तरी ईश्वराच्या व ईश्वरी अंशभूत जॉर्ज बादशहाच्या दरबारीं हें मान्य आहे, अशी माझी पूर्ण खातरी आहे. पुढारलेल्या आलिगार्कींच्या जुलुमी अमलांतून बहुसंख्यांक क्षत्रिय व शूद्र यांस सोडवून सरकार त्यांना त्यांचे योग्य अधिकार देऊन त्यांच्या अंगच्या गुणांचें चीज करील असा मला भरवंसा आहे. देशाकरितां व राजाकरितां प्राणाची पर्वा न करणारेच राजकीय हक्कास खरोखर लायख आहेत.

डेमोक्रॅटीक मतांचा फैलाव सर्व ठिकाणीं जोरानें होत असतां आमच्या क्षत्रिय व शूद्रांनीं पूर्वी सारखीच धार्मिक जुलुमाखालीं मान वाकवावी हें शक्य नाहीं. माझे प्रिय मित्र होरा व कोठारी आणि येथील आपले पुढारी यांचे आपण ऐकिल्यास आपले हितच होईल. होरा व कोठारी यांनीं आपल्या कल्याणाकरितां पुष्कळ नुकसान सोसून दोन वर्तमानपत्रें चालविलीं आहेत. त्यांस आपण आश्रय देऊन त्यांतील सुबोध घेतला पाहिजे. फार पुरातन काळापासून आमच्या डोकीवर आलिगार्कींचा बसलेला बोजा ढकलून देण्याच्या कामीं आह्मांस माझे प्रिय गुरु लॉर्ड सिडनहॅम साहेब व त्यांचे अनुयायी मदत करीत आहेत. ते त्यांचे प्रयत्न सफल झाले नाहींत तर युद्धांत आह्मी केलेल्या पराक्रमाचा आह्मांस उपयोग न होतां आलिगार्कींच्या जुलुमाखालीं आम्ही चिरडून जाऊं. हें जूं आमच्या मानेवर आहे तोपर्यंत आमची सुधारणा आह्मांस करतां येणार नाहीं.

सध्याची लढाई ही जर्मनीनें आपली राजकीय सत्ता वाढविण्याकरितां सुरूं केली व तिचा शेवट त्या राजसत्तेचा नाश होऊन प्रजासत्ता वाढविण्यांत झाला आहे. अशा प्रकारची पण बिन रक्तपाताची लढाई आमच्या समाजांत चालली आहे. सर्व जातींवर आपलें धार्मिक व सामाजिक प्रभुत्व चालावें, ह्याकरितां राजकीय हक्कही आपल्याच पदरी पडावें या हेतूनें प्रेरीत झालेली एक ब्युराक्रसी आहे व तिच्या सत्ते पासून मुक्त व्हावें व सर्वांस माणुसकीचे हक्क मिळावे असें मागणारा अज्ञानांत पडलेला बहुजन समाज आहे. या समाजाच्या उन्नती करितां पुष्कळ महात्मे यत्न करीत आहेत. आर्यसमाज, ब्रह्मसमाज, सत्यशोधक समाज वगैरे संस्था लोकांत समानतेचे तत्व पसरवीत आहेत. सर्व माणसें एकाच ईश्वराची लेकरें आसल्यामुळें त्यांचे मध्यें जन्मतः उच्च नीच भाव असतो असें मानणें पाप आहे वगैरे उपदेश करून ते बहुजन समाजास त्यांच्या हकाची जाणीव करून देत आहेत. अशा प्रकारची झटापट प्रत्येक देशांत झाली आहे व होत आहे. येथें ही ती नवीन नाहीं. अशा रीतीनें झगडा चालविणें हे राष्ट्राच्या जिवंतपणाचें एक चिन्हच आहे. या लढाईंत आपली शस्त्रें काय असावीत हें मी मागील खेपेस सांगितलेंच आहे.

ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीनें सतत प्रयत्न ही आमची शस्त्रें असली पाहिजेत. पाश्चात्य देशांत भांडवलवालें व मजूर या पक्षांचें भांडण चाललें आहे असें मी पूर्वींच सांगि-

तर्के आहे. मजूर पक्षाच्या हातीं राज्यकारभार बहुतांशीं जाणें असा परिणाम या युद्धाचा झाला आहे. रशिया व जर्मनी ही निरंकुश राजसत्तेचीं दोन मोठीं पीठें होती. त्या ठिकाणी आतां मजूरपक्षाच्या नेतृत्वाखालीं प्रजासत्ताक राज्यें स्थापन होत आहेत. इंग्लंडांतही मजूर पक्षाचा जोर जास्त वाढत आहे. हालंद वगैरे तटस्थ राष्ट्रांवरही या लाटेचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. वयांत आलेल्या प्रत्येक माणसास मत देण्याचा अधिकार मिळाला ह्मणजे बहुजन समाजाच्या मताप्रमाणेंच कारभार चालला पाहिजे. अल्पसंख्येकांची सत्ता कमी होणारच ! आपणासही असेच अधिकार मिळविले पाहिजेत. व त्याकरितां स्वार्थत्याग पूर्वक प्रयत्न सतत नेटानें केले पाहिजेत.

आपण अडाणी व अशिक्षित आहों. आपणाला सुव्यवस्थित रीतीनें काम करण्याची संवय लागणें जरूर आहे. त्यासाठीं आपल्या पहिल्या शाळा ह्मणजे चाळीचाळींतील किंवा कारखान्या कारखान्यांतील सहकारी पतपेढ्या ह्या होण्यास योग्य आहेत. ह्या दिशेनेंही आपण प्रयत्न करावें. आपणापैकीं बरेच लोक गिरणींत कापड विकण्याचें काम करितात आपल्याच धंद्यांतील लोकांनीं सुमारें ६० वर्षांपूर्वीं राचडेल येथें सहकारी तत्व हुडकून काढून दुकान सुरूं केलें त्याचा परिणाम इंग्लंदच्या व जगाच्या प्रगतीवर झालेला आहे हें आपण विसरतां कामा नये. अशा सर्वोपयोगी तत्वाचा अवलंब आपण करून

त्याची वाढ केली म्हणजें आपणास आपले हक्क मिळविण्यास सामर्थ्य येणार आहे.

येथेंही इंग्लंडप्रामणें मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वांस आपले हक्क काय आहेत, हें कळलें पाहिजे. भांडवलवाल्यांत ब्राह्मण व वैश्य वृतीच्या लोकांचा भरणा विशेष आहे. त्यांना दाबांत ठेवल्या शिवाय मजुरांची उन्नति होणें कठीण आहे. मजूरदार या शब्दांत कमीपणा नाहीं. मी कोल्हापूरच्या राज्यपदावर असतांही, शिपाई शेतकरी किंवा मजूर म्हणवून घेण्यांत मला अभिमान वाटतो. माझे वाडवडील राजे होण्यापूर्वीं शेतकरीच होते. माझी जनक आई मुधोळकर घोरपडे घराण्यांतील, दत्तक आई शिरके घराण्यांतील, दत्तक बाप भोंसले कुळांतील असे शेतकरी वर्गांतीलच होतें. हलक्या दर्जाचे व अशिक्षित लोकांशीं सहवास ठेवणें बरें नाहीं, अशी पुष्कळांची समजूत आहे व मलाही तसाच उपदेश होत असे. परंतु ज्या शेतकरी व मजूर वर्गांत माझें कुळ वाढलें त्यांच्या विषयीं प्रेम व अगत्य हें जन्मसिद्ध असल्यानें अशा शिकविण्याचा परिणाम माझेवर होणार नाहीं; कारण माझ्या हाडीमासीं शिपायगिरी व शेतकरी यांचे रक्त खेळत आहे. म्हणून मला आपल्यांत मिसळण्यास आनंद वाटतो. एका थोर इंग्रज साधु पुरुषानें म्हटलें आहे कीं राजवाड्यापेक्षां गरीबाच्या झोपडींत सद्गुण जास्त सांपतात. माझा ही अनुभव तसाच आहे. इमानीपणा, बंधुप्रेम, देशप्रिती, राजनिष्ठा, मत्सराचा अभाव असे

अनेक सद्गुण मला आपले ठायीं दिसतात. ह्मणून आपले विषयीं माझे मनांत फार पूज्यबुद्धी आहे. आपणही मला आपणापैकींच एक समजावें असें आपणाकडे माझें मागणें आहे.

अशा प्रकारें या युद्धापासून आह्मी व आमचे हक्क बळकावणारे लोकांनीं बोध घेण्या सारखा आहे. या युद्धांत मित्र संघास पूर्ण यश मिळालें याबद्दल आपण ईश्वराचें आभार मानून आमच्या सार्वभौम सरकारचें अभिनंदन करूं या. ”

# आर्यधर्म परिषद्.

## अधिवेशन ११ वें.

( नवसारी– तारीख १४ डिसेंबर सन १९१८ इ० )

**माझे आर्यबंधूहो !**

आपल्या मुंबई आर्यधर्मपरिषदेच्या ११ व्या अधिवेशनाच्या आजच्या बैठकीचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यास आपण मला बोलाविलें व प्रास्ताविक भाषण करण्याचा मान मला दिला याबद्दल मी आपला फार आभारी आहे. आर्यसमाजाचें काम माज्या हातून विशेषसें झालें नसतांही माझ्या अल्पशा कामाचें आपण अशा रीतीनें कौतुक केल्यानें माझा उत्साह दुप्पट झाला आहे; व हें काम यापुढें माझे हातून जास्त प्रमाणावर होईल अशी मला उमेद आहे. आज अध्यक्ष होऊन आर्यसमाजाची सार्वजनिक रीतीनें सेवा करण्याची आपण जी संधी मला दिली आहे त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो व ही सेवा गोड करून घ्यावी अशी विनंति करितों.

विश्वव्यापी महायुद्धाचा शेवट होऊन आमच्या साम्राज्य सरकारास पूर्ण यश प्राप्त झालें व या प्रकारें न्यायाची बाजू

यशस्वी झाली व आर्य भूवर येणारें संकट टळलें याबद्दल आपण जगदीश्वरास कोटी धन्यवाद देऊं या.

आमचा आर्यधर्म ज्या तत्वांच्या पायावर उभारला आहे, तींच समतेचीं तत्वें या युद्धानें राजकीय बाबींतही सर्वमान्य झालीं आहेत. याविषयीं जास्त उल्लेख मी पुढें करीन, महार्षि दयानंद व त्यांचे गुरु स्वामी विरजानंद यांनीं जी ज्ञानज्योती या आर्यभूमींत पाजळली तिच्याविषयीं विचार केला असतां या कामीं ईश संकेत स्पष्ट होत आहे. त्या वेळची या देशची धर्मस्थिती फारच बिघडून गेलेली होती. वेदप्रतीपादित खऱ्या आर्यधर्मावर अनेक पुटें चढल्याकारणानें त्याचें शुद्ध स्वरुप दिसेनासें झालें. ऋषिप्रणित ग्रंथांचा अभ्यास लबाड व बनावटी भटजींच्या टीका, भाष्यें वगैरेच्या आधारानें होऊं लागल्यानें प्राचीन सिद्धांत बरोबर समजेनात. मनुष्याचे बुद्धीस नीचपणाप्रत नेणारी हलक्याप्रकारची मूर्तीपूजा फार वाढली. त्या मूर्तीचेपूजक आपणास पवित्र ह्मणवून घेऊं लागले. ब्राह्मणत्व वास्तविक पाहतां गुणकर्मावर लवलंबून असावयाचें तें जातीवर येऊन बसलें. तीर्थांचें काल्पनिक माहात्म्य वाढविण्यांत आलें. त्यामुळें तेथील नामधारी ब्राह्मणांस विपुल मिष्टान्न मिळूं लागून द्रव्यप्राप्तीही फार होऊं लागल्यानें त्यांच्यांत आळस व दुर्व्यसनें वाढून त्यांना विद्या शिकण्याचें अगत्य वाटेनासें झालें. मनुष्य उपजल्यापासून तों मरेपर्यंत त्याचेकडून निरनिराळे रुपानें पैसे मिळविण्याकरितां व्रतें, दानें, वगैरे विषयांचे ग्रंथ तयार केले गेले

इतकेंच नव्हे तर मेल्यावरही मृतास पोंचविण्याकरितां ह्मणून श्राद्ध, महाळ, दान वगैरे मिळावे याकरितां गरुड पुराणासारखे गारुडी ग्रंथ तयार झाले. याप्रमाणें अज्ञान्यांच्या पैशावर ब्राह्मण ह्मणविणारांची खूप चंगळ उडाल्यानें ब्राह्मणांतील विद्या नष्ट होत चालली. आपलें व अपल्या संततीचे यथास्थित चाललें पाहिजे या बुद्धीनें ब्राह्मणेतरांचीही विद्या त्यांचेकडून बंद करण्यांत आली. पुढें फल ज्योतिषशास्त्र वाढवून निरनिराळ्या ग्रहांची भीति घालून पैसे उपटण्याचा युक्त्या निघाल्या. अमुक दिवस चांगला व अमुक वाईट, अमक्या दिवशीं प्रवास करावा, लग्न, उपनयन वगैरे अमुक मुहूर्तावर व्हावे, अशीं थोतांडें काढून अनेक वेडगळ धर्मसमजुतींचा गाडा जनसमाजावर बसविला गेला. " उपाध्याय सांगेल ती पूर्वदिशा व भट सांगेल ती अमावास्या " असें झाल्यानें भट सांगेल तसें निमुटपणें वागणें हा आपला धर्म आहे व यानेंच ईश्वर प्रसन्न होतो व आपलें कल्याण होतें अशी ब्राह्मणेतरांची समजूत झाली व ते निवळ नंदी बैलाचे स्थितीस आले.

बहुजनसमाजांत खऱ्या ज्ञानाचा लोप झाल्याकारणानें देशाची मोठी हानी झाली आहे. वर्णव्यवस्था गुणकर्मामुळेंच स्थापन झाली व ती गुणकर्मावरच अवलंबून पाहिजे; पण ब्राह्मणत्व जन्मावर आहे असें मानण्यांत येऊं लागून ब्राह्मण ही जात उत्पन्न झाल्यावर इतर वर्णांचाही संबंध जन्मावर यावा यांत नवल नाहीं. अशारीतीनें जातिभेद फार वाढला.

मुळच्या चार वर्णांच्या आतां कमींत कमी ४००० तरी जाती होऊन समाज विस्कळित झाला आहे. भेदापासून द्वेष उत्पन्न झाला व देशांतील एकी नाहींशी झाली. याचा परिणाम केवळ धार्मिक अवनति होऊनच थांबला नाहीं. आर्यावर्तावर परकी लोकांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या व घरच्या फुटीमुळें बाहेरच्या शत्रूंनां फार फावलें. अशा कारणांनीं परतंत्रतेचें जूं देशाच्या मानेवर हळूंहळूं कायमचें बसलें. विद्या कमीकमी होत गेल्यानें व्यापार, कलाकौशल्य, उदीमधंदा वगैरे सर्वांस अवनति आली व एकंदर देशाची फार दैना उडाली.

परकी अंमलापासून सुटण्याचा प्रयत्न रजपूत क्षत्रियांनीं चांगलाच केला होता; पण जातिभेदानीं पोखरलेल्या समाज-स्थितींत तो यशस्वी झाला नाहीं यांत नवल नाहीं. दुसरा मोठा आणि जास्त यशस्वी प्रयत्न मराठे लोकांनीं केला व हे लोक सर्व देश जिंकतात कीं काय असें एक वेळ वाटूं लागलें; पण मराठ्यांची राज्यसत्ता हळूंहळूं पण पूर्णपणें ब्राह्मणांच्या हातीं गेल्यानें ब्राह्मण व ब्राह्मणेतर हा भेद तीव्र होऊन मराठी राज्यसत्ता नाश पावली व सर्वांस समदृष्टीनें न्याय देणारें, प्रजेस विद्या देणें हें राजाचें पहिलें कर्तव्य आहे हें जाणणारें असें इंग्रजी राज्य उदय पावलें.

इंग्रजी राज्य स्थापन झाल्यावर इकडे ख्रिस्ती मिशनरी बरेच आले, व त्यांनीं इंग्रजी विद्या देण्यास व आपल्या धर्ममताच्या उपदेशास सुरुवात केली. त्याचप्रमाणें इंग्रज सरकारांतून ही

विद्याखातें स्थापन होऊन लोकांमध्यें नवीन विचाराच्या प्रसारास सुरवात झाली. याकाळीं धर्मसुधारक असे तीन पुरुष प्रमुखत्वानें उदयास आले. ते महर्षी श्रीस्वामी दयानंद, बाबू केशवचंद्रसेन, व जोतिराव गोविंदराव फुले हे होत. या तिघांत बऱ्याच बाबतींत ध्यानांत ठेवण्यासारखें साम्य आहे. पण तिघांचीं मतें व कार्यक्रम त्यांच्या विद्येच्या व परिस्थितीच्या योगानें भिन्न भिन्न झाला आहे.

महर्षी दयानंदस्वामी हे आपल्या गुर्जर प्रांतातील आहेत, याबद्दल आपणांस अभिमान वाटणें साहजीक आहे. त्यांचें विद्या संपादन मुख्यत्वेंकरून उत्तर हिंदुस्थानांत झालें. व स्वामी विरजानंदही तिकडीलच. तेव्हां त्या प्रांतातील परिस्थितीचा परिणाम त्यांचे कार्यक्रमावर होणें साहजिकच आहे. बाबू केशव चंद्रसेन हे बंगाल प्रांतीं उदयास आले. बंगालप्रांतीं इंग्रजी अंमल सर्वां अगोदर सुरू झाल्यानें इंग्रजी विद्येचा प्रसार तिकडे जास्त झाला होता. यामुळें बाबू केशवचंद्र यांचे विचार पश्चिमेकडील–युनिटेरियनचर्चप्रमाणें झालें, यांत नवल नाहीं. महाराष्ट्र देशांतील जोतीराव फुले यांची परिस्थिती फार निराळी होती. हे ब्राह्मणेतरांतीलच एक होते. त्यांना ब्राह्मणी मतानें विद्या शिकण्याचा देखील अधिकार नव्हता, व त्यामुळें त्यांना मिळालेलें धर्मज्ञान बहुशा ख्रिस्ती लोकांनीं लिहिलेल्या ग्रंथावरून व ब्राह्मणेतरांवर आपला जोराचा अंमल चालावा ह्मणून ब्राह्मणांनीं लिहिलेल्या काल्पनीक पोथ्यावरून

मिळालें होतें. पण ते फार शोधक व विचारी असल्यानें ब्राह्मणी कावा त्यांनीं पूर्णपणें ओळखला स्वामी दयानंद यांस वेदविद्या व संस्कृत ज्ञानभांडार खुलें झालें होतें. आर्यधर्मांतील उच्च उच्च तत्वें त्यांना पूर्णपणें कळलीं होतीं. व सर्व धर्मांत आर्यधर्म कसा श्रेष्ठ आहे याची जाणीव सर्व हिंदुस्थानांत त्यांच्यापेक्षां जास्त दुसरे कोणासही नव्हती असें म्हटल्यास अतिशयोक्तीचा दोष मजकडे येईल असें मला वाटत नाहीं.

याप्रमाणें या तिघांची विद्या निरनिराळे प्रकारची होती. तशीच तेथील समाजस्थितीही भिन्न प्रकारची होती.

दक्षिण हिंदुस्थानासारखें उत्तर हिंदुस्थानांतही ब्राह्मणत्व जन्मावर येऊन बसलें आहे; पण तेथें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश व शूद्र हे चारही वर्ण अस्तित्वांत आहेत असें मानण्यांत येत असल्यानें ब्राह्मणांखेरीज बऱ्याच इतर लोकांस वेदाध्ययनाचा व इतर विद्यासंपादनाच अधिकार आहे असें समजण्यांत येतें. दक्षिणेंत तर “ कलौ अद्यंतयोः स्थितिः ” यावर जोर देऊन क्षत्रिय व वैश्यांचा पूर्ण अभाव आहे असें प्रतिपादण्यांत ब्राह्मणवर्गास मोठा आवेश येत असतो; यामुळें इकडील ब्राह्मणेतरवर्गास वेदविद्या तर बंद झालीच पण त्यायोगानें इतर विद्येचीही जवळ जवळ बंदी झाली. अशा रीतीनें उत्तर व दक्षिण हिंस्थानच्या परिस्थितींत फार मोठा फरक पडला आहे. तिकडे ब्राह्मण वर्णाचे वर्चस्व मुख्यत्वें धार्मिक बाबतींत आहे. बाकीच्या बाबतींत इतर वर्णाचे लोक परतंत्र नाहींत. यामुळें समाजाचे पारडें समतोल आहे. दक्षिणेंत

ब्राह्मणेतरांची विद्या बंद झाल्यानें सर्वच बाबतींत श्रेष्ठपणा पूर्ण-पणें ब्राह्मणांच्या हातीं गेला आहे. धार्मिक राजकीय सामाजिक, शिक्षणविषयक वगैरे सर्वत्र प्राबल्य ब्राह्मणांचे, यामुळें इतरांची स्थिती फार परावलंबी व केविलवाणी झाली आहे. ही ब्युराक्रसी मोडण्याकरितां पुष्कळ प्रयत्न झाले; पण जोंपर्यंत ब्राह्मणांच्या धार्मिक वर्चस्वावर प्रत्यक्षपणें हल्ला होऊन तें नाहींसें होत नाहीं तोंपर्यंत ब्राह्मणेतरांची परावलंबी स्थिती दूर होणार नाहीं. हें मर्म जोतीराव फुले यांनीं जाणून ब्राह्मणी सत्तेच्या अगदीं मर्मस्थानीं प्रहार करण्यास सुरवात केली. जोतीराव यांच्या सत्यशोधक समाजाचें मुख्य मत ईश्वर व भक्त यांचेमध्यें दलाल नको हें आहे. याप्रमाणें ब्राह्मणी मध्यस्थांची जरूर न ठेवतां प्रत्येकानें आपलीं धर्मकृत्यें स्वतः करावी असा उपदेश त्यांनीं सुरू केला. बहुजनसमाज ब्राह्मणी गुलामगिरींत व तज्जन्य अज्ञानांत हजारों वर्षे वाढलेला असल्यानें सत्यशोधकांचे कामास पुष्कळ अडथळा येत असतो. सुधारकांस अडचणींशीं टक्कर देणें भागच पडत असते.

वेदाचा अधिकार मनुष्यमात्रांस आहे असें श्रीस्वामी दयानंदजी यांनीं प्रतिपादन केलें, व वेदविद्या उत्तरहिंदुस्थानांत त्यांनीं वाढविली. हजारों, लाखों लोक आर्यसमाजास मिळून त्यांचीं गुरुकुलें, पाठशाळा, कन्यामहाविद्यालयें, कॉलेजें वगैरे शिक्षणसंस्था स्थापन झाल्या. वेदांचा अधिकार सर्वांस आहे, असें प्रतिपादिल्यानें मनुष्यजातीचें समानत्व पटूं लागलें व

समाजांत एक प्रकारचें उच्चप्रतीचें जीवन येऊं लागलें. व त्याचें वर्धन चांगल्या प्रकारें होऊं लागलें. स्वामी दयानंद यांच्या मतांचा प्रसार उत्तर हिंदुस्थानांत झपाट्यानें झाला, पण नर्मदेच्या दक्षिणेस त्यानाही जास्त जास्त विरोध होऊं लागला. याचें कारण मी आतांच वर्णिलेल्या ब्राह्मण-ब्युराक्रसीचें सामर्थ्य हें आहे. पुणें मुक्कामीं स्वामीजींचा मुक्काम असतांना त्यांचीं सुविचार परिप्लुत भाषणें ऐकल्यावर आर्य-समाज मत हें आपणांस विष आहे हें ब्राह्मण ब्युराक्रसीस कळून आलें; व स्वामीजींच्या मिरवणुकीस विरोध करण्याकरितां म्हणून गर्दभानंद सरस्वतीची मिरवणूक काढण्याची हलकट क्लृप्ति त्यांच्या डोक्यांतुन निघाली. इकडील ब्राह्मणवर्ग मूर्तिपूजेंत अगदीं गढलेला. त्यांना मूर्तिशिवाय दुसरें काय सुचणार! आपल्या समाजाचें यथार्थ चित्र अशी गर्दभाची मूर्तीच त्यांनीं स्वामीजींच्या पुढें आणून आपल्या खऱ्या योग्यतेची व स्वरू-पाची जाणीव सर्वांस करून दिली. त्या ठिकाणीं गोड शब्द किंवा युक्तिवाद उपयोगी नाहीं. असेंच ब्राह्मण ब्युराक्रसीस वागविलें पाहिजे हें जोतीराव फुले व त्यांचे अनुयायी यांनीं चांगलें ओळखलें होतें व जशास तसे अशा रीतीनें ब्राह्मणांविरुद्ध उपदेशास सुरवात केली. खऱ्या धर्मविद्येचा व धर्माचा प्रवेश या दक्षिणभूमीत व्हावयास पाहिजे असेल तर सत्यशोधक समा-जासारख्यांनीं ही भूमी त्या कामास योग्य अशी तयार केली पाहिजे. अशा रीतीनें जमिनीतील तण व खडक फोडून काढिले म्हणजे आर्यधर्माचें बीज चांगले रुजेल व वृद्धीपावून सर्वांस

सुरू होईल. ब्राह्मणधर्म कोणताही एक ग्रंथ प्रमाण मानीत नाहीं. सर्व धर्मांत असलेला चांगुलपणा मधुकर वृत्तीनें घेऊन त्या धर्मांचीं तत्त्वें ठरविण्यांत आलीं आहेत. पण अशी विवेचक बुद्धी फारच थोड्यांस असल्यानें हीं मतें फारच थोड्या लोकांस पटणार, यामुळें ब्राह्ममतांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होणें शक्य दिसत नाहीं.

आर्यसमाज वेदाच्या दृढपायावर स्थापिलेला आहे. वेदांइतका जुना ग्रंथ कोणताही नाहीं. वेदांचें प्रमाणत्व या आर्यावर्तांत बहुतेकांस कबूल आहे. वेदांविषयीं पुज्यबुद्धि बहुतेकांच्या मनांत आहे. वेदांचा कधिकार आपणास असावा असें पुष्कळांस वाटतें, व यामुळें हें मत फार लवकर प्रसार पावतें. या आर्यावर्तांत या आर्यधर्माचा प्रसार जास्त जास्त प्रमाणावर होत जाणार यांत संशय नाहीं.

हा आर्यावर्त देश पूर्वीं कधींही एकराष्ट्र नव्हता; पण हल्लीं एकच इंग्रजीराजछत्र सर्वांवर असल्याकारणानें राष्ट्रैक्याची भावना उत्पन्न होऊं लागली आहे, व ती हळूं हळूं वाढतही जात आहे. ही कल्पना अशी वाढण्याच्या कामीं आर्यसमाजाची कामगिरी वाखणण्यासारखी आहे. आर्यसमाज हा या देशांतील आर्यलोकांस, मग ते कोणत्याही जातीचे किंवा पंथाचे असोत, त्यांस आपणांत मिसळून घेतो. इतकेंच नाहीं तर जे आर्यवंशाचे नाहींत, अशा लोकांसही आपणांत मिसळून घेऊन

आर्यांचे सर्व अधिकार, बेटी-रोटीव्यवहारासह त्यांस देतो. मग यूरोपखंडांतील व अमेरिकेंतील ट्यूटानिक वंशाचे लोक, जे आर्यवंशाचेच आहेत असे सर्व विद्वान् कबूल करितात, त्यांस घेण्यास तर तो केव्हांही पाऊल मागे घेणार नाहीं. पूर्वी आर्यवंशाचे लोक सर्व उत्तरध्रुवाच्या प्रदेशांत एकत्र रहात असत. पुढें तो प्रदेश सोडावा लागल्यावर त्यांच्या टोळ्या पुर्वेकडे व पश्चिमेकडे गेल्या, त्यांतील पश्चिम आर्यांच्या वंशातील आतां यूरोपांतील बलाढ्य राष्ट्रें आहेत व पूर्वेकडे आलेल्या आर्यांचे वंशज आम्हीं आर्यावर्तवासी आहों; तेव्हां आम्हांस यूरोपीयन व त्यांचेच वंशज अमेरिकन हे परकी नाहींत. पश्चिमेकडील मोठमोठ्या वीरांनीं जसें लॉर्ड किचनेर, जनरल फ्रेंच, मार्शल फॉक् वगैरेनीं, रणांगणांवर लढून आपलें क्षात्रतेज सर्वांच्या प्रत्ययास आणून दिलें आहे. आपल्या मतानें ते क्षत्रिय आहेतच व त्यांची इच्छा असल्यास आपण त्यांस आर्यधर्माची दिक्षाहि द्याल. हजारो वर्षें आम्ही व पश्चिमेकडील आर्यलोक निराळे राहिल्यानें त्यांच्या व आमच्या आचार विचारांत फार फरक पडला आहे. परंतु कांहीं मूलभूत तत्वें त्यांच्यांत व आमच्यांत एकच आहेत. जातिभेद ते मानीत नाहींत. आमच्याही खऱ्याधर्मास तो भेद मान्य नाहीं. फक्त बनावटी ब्राह्मणी हिंदुधर्म हा स्पर्शा-स्पर्शास महत्व देत असून जातिमत्सर वाढवीत आहे. पण खरा आर्यधर्म संग्राहक आहे. याचे योगानें भिन्न भिन्न जातींचा, पंथांचा व धर्मांचा एकोपा होण्यास मदत होणार आहे.

युरोपांत, अमेरिकेंत व जपानांत समानतेचें तत्व प्रचारांत असल्यानें एकाच कुटुंबांत भाऊ भाऊ, नवरा–बायको वगैरे भिन्नधर्माचे आढळतात. तसाच प्रकार नवरा आर्यसमाजी तर बायको इतर धर्माची किंवा बायको आर्यसमाजी तर नवरा इतर पंथाचा असेंही एका कुटुंबांत सलोख्यानें सांपडणें अशक्य नाहीं. कुटुंबांतील भाऊ भाऊ निराळे पंथाचे किंवा धर्माचे राहतील. प्रत्येकास विचार व आचार स्वातंत्र्य पाहिजे. आर्य समाज तें देत आहे. ब्राह्मणी हिंदुधर्म तसें स्वातंत्र्य देत नाहीं. ह्मणून त्याच्यापासून फूट वाढत असून आर्यधर्मापासून एकोपा वाढणार आहे. एक राष्ट्रीयत्वाचे कामीं याचा फार उपयोग आहे.

पण आमची नजर नुसत्या एक राष्ट्रीयत्वानेंच कुंठीत होतां कामा नये. नुकत्याच संपलेल्या महायुद्धांत प्रत्येक राष्ट्र आपल्या देशाच्या प्रेमानेंच लढाईंत शिरलें. पण आतां सर्वांची एक सोसाइटी आफ नेशन्स करण्याचे विचार तिकडील थोर मुत्सद्यांचे मनांत घोळत आहेत. राजकीय बाबतींत ऐक्य होण्याचा दिवस जवळ येत आहे. तसेंच सामर्थ्य आर्य धर्माचेही आंगीं आहे. सर्वत्र आर्य धर्माचा घोष करण्याची आकांक्षा आपण धरणें योग्य आहे.

आर्यधर्माचे हे महत्कार्य लक्षांत आणूनच आमचे सिसोदवंशीय उदेपुरचे महाराणा सज्जनसिंह व आमचे जोधपूरचे महाराज प्रतापसिंह यांनीं या धर्ममताच्या प्रसारार्थ

चांगलीच खटपट केली आहे. व ज्याला या देशाचे खरे कल्याण व्हावें असें वाटत असेल त्यानें आपणाकडून होईल तितकी मदत या कामीं केली पाहिजे.

बनावटी ब्राह्मणी धर्माला सनातन असें मोठें नांव देऊन त्याचें महत्व अज्ञानांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केलेला वारंवार दिसून येतो. सनातनतत्वें ह्मणजे वेदांनीं प्रतिपादिलेलीं. ती फार चांगलीं आहेत. पण त्यांस झांकून ठेऊन धूर्त लोकांनीं पुराणें व स्मृत्या यांत फार घुसवाघुसव केली आहे. आपणास व आपल्या जातींच्या लोकांस खूप चैन करण्यास मिळावी ह्मणून पुराणांत व भारत वगैरे ग्रंथांतही अनीतीस उत्तेजन देणाऱ्या गोष्टी लिहून ठेविल्या आहेत. अशा ग्रंथांस धर्मग्रंथ ह्मणण्यास लाज वाटली पाहिजे. असले हे ग्रंथ अगर यातील हे वाईट भाग ऋषीप्रणीत खात्रीनें नाहींत. इंग्रजी राज्यांत आमचे डोळे उघडल्यानें आह्मांस आतां हे अनिष्ट प्रकार दिसून येत आहेत. आतां आह्मी याचा तीव्रपणें निषेध करणे जरूर आहे.

दक्षिणहिंदुस्थानची धार्मिक व सामाजिक स्थिती किती शोचनीय आहे हे मी आपणास पूर्वीं सांगितलेंच आहे. यांतही जास्त फूट पाडण्यास ब्राह्मण ह्मणविणारे कसा प्रयत्न करीत असतात याचें उदाहरण खुद्द माझेंच सांगतों. "राजा असल्यानें आपण विष्णुचा अंश आहा ह्मणून आपण क्षत्रिय आहां.

९०४०

आपले घरीं आम्ही वेदोक्तकर्मे करण्यास तयार आहों" असें धूर्त ब्राह्मण मला ह्मणतात. या युक्तीनें माझ्या इतर ज्ञातबंधूंत व माझ्यांत फूट पाडण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. त्याचप्रमाणें मराठे लोकांत ही निरनिराळी कारणे लावून अमुक श्रेष्ठ ह्मणजे सच्छूद्र, अमुक कनिष्ठ असे सांगून ते फूट पाडित असतात. यासाठीं आर्यसमाजाचे प्रयत्न याच प्रांतात विशेष झाले पाहिजेत. बनावटी धर्मगुरूंचा सुळसुळाट; नाशिक, पंढरपूर, वगैरे क्षेत्रांतच फार असतो. तेव्हां त्या त्या ठिकाणीं आपल्या शाळा, गुरुकुलें, उपदेशमंदिरें झाली पाहिजेत. व खऱ्या धर्माचें ज्ञान वाढविले पाहिजे. नामदार पटेल यांनीं हिंदुस्थानच्या कायदे कौन्सिलांत आणलेल्या बिलास पुष्टि देण्याचा ठराव आपल्या अधिवेशनांत आपण आणणार आहां हें फार चांगलें आहे. जातीभेदामुळें रोटी बेटी व्यवहारास फार अडचण येऊन समाजांत फार फूट झाली आहे. राष्ट्रीय भावना वाढण्यास आपल्या समाजाचे कार्य किती उपयोगी आहे हे मी आताच सांगितलें आहे. नामदार पटेल यांचे बिलहि याच दिशेनें उपयोगी आहे. जातीजातींत विवाह संबंध होऊं लागल्याशिवाय जातीभेदाची तीव्रता कमी होणार नाहीं. या बिलास विरोध करण्याचे कामीं प्रत्येक प्रांतांतील ब्राह्मण वर्गच पुढें येत आहे. व यांत त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. आपले बनावटी वर्चस्व नाहींसे होण्याची वेळ जितकी लांब टाकवेल तितकी टाकण्याची ही सारी धडपड आहे. बहुतेक सगळा ब्राह्मणेतर समाज या कामीं या बिलास अनुकूळ

आहे. व त्याप्रमाणें सभाभरून ठिकठिकाणीं ठराव होत आहेत. नामदार भूपेंद्रनाथ बसू यांनीं पूर्वीं अशाच प्रकारचे एक बिल आणले होते. त्यावेळींहीं धर्म बुडेल अशी ओरड या मतलबी लोकांनीं केली होती. त्या बिलाच्या धर्तीवर लग्नसंबंधीं कायदे इंदूर, बडोदा, व कोल्हापूर या आर्यधर्मी राज्यांत पास झाले आहेत पण तेथें धर्म बुडत असल्याचे चिन्ह कांहींच दिसून येत नाहीं. धर्म म्हणजे भटाची दक्षिणा हा अर्थ असल्यास तिला मात्र धोका आहे हें स्पष्ट आहे व ही दक्षिणा सर्वस्वी बुडाल्यास देशाचे कल्याण होईल.

माझे भाषण शांतपणें ऐकून घेतलें व आपण माझा जो बहुमान केला त्याबद्दल आपले मी आणाखी एकवार आभार मानतों. आर्यधर्माचे ज्ञान सर्वत्र प्रसार पावून त्या योगानें या देशाची चिरकाल टिकणारी उन्नती होवो व सर्व जगांत शांति आणि आनंद फैलावो अशी ईश्वराची प्रार्थना करून मी आपलें भाषण संपवितों.

# हिंदुस्थानांतील सर्व कुर्मी क्षत्रियांची
## १३ वी परिषद्.

( कानपूर-तारीख १९ ते २१ एप्रील सन १९१९ इ० )

**प्रिय क्षत्रिय बंधूहो,**

मी तुमच्यापैकींच आहे. मला मजूर समजा, अगर शेतकरी समजा. माझे वाडवडील हाच धंदा करीत होते. जें काम माझे पूर्वज करीत होते तेंच काम करणाऱ्या लोकांनीं अध्यक्ष होण्याकरितां मला आज बोलाविलें आहे याबद्दल मला अत्यानंद होत आहे. मी कांहीं ज्ञानी नाहीं अगर लायखहि नाहीं. माझ्यापेक्षां हुशार लोक पुष्कळ आहेत. माझ्या लायकीकडे लक्ष न देतां मी केवळ शेतकरी व महान् पराक्रमी शिवाजी महाराज व त्यांच्या स्नुषा ताराबाई महाराणी साहेब यांच्या वंशांतला आहे. म्हणून अध्यक्षाचा हा मोठा मान मला आपण दिला आहे. ज्यावेळीं आपली आज्ञा मला झाली त्यावेळीं मुंबईंत मी तापानें अतिशय आजारी होतो. परंतु आपल्या सर्वांच्या आशीर्वादानें मी लवकर बरा झालो. तथापि माझ्यापुढे डोंगरासारखी मोठी अशी एक अडचण आली. ती

अडचण कोणती ह्मणाल तर हिंदींत भाषण करण्याची ! तीन दिवसपर्यंत आगगाडीतच तिचा अभ्यास करून आपल्यापुढें भाषण करण्याचा मी निश्चय केला. माझी ही मातृभाषा नाहीं. शिवाय ही लिपीहि मला अपरिचित असल्याळें आमचे परमपूज्य स्वामी परमानंदजी माझें भाषण वाचून दाखवितील जे माझे नातलग आहेत व ज्यांना मी पित्यासमान व गुरूसमान लेखितो असे माझे परमपूज्य गुरु ह्मसेराव जाधव हे येथपर्यंत आलेले पाहून मला दुप्पट आनंद होत आहे. आपली सेवा करण्यास मला दुप्पट शक्ति देण्याबद्दल मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो. पुढेंही आपली आज्ञा होईल तशी सेवा करण्यास मी तयार आहे.

मी आणखी एका मुद्यावर बोलणार आहे. या विषयावर बोलण्याचें हे स्थल नव्हे. परंतु आपल्या सभोंवतीं काय चालले आहे तिकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. आजकाल जो बखेडा चालूलेला आहे, तो मला मिळकूळ पसंत नाहीं. इंग्रज सरकारांनीं आह्मांला विद्यादान दिलें नसतें तर हा झगडा कधींहि चालला नसता. सरकारांनीं विद्यारूपी अमृताचें दान आह्मांला द्यावें व त्याच्या ऐवजीं आह्मीं सरकारला विष पाजावें, हें परस्पर विसंगत नव्हे कां ? ज्यानीं आह्मांला विद्यामृत पाजिलें ते आंह्मांला पारतंत्र्यांतून (बेडा) खात्रीनें मुक्त करतील. तुह्मांला जें कांहीं पाहिजे आहे तें ज्याप्रमाणें मूल आईबापांजवळून मागून घेतें, त्याप्रमाणें, ह्मणजे प्रेमानें

व जोरानें सरकाराजवळ मागा; तें सरकार खात्रीनें देईल. माझी पूर्ण खात्री आहे कीं जसें प्रेमानें काम होतें तसें तें सक्तीनें कधींहि होत नसतें.

माझ्या प्रकृतीला बरें नाहीं व एथील हवाही उष्ण असल्यामुळें मला बरें वाटत नाहीं. म्हणून मला कॉनफ्रन्स करतां तिन्ही दिवस हजर राहतां येणार नाहीं. याबद्दल आपण मला क्षमा कराल अशी आपल्यास दोन्ही हात जोडून विनंति करतो. तिचा स्वीकार कराल अशी मला आशा आहे.

रुचं नो धेहि ब्राह्मणेषु रुचं राजसु नस्कृधि ।
रुचं विश्येषु शूद्रे मयि धेहि रुचा रुचम् ॥ ४८ ॥

हे परमेश्वरा ! आमच्या ब्राह्मणांमध्यें तेज धारण कर. आमच्या क्षत्रियांमध्यें तेज धारण कर. आमच्या वैश्यांमध्यें आणि शूद्रांमध्येंहि तेज धारण कर. माझ्या अंतःकरणामध्येंही तुझ्या ज्योतीचा प्रकाश पाड. अशी माझी तुला प्रार्थना आहे.

प्रियबंधूनो ! प्रथम मी असें विचारतों आपल्या सभेचें अध्यक्ष स्थान देण्याकरतां मला आपण एक हजार कोसांवरून कां आमंत्रण केलें ? काय ? आपल्या या प्रांतांत माझ्या सारखा क्षत्रिय कोणी नाहीं ? आहेत. माझ्या पेक्षांही अधिक आहेत त्याच्यापैकीं एकाद्यास न निवडतां माझ्याकडे आपली दृष्टी कां गेली ? माझ्या हातून प्रजेची सेवा विशेषप्रकारें घडली म्हणून मला हें आमंत्रण दिलें कां ? आपणास याचें कारण सांगण्यास

संकोच वाटत असेल, म्हणून तें मीच सांगतों. ज्या शिवछत्रपतिनें सिसोदिया क्षत्रिय वंशांत जन्म घेऊन आपलें सर्व आयुष्य पातिव्रतांचें रक्षण करण्यांत, दीन प्रजेचें रक्षण करण्यांत व आर्यधर्माचें रक्षण करण्यांत खर्चिलें. त्या क्षत्रियकुलावंतस श्रीमहाराज शिवाजी याचें यशोचिन्ह आपल्या हृदयांत प्रतिबिंबित झालें असलें पाहिजे. अशा शिवाजी महाराजांच्या पुत्रपौत्रांपैकीं मी एक आहे. म्हणून आपण मला हें अध्यक्षस्थान मुद्दाम आमंत्रण करून दिलें असावें. यापेक्षां मला दुसरें कोणतेंहि कारण दिसत नाहीं. कांहींहि असो, आपण आपल्या जातीच्या सभेचें अध्यक्षस्थान देऊन जो माझा आदरसत्कार केला आहे त्याबद्दल आपल्या सभेला तसेंच तिच्या कार्यकर्त्यांना मी अंतःकारणापासून धन्यवाद देतो. मला जें कांहीं बोलावयाचें आहे त्याचा आरंभ करतो. जर माझी मातृभाषा हिंदी असती तर जसा आपल्याला आनंद झाला असता तो आपल्यास होणार नाहीं, तरी माझें भाषण आपण शांतचित्तानें ऐकून घेऊन आपला उदारपणा दाखवाल अशी मला आशा आहे.

भारतवर्षांतील प्रत्येक प्रांतांत उन्नतीचीं चिन्हें दृष्टीस पडूं लागलीं आहेत. ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. हिंदुस्थानच्या प्रत्येक प्रांतांत दिवसानुदिवस ज्ञातिसभा व धार्मिकसभा अधिकाधिक होऊं लागल्या आहेत. सध्यां जितक्या धार्मिकसभा आगर ज्ञातिसभा आहेत, त्यांकडे मी अनुकूल

दृष्टीनें पहात असून त्यांची भरभराट व्हावी अशी माझी मनापासून इच्छा आहे. कारण त्यांचें द्वारें शिक्षण, समाजसुधारणा, धर्मप्रसार वगैरे किती तरी परोपकाराच्या गोष्टी झाल्या आहेत. व होत आहेत. पुढेंसुद्धां या सभांचें ध्येय असेंच उच्च राहिल्यास पुष्कळ उन्नति होईल अशी मला आशा आहे. या जागृतीचें कारण काय ? याचा विचार केल्यास आपल्यास तीन महत्वाची कारणें दिसून येतील. पहिलें व सर्वांत श्रेष्ठ कारण वाटलें ह्मणजे ब्रिटिश गव्हरमेंटचें शांततेचें राज्य होय. दुसरें इंग्रजी शिक्षण. तिसरें धार्मिक आचार्यांचा धर्मप्रचार. भारतवर्षीयांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, या न्यायशील ब्रिटिश गव्हर्नमेंटपासून झालेल्या उपकारांचें विस्मरण न होऊं देतां आपण सदैव राजनिष्ठ राहिले पाहिजे. त्याचप्रमाणें धार्मिक आचार्यांचेही उपकार विसरूं नयेत. विशेषेंकरून ज्यानें धार्मिक स्वराज्य देऊन प्रजेला धार्मिक दास्यत्वापासून मुक्त केलें, त्या वैदिकधर्मोद्धारक महर्षि दयानंद सरस्वतीला विसरूं नका. इंग्रजी शिक्षणापासून भारतवासीयांना तिसरा डोळा आला आहे, हा केवढा मोठा फायदा आहे बरें प्रथम आह्मी कोण होतो, आमची काय स्थिति होती, आता काय स्थिति आहे, पुढें आमची काय स्थिति होईल वगैरे गोष्टींचें ज्ञान होत आहे. ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. भारतवर्षांत ज्या सभा, देश, जाति, धर्म, समाज सुधारणादि कार्यें करीत आहेत त्यां सर्वांबद्दल माझी अंतःकरणपूर्वक सहानुभूति आहे. या सर्वांच्या कार्यांत मी मिसळून असतो. व याच भावनेनें मी आपल्या

समेंत आलो आहे. आतां विशेष कांहीं न बोलतां अपल्या मुख्य विषयाकडे वळतो. ज्या देशांत आपण रहातो त्या देशाचें नांव आर्यावर्त असें आहे. याला आर्यावर्त ह्मणण्याचें कारण असें कीं येथें प्रथम आर्य लोकांनीं वसाहत केली. या देशाचें रहिवाशांना आर्य म्हणत असत. आर्यांचें मूळ स्थान तिबेट ( त्रिष्टिप, तिब्बात ). आर्य प्रथम दोन वर्णाचे होते. एक आर्यवर्ण व दुसरा दस्युवर्ण. हे सर्व एकाच आई-बापापासून जन्मलेले होते.

आर्यांच्या गुणकर्मांचा स्वीकार करून दस्युलोकांना आर्य होतां येत असें. आर्यलोक दस्युचे गुणकर्म स्वीकारून दस्यु बनत असत. आर्यांचीं सामाजिक कार्यें जसजशी वाढूं लागलीं तसतशी तीं करण्याकरितां चार वर्णांची स्थापना झाली. 'निरुक्त' मध्यें वर्ण शब्दाचा अर्थ असा दिला आहे 'वर्णो वृणोति' नि-अ-२-खं. ३

अर्थः--वर्णाचा स्वीकार करता येतो ह्मणून, अगर वर्णाच्या योग्यतेचे गुण प्राप्त करून घेऊन मनुष्य वर्णाचा स्वीकार करतो, शिवाय वर्णाचें परिवर्तनहि होतें ह्मणून, वर्ण याला वर्ण असें ह्मणतात.

धर्म्मचर्य्ययाजघन्यो वर्णः पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जातीपरिवृतौ । अधर्म्मचर्य्यया पूर्वो वर्णो

जघन्यं वर्णमापद्यते ॥ जाति परिवृतौ ।
आपस्तम्ब ॥ २ ॥ ८ ॥ ७

धर्माचरणानें खालचा वर्ण वरच्या वर्णांत जाऊं शकतो. तसेच वरचा वर्ण अधर्माचरणानें नीच वर्णाप्रत जातो. वैदिक काळापासून ते महाभारताच्या काळापर्यंत ही मर्यादा राहिली. ब्राह्मणवर्णाचें कर्म ( अध्यापनं अध्ययनं यजनं याजनं तथा ॥ दानं प्रतिग्रहश्चैव ब्राह्मणानामकल्पयत् ( मनु )

( अर्थ- वेदांचा सांगोपांग व समजून उमजून अभ्यास करणें, दुसऱ्यास शिकविणें. दुसरें, यज्ञ आदिकरून कर्म स्वतःकरणें, व दुसऱ्यांकडून करविणें, तिसरी गोष्ट दान घेणें, आणि देणें.

## ॥ श्लोक ॥

शमो दमस्तपःशौचं क्षांतिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥

अर्थ- शांति, मनोनिग्रह, तप, आंतुन व बाहेरून स्वच्छता, क्षमा, सरळपणा, ज्ञान, विज्ञान, ( इश्वर, जीव, प्रकृती यांचें ज्ञान ), आस्तिकभाव, हीं ब्राह्मणांचीं कर्में होत.

## ॥ क्षत्रियांचें कर्म ॥

प्रजानां रक्षणं दानमिज्याऽध्ययनमेव च ।
विषयेष्वप्रसक्तिश्च क्षात्रकर्म स्वभावजम् ॥
शौर्य्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रकर्म स्वभावजम् ॥

### क्षत्रियांचें कर्तव्य.

प्रजेचें रक्षण करणें, प्रजेच्या कल्याणाकरितां दान देणे, होम करणें वेदाचें पठण करणें, युद्ध करणें, निर्भयपणें राहणें, धैर्यवान होणें, युद्धांत चातुर्य विषयांत न सफणें युद्धांतून परत न फिरणें, प्रजेच्या रक्षणासाठीं सर्वस्व अर्पण करणें, ईश्वरावर दृढ विश्वास ठेवणें हें क्षत्रियांचें स्वाभाविक कर्तव्य होय.

## ॥ वैश्यांचें कर्म ॥

पशूनां रक्षणं दानमिज्याऽध्ययनमेव च ।
वणिक् पथं कुसीदं च वैश्यस्य कृषिमेव च ॥ (मनु)

### वैश्यांचें कर्तव्य.

जनावरे पाळणें व त्यांची वाढ करणें, दान देणें यज्ञादि कर्म करणें वेदांचें सांगोपांग अध्यायन करणें, देशावर जाऊन व्यापार करणें, सावकारी करणें, शेतकी करणें हे वैश्यांचें कर्तव्य आहे.

# ॥ शूद्रांचें कर्म ॥

परिचर्य्यात्मकं कर्म शूद्रास्यापि स्वभावजम् ।

( मनु )

## शूद्रांचें कर्तव्य.

शिल्पकलेचें ज्ञान मिळविणें व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांचें कामांत मदत करणें हें होय. वैदिक काळांत अशा तऱ्हेची स्वतंत्रता होती कीं जो कोणी एखाद्या वर्णाचें कर्तव्य करी त्याला त्या वर्णांत सामील करून घेतले जाई. वेद-आदिकरून शास्त्रांचा अभ्यास करण्यास प्रत्येक स्त्रिपुरुषास अधिकार होता. वैदिक काळांत सर्व वर्गाचे लोक ऋषी झालेले आहेत. जोपर्यंत स्त्रिया मंत्र जाणणाऱ्या होत्या तोपर्यंत आर्या-वर्त स्वर्गाप्रमाणें होता 'स्त्रियांनीं व शूद्रांनीं वेद वाचूं नयेत' अशा कल्पित श्रुतीचा आवाज आकाशांतूनसुद्धां काढूं देत नसत. त्यावेळीं शूद्रांनीं वेद ऐकिले तर त्यांचे कानांत शिसें कढवून ओतले जात नसे. ज्या वेळीं वर्ण व्यवस्था वंशपरंपरा रजिस्टर झाली तेव्हां एका वर्णाच्या मनुष्याला दुसऱ्या वर्णाचें काम करणें कठिण होऊं लागलें. आणि लोक आपापल्या वर्णांतील कर्तव्यापासून हळुहळु सुटूं लागले, समाजाची घडी बिघडूं लागली. शेवटीं जी वर्णव्यवस्था गुण कर्मावर अवलंबून होती ती जन्मावर येऊन बसली. या प्रकारचे नियम करून त्याविरुद्ध

कोणाची ब्र काढण्याची छाती होऊं नये ह्मणून तें स्मृतीमध्यें घुसडून दिलें.

वर्ण व्यवस्था जन्मावर आहे. ह्मणजे ज्याचे आईबाप ब्राह्मण त्यालाच ब्राह्मण ह्मणावे. दुसऱ्या कोणालाही ब्राह्मण ह्मणतां कामा नये. तसेंच ज्याचे आईबाप क्षत्रिय तोच क्षत्रिय मग त्याचें अंगीं क्षत्रियाचे गुण असोत वा नसोत. ज्याचे आईबाप वैश्य तोच वैश्य. ज्याचे आईबाप शूद्र तो शूद्र. मग त्याचें अंगीं कितीही श्रेष्ठ प्रतीचे गुण असोत. जे जुने ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य, गुण कर्मावरून श्रेष्ठ होऊन जन्माचा अभिमान जसजसें धरूं लागले तसतसें नव्या मनुष्याला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य होतां येईनासे झाले. या पद्धतीच्या योगानें हिंदूंची जी अधोगती झाली ती इतिहास वाचणाऱ्याला पूर्ण अवगत आहे. याच समयीं चार वर्णाच्या पांच हजार जाति झाल्या. यामुळें हिंदूंचें सामाजिक बळ ऱ्हास पावूं लागलें. प्रत्येक जात दुसऱ्या जातीशीं खाणें पिणें करित नसून लग्नसंबंधही करित नाहीं. एका जातीवर जुलूम होऊं लागला तर दुसरी जात डोळे उघडून पहात रहाते. त्याबद्दल तिला थोडीहि दया येत नाहीं. खरोखर मानवी प्राण्यांची एकच जात आहे. जातीचें लक्षण शास्त्रकारांनीं असें लिहून ठेविलें आहे:—

**समान प्रसवात्मिका जाति ॥ न्यायशास्त्रम्:**

अर्थ ज्यांचेमध्यें समान भाव, समान आकृति, व समान उत्पत्ति आहे त्यांची एक जात समजावी. याप्रमाणें व्याकरण

शास्त्रामध्येंही लिहून ठेविले आहे कीं ज्यांची आकृति समान त्यांची जात एक. जसें मनुष्य, गाय, घोडा, हत्ती, वड, पिंपळ वगैरे वृक्ष.

आमच्या हिंदू लोकांची अशी समज आहे कीं हिंदुस्थानाखेरीज इतरत्र वर्ण व्यवस्था नाहीं, आह्मीच आर्यांचे वंशज आहो. तसें दुसरे कोणी नाहीं. हा आमचा भ्रम आहे. ऐतिहासिक जग याच्या उलट आहे. आमच्याप्रमाणें दुसरेही आर्यवंशज आहेत. आमच्या प्रमाणें इतर देशांतही वर्णव्यवस्था आहे. आमच्यांत व त्यांच्यांत फरक हा आहे कीं, दुसऱ्या देशांत वर्णव्यवस्था गुणकर्मांवर अवलंबून आहे. पण आमच्या येथें ती जन्मावर अवलंबून आहे. त्यांचे येथें वर्णाचें परिवर्तन याच जन्मांत होतें. पण आमचे येथें जन्मजन्मांतरीसुद्धां त्याचें परिवर्तन होत नाहीं. हा सर्व रुढीचा महिमा आहे. वेदादि शास्त्र तरी याच्या उलट आहे. मनुस्मृतिमध्यें असें लिहून ठेविलें आहे कीं,

शनकैस्तु क्रियालोपादिमाःक्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गताः लोके ब्राह्मणादर्शनेनच ॥
मनु० ॥ अध्या० १० ॥ श्लो० ४३ ॥

अर्थ—क्षत्रियांच्या जातीमध्यें उपनयन संस्काराचा लोप झाल्यामुळें व ब्राह्मणामध्यें नुसत्या दर्शनानें मनुष्य वृषल होतो ह्मणजे संस्कारहीन होतो.—त्यांना काय नांव दिले ?

श्लोक–पौण्ड्रका श्चौन्ड्रद्रविडाः काम्बोजाः
यवनाः शकाः । पारदापल्हवाश्चीनाः
किराता दरदाः खशाः ॥

मुखबाहूरुपज्जानां या लोके जातयो बहिः ।
म्लेक्षवाचश्चार्यवाच सर्वे ते दस्यवः स्मृताः ॥

पौण्ड्र, चौड्र, द्रवीड, कंबोज, यवन, शक, पारद, प्ररदब, चीना, किरात, दाद, वगैरे ब्राह्मणादि वर्ण क्रियेचा लोप झाल्यामुळें संस्कारहीन झालेले दुसऱ्या देशांत दुसऱ्या जातींच्या नांवानें वाखाणूं लागलें. पैकीं कांहीं म्लेंछ व कांहीं आर्य भाषा बोलणारे होते त्या सर्वांनां दस्यू ह्मणू लागले. केवळ अन्यजातीमध्यें वेदोक्ताचा संस्कार लोप पावला ह्मणूनच नव्हेतर ब्राह्मणाच्या अज्ञानामुळें व अत्याचारी वर्तनामुळेंही ही म्लेंच्छ जात उत्पन्न झाली.

उदाहरण विष्णु० पु० । अ०

विष्णु पुराणाच्या चवथ्या आध्यायांत असें लिहून ठेविलें आहे कीं, त्रिशंकुच्या वंशांत बाहू नामक एक राजा होऊन गेला. तो हैहय, ताल, जंघादि क्षत्रियांना हार जाऊन आपल्या राणीसह अरण्यांत पळून गेला. पुढें कांहीं दिवसांनीं तो मरण पावला तेव्हां त्याची राणी त्याच्या बरोबर सती जाऊं

लागली. ती गर्भवती असल्यामुळें ऋषीनें तिला सती जाण्यास प्रतिबंध केला व ह्मटलें कीं, हे राज्ञी, तुझ्या पोटीं एक पराक्रमी पुत्र होईल व सर्व क्षत्रियांचा नाश करील. राणी सती न जाता ऋषीच्या आश्रमांत राहूं लागली त्या ऋषीचें नांव वसिष्ठ. पुढें तिला पुत्र झाला. त्याचे नांव सगर ठेवून त्यास ऋषीनें क्षात्र विद्या शिकविली. सगर मोठा झाल्यावर त्यास सर्व हकीकत त्याचे आईकडून कळली. तेव्हां क्षत्रियाबरोबर युद्ध करण्यास गेला व त्यानें क्षत्रियांस जर्जर करून सोडले. यामुळें सर्व क्षत्रिय वसिष्ठास शरण गेले. तेव्हां ऋषी सगरास ह्मणाला, हे पुत्रा आतां ह्या क्षत्रियांना मारूं नको. मी या क्षत्रियानां त्यांच्या धर्मापासून व द्विजत्वापासून वेगळे केले आहे. यांनां जिवंत पणीच मारून टाकिले आहे. हे आतां जिवंत मुडदे आहेत. आणि सगरानें याक्षत्रियांच्या वंशाचें परिवर्तन करून टाकिले. कित्येकांची शेंडी काढून त्यांना यवन हे नांव दिले. कित्येकांची दाढी काढून त्यांनां शव हे नांव दिले. कित्येकांचे केस राखून त्यांनां पतहद हे नांव दिले; आणि त्यबरोबरच वेद आदि करून शास्त्रांचा अभ्यास करण्याचा अधिकार काढून घेतला. क्षत्रिय धर्मापासून त्यांना काढून टाकिले. अशाच प्रकारें परशुरामाच्या अत्याचारानेंही पुष्कळ क्षत्रिय क्षत्रियवर्णापासून पृथक होऊन दुसऱ्या जाती बनल्या. आमच्या या देशात हजारो जाती झाल्या. अशाच प्रकारें कोणत्या तरी समयीं आपली ही जात क्षत्रियापासून पृथक झाली असावी.

याप्रमाणें परिवर्तन ऐतिहासीक जगांमध्यें कित्येकवेळा झाले व होतही आहे. व पुढेही होईल. हा नैसर्गिक नियमच आहे. महाभारताच्या काळा पर्यंत येथील क्षत्रियांचा विवाह दुसऱ्या देशांतील क्षत्रियाबरोबर होत असे. हें महाभारत ग्रंथावरूनच दिसून येण्यासारखे आहे. अर्जुनाचा विवाह उलूपीबरोबर, धृतराष्ट्राचा गांधारी बरोबर वगैरे झाले. महाभारताच्या पूर्वीही कांहीं राजांचा विवाहसंबंध दुसऱ्या देशांतील राजांच्या बरोबर झाला आहे असें इतिहासच सांगतो. आतां पुढें विशेष कांहीं न सांगतां आपल्या विषया संबंधानें दोन शब्द सांगणेचे आहेत. जर तुह्मी अन्तःकरण पुर्वक क्षात्र धर्म स्विकारणार असालतर आपले मी अन्तःकरणपूर्वक स्वागत करतों. तुह्मी क्षत्रीय झाला आहां. क्षत्रिय वर्णाचें गुणकर्म स्विकार करा व आपल्या देशांतील दुःखी प्रजेचें रक्षण करण्यास कंबर बांधा. आपल्यास क्षत्रिय होण्यास वेदादि शास्त्राकडून अधिकार आहे. परमेश्वरानें आपल्याला साधनही करून दिले आहे. मला वाटतें जर प्रत्येक मनुष्य चारी वर्णांची योग्यता प्राप्त करून घेईल तेव्हां देशाची सुधारणा होईल; परंतु आपल्याला एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. हा विद्येचा समय आहे. सर्वांच्या अन्तःकरणामध्यें ज्ञानाचा प्रकाश पडला आहे. नुसत्या जन्मानें क्षत्रिय अगर ब्राह्मण झालेल्या लोकांचा आतां कोणीही आदर करणार नाहींत. आपण गुण कर्मानें क्षत्रिय व्हा. नांवाच्या क्षत्रियांच्या यादींत तुमच्या नांवाची भर घालूं नका. तसेंच

आम्ही पूर्वी क्षत्रिय होतों, अमुक वंशांत आम्ही जन्मलों वगैरे वगैरे वितंड वादांत पडूं नका. आपला कोणाशीही संबंध असो वा नसो उन्नतीकरून घेण्यास हा मार्ग उत्तम नव्हे. सेन्सस रिपोर्टाचे अधिकारी व दुसरे कोणीही आपल्यास कांहींही ह्मणोत त्याबद्दल मुळींच फिकीर करूं नका आपल्या जातींत वेदोक्त संस्कार, वेदोक्त कर्माचा प्रसार व सदाचाराची वाढ करा. आपल्या मुलांना शिक्षण द्या, असहाय व गरीब बांधवांना मदत करा.

कुरमी क्षत्रियांमध्यें विधवा विवाह प्रचलीत असलेला पाहून मला मोठा आनंद होतो आपली क्षत्रिय जात भ्रुणहत्या, व्यभिचारादि पापापासून सुरक्षित राहील असा माझा विश्वास आहे. हा आपद्धर्म आहे. मनुष्यसमाज निर्दोष राखण्याकरितां हें आहे. वेदादि शास्त्राचें याला पाठबळ आहे. अमच्या गव्हर्नमेंटनेंही विधवा विवाहाचा कायदा पास केला आहे. ज्या जातीमध्यें या आपद्धर्माचा प्रचार नाहीं त्याजातींत भ्रुणहत्या, व्यभिचार आदिकरून पाप घडत आहे व हजारो मुलें प्रत्येक वर्षी मरत आहेत ही किती दुःखाची गोष्ट आहे बरें !

भारतवासीय लोक उन्नतीची तीन मुख्य साधनें समजतात. ती ही पहिले साधन पडदा, दुसरे विधवाविवाह निषेध, व तिसरें कोणाशीही मिळून भोजन न करणें.

काय आश्चर्य आहे! कोल्हापूर राज्य संस्थापक महाराणी ताराबाई, महाराणी सती अहल्याबाई, झांशीची महा-

राणी लक्ष्मीबाई, महाराणी कमळाबाई आदि करून क्षत्रिय स्त्रियांनीं राज्याचा गाडाही हाकलेला आहे व रणांगणावर जाऊन शत्रुबरोबर लढायाही मारलेल्या आहेत. हें सर्व काम पडद्यांत राहून केवळ अशक्य होतें. सध्यांही पडद्याची चाल सर्व देशांत नाहीं. महाराष्ट्र, मद्रास, गुजराथ वगैरे प्रांतांत पडदा बिलकूल नाहीं.

दुसऱ्या प्रांतामध्येंही कांहीं थोड्या जातींमध्येंच पडदा आहे. पडद्यामुळें स्त्रियांमधील शूरतादि गुणांचा सर्वथा नाश होतो. आपला निर्वाह कृषिकर्मावर विशेषेंकरून होतो हें ऐकून मला मोठा आनंद होतो. कृषिकर्म इतके पवित्र आहे कीं वैदिक काळांत वर्षांतून एकदां चक्रवर्ती राजा व त्याचा मंत्रीही ( कृषिकर्माची उन्नती करण्या करितां ) नांगर हाकीत असत. ज्याच्या योगानें भूमिमध्यें एक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्य जात उपजिविका करते तें कृषिकर्म हलके अथवा वाईट असें मी मुळींच मानीत नाहीं. मी माझ्या युवराजाला कृषिविद्या शिकण्याकरितां विलायतेला व अलाहाबादला कृषिस्कूलमध्यें पाठविलें होतें. आपल्याला माहित आहेच कीं, कृषिकर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख होऊन सर्व मनुष्यजातीलाही सुख मिळतें कृषिकर्माबरोबर पशुपालन व रक्षण यांचाही संबंध येतो. याकरितां आपल्याला पशुपालनासंबंधींही पुष्कळ काम करावयाचें आहे. दूध तूप वगैरेची समृद्धी देशामध्यें झाली पाहिजे.

कृषिकर्म करतांना क्षात्र धर्माला बाध येतो असें नाहीं. ज्यांवर मनुष्य समाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे तें कर्म करणारे नीच आहेत शूद्र आहेत हें ह्मणणें मला मुळींच पटत नाहीं.

युरोपांत शेतकरी लोक प्रतिष्ठित समजले जातात; तेथील शेतकरी राज्यांतील उच्चदर्जाच्या नोकरीवर आहेत. तसेंच तिकडे शिल्प कलेमधील लोकांचीही प्रतिष्ठा मोठी आहे. जो आज चांभार अथवा भंगी आहे तो थोड्याच दिवसांत नामदार होतो. त्यांना चांभार अथवा नीच असें ह्मणण्याचें साहस कोणाचेंही अंगीं नाहीं. याचें कारण असें आहे कीं शिल्पकला सर्वस्वी त्यांच्याच हातांत असते. येथील लोक निर्धन व अज्ञानी असल्यामुळें येथील शिल्पकलेची सुधारणा कशी होईल! सुशिक्षित B. A., M. A. झालेले लोक हें काम अशा साठीं हातीं घेत नाहींत कीं आह्मांला शूद्र ह्मणतील, आम्हाला नीच समजतील. अशानें देशांत ऐश्वर्य कसें वाढेल! व ऐश्वर्या शिवाय देशाची उन्नती होणार नाहीं.

हे परमेश्वरा, आमच्या देशांतील लोकाना सुबुद्धि देऊन त्यांच्या अन्तःकरणांत ज्ञानाचा प्रकाश पाड. आम्ही सर्व माणसे आपले सद्गुणी चिरायू पुत्र होऊन बंधु प्रेमामें राहो. दुसऱ्याचें दुःख तें आपलें दुःख व दुसऱ्याचें सुख तेंच आपलें सुख असा आमचा समज होऊं दे. सर्वजण मिळून शारिरिक,

आत्मिक, व सामाजिक उन्नती करून संसाराला स्वर्गधाम बनवूं या. शेवटी कुरमी क्षत्रियांना धन्यवाद देऊन आपली मंगल कामना पूर्ण करावी व आपल्या जातीच्या सभेची दिवसेंदिवस भरभराट होवो अशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतों.

# आर्यधर्म परिषद.

( भावनगर—तारीख ६ ते ८ मार्च सन १९२० इ० )

सज्जनहो! आपण जरा भारत वर्षाच्या गत इतिहासावर दृष्टिपात करूं. हजार वर्षांपूर्वीच्या व आतांच्या भारत वर्षांत जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. आज पराक्रम, विद्वत्ता, धर्मशीलता, उदारतादि सद्गुण लुप्त झालें आहेत. हजारो कुसंस्कार, चालीरीति यांनीं भारत वर्ष ग्रासून गेलेला पाहून कांहीं आश्चर्यहि वाटत नाहींसें झाले आहे. बाल-विवाह, बहुविवाह, मद्यपान, स्त्रियांना शिक्षणास मज्जाव, वर्णाश्रमधर्माची अव्यवस्था वगैरे अनेक सामाजिक घातकी रुढींनीं समाज निर्जीव करून टाकला आहे.

उदाहरणार्थ वर्ण व्यवस्था घ्या. संपूर्ण भारत विशेषतः महाराष्ट्रादि दक्षिण प्रांतांत ब्राह्मणेतर जातींची अवस्था अत्यंत शोचनीय आहे. ह्या जातींना पुढें सरसावण्यास व प्रगति करून घेण्यास संधीच दिली जात नाहीं. आज २० व्या शतकांत अस्पृश्य गणले जाणारे देखील प्राणी आहेत. त्यांचा अपराध एवढाच आहे कीं, त्यांनीं एखाद्या विशिष्ट जातीमध्यें जन्म घेतला नाहीं. आज भारत वर्षांत ऐक्य, प्रेम व सहकार्य

कोठेंही पहावयास मिळत नाहीं. याचें कारण आमची स्वतःचीच मूर्खता होय. भारत वर्षामध्येंच अशीं मनुष्यें वर्तमान आहेत कीं, ज्यांनां आपल्या बंधूंची छायाहि आपणांवर पडणें दुःसह होतें. स्वतःचे स्वतःस उच्च समजणारे लोक मिथ्या जात्याभिमानाच्या निशेंत अगदीं निमग्न होऊन राहिले आहेत व नीच म्हणविल्या जाणाऱ्या जातींवर मन मानेल तसें अत्याचार करून राहिले आहेत.

मनुष्याला त्याच्या योग्यतेनुसार उच्च नीच वर्ण देणें हा वैदिक आदर्श होता. मुनि लोकांनीं " धर्मचर्यया जघन्यो वर्णः पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जाति परिवृत्तौ । अधर्मचर्यया पूर्वो वर्णः जघन्य जघन्य वर्णमाद्यते जाति परिवृत्तौ " असा उपदेश केला. त्या ठिकाणीं पौराणिक लोकांनीं ब्राह्मण न जातेः ब्राह्मणः अशी व्युत्पत्ति करून ब्राह्मणादि जन्मवाचक अर्थ करण्यास आरंभ केला. मनास येईल त्याप्रमाणें ग्रंथरचना सुरूं केली. ( स्त्री शूद्रो नाधीयताम् ) हा जणूकाय वेदमंत्रच कंठस्थ करविला. याचा परिणाम असा झाला कीं, स्त्री व शूद्र यांनीं ज्ञानमार्ग बंद झाला. बराच काळ अशी स्थिती राहिल्यामुळें शूद्र स्वतःस अस्पृश्यच समजून राहिले. मग काय ब्राह्मणांचें साधलें व त्यांनीं ब्राह्मणत्वाचा मक्ता आपणांकडे घेतला.

ब्राह्मणांचें जीवन पारमार्थिक जीवन आहे. जेव्हां पासून योग्यते प्रमाणें उच्च नीचत्वाची पारख नष्ट झाली तेव्हां पासून नामधारी गुरुवर्गाची खूप चंगळ उडाली. जन्मापासून मृत्यु-

पर्यंत तर तें लुटलें तर्पणादि लुटलेंच परंतु त्यानंतरहि " श्राद्ध " अवडंबरें माजविलीं.

सज्जनवृंद! जेव्हां देशनौकेचे कर्णधार ब्राह्मण स्वार्थी बनले होते, तेव्हां " अष्ट वर्षा भवेद्गौरी " हा अवैदिक पाठ उच्च स्वरानें ह्मटला जात होता व राष्ट्रीयत्व जवळ जवळ नष्ट झालें होतें. आणीबाणीचें समयीं ह्याच काठेवाड प्रांतांत जेथे आपली ही परिषद भरली आहे त्या भावनगर समीप मौरवीगांवीं आपल्या स्वदेशाच्याच जागृति साठीं नव्हे तर अखिल भूमंडळ जागृत करायासाठीं महर्षि दयानंदाचा जन्म झाला. त्यांनीं तपश्चर्या केली. वेदाध्यायन केलें, भारतखंडाच्या अवनत स्थितीचें परीक्षण केलें आणि निःस्वार्थ बनून मतमतांतरांचा जो अग्नि भारतांत प्रज्वलित होता त्यामध्यें उडी ठोकली! पदभ्रष्ट ऋषि संतानास पुनः सन्मार्गावर आणून सोडले, चोहोंकडे जागृति केली, लोकांनीं त्यांना गालिप्रदान केलें, व त्यांच्यावर दगड धोंड्याची वृष्टी केली, व शक्य तितका त्यांचा तिरस्कार केला. परंतु या सर्व मानापमानाची मुळींच पर्वा न करतां त्या महर्षि तपस्वी त्यागी श्री. दयानंदांनीं वैदिक धर्माचा डंका वाजविलाच! नामधारी ब्राह्मणांचा पोटशूळ आरंभ झाला, त्यांनीं दयानंदऋषींची गति कुंठित करण्याचा होता नव्हता तो प्रयत्न केला, पण ईश्वरीय चाल कोणत्या शक्तीस कुंठित करणें शक्य होतें! त्यांच्या केवळ दहा वर्षांच्या गर्जनेनें पंजाब, संयुक्तप्रांत, राजपुताना, बंगाल बिहारादि खडबडून जागे झाले. लाखों लोक त्यांचे

अनुयायी बनले व उत्तर भारतवर्षांतच काय आज संपूर्ण भारत-खंडांत अवैदिकीय पाठा ऐवजी ' ब्रह्मचर्येण कन्या वा युवानं विंदते पतिम् ' शूद्रे ' ब्राह्मणतामति ब्राह्मणो यति शूद्रताम् ' हा वैदिक पाठ सुरु झाला!

आर्यसमाजाचें कार्य जगास विदितच आहे. स्पर्शास्पर्शतेचें काल्पनिक बंड मोडून समाजानें युद्धांतही फार मदत दिली आहे. परदेशगमनानें मनुष्य पतित समजले जात असत तेच आतां वांछनीय समजले जात आहेत. आर्यधर्म यच्चयावत मानवसमाजाकरितां आहे. आनंदाची गोष्ट ही कीं, पुष्कळ युरोपियन स्त्रीपुरुषानीं या आर्य धर्माचा स्वीकार केला आहे व करित आहेत. खरें ह्मणाल तर लॉर्ड किचनेर, सर हेग, लॉर्ड फ्रेंच प्रभृतींची गणना पहिल्या पासूनच आर्यांमध्यें होऊं शकते. कारण कीं, या योद्ध्यांनीं क्षात्रियोचित धर्माचें परिपालन केलें आहे. माझ्या मतें हाच धर्म फक्त शासित शास्त्यांत प्रेमरज्जूनें ऐक्य करण्यास प्रयत्न करीत आहे. मला पूर्ण भरवंसा आहे कीं, हा आर्य धर्म विश्वव्यापी धर्म बनेल. याच धर्माचे अनुयायी सर प्रतापसिंह व सज्जनसिंह वगैरे नरेश आहेत व होते ही अभिमानस्पद गोष्ट होय. आह्मांलाही त्यांचेंच अनुकरण केलें पाहिजे. ही पण संतोषाची गोष्ट होय कीं, अद्यापिही जरी स्वार्थी लोक इतस्ततः हातपाय आपटतात तथापि खरे ब्राह्मण व सुशिक्षित जनता ही सर्व आह्मांला अनुकूल आहे. परंतु दक्षिण प्रांतांतही अद्याप पुष्कळसें कर्तव्य

बाकी आहे. आर्यांचें हें कर्तव्य आहे कीं या देशांत भ्रातृभाव जागृत करावा.

जरी ' सत्यशोधक समाजा ' दि समाजांनीं कांहींशी सुधारणा केली आहे. तथापि ह्या संस्थांनीं विशेष अधिक कांहीं होऊं शकणार नाहीं. कारण त्या ' शठं प्रतिशाठ्यं ' या तत्वावर चालत आहेत परंतु देशाला जागृत करणारी रामबाण मात्रा वैदिक धर्मच आहे. कारण हिंदुमात्राच्या अंतःकरणांत वेदाभिमान वसत आहे व आर्यसमाज वेदानुकूल राहण्यांतच आपला धर्म समजत आहे. आर्यसमाजाचा धर्म ' जगावर उपकार करण्याचा आहे.

सज्जनानो ! वैदिक धर्माचें महत्त्व अन्यमतापेक्षां अधिक आहे हें समजूनच मी या धर्माचा स्वीकार केला आहे.

राजाराम कॉलेज, हायस्कूल, गुरुकुल, अनाथालय, सरदार बोर्डिंग वगैरे सर्व संस्था मी आर्य प्र. सभा संयुक्तप्रांत हिच्या आधीन एवढ्याच उद्देशानें केल्या आहेत कीं, लोकांची मानसिक सुधारणा व्हावी व ती सुधारणा विद्येच्याद्वाराच शक्य आहे.

ह्मणून विद्येची सूत्रें मी आर्य समाजाच्या हातीं देऊन टाकली आहेत.

मला जें कांहीं शक्य झालें तें मी केलें आहे. माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे कीं, माझ्या जोतिबा, पंढरपूर

वगैरे क्षेत्रामध्यें देखील आपण गुरुकुलें, हायस्कूलें, समाज स्थापन करावेत. माझें कर्तव्य होतें तें मी करून टाकलें आहे. आतां पुढील कर्तव्य सर्वस्वी तुमच्या हातीं आहे.

जर इतक्यावरहि वैदिक धर्म झाला नाहीं तर ह्यांत श्रीमति आर्य प्र. सभा व आपण हेच दोषी व्हाल. माझी इच्छा आहे कीं थोडेसे सच्चे कर्मवीर माझ्याकडे ही आपला समय लावतील.

आर्य बंधूनो! आपणां मधून अद्याप कर्महीनता नाहीशीं झाली नाहीं. जरी ऋषींची प्रेरणा सुशिक्षीत समुदायामध्यें दृग्गोचर होत आहे, देशांतील सर्व समाज, सभा, सोसायट्या वैदिक सिद्धांतानुसार कर्तव्य बजावीत आहेत, 'यथेमां वाचं कल्याणि' ह्या वेदाज्ञेनुसार आर्य समाजानें गुरुकुलें, अनाथालयें, कॉलेजें वगैरे संस्था स्थापून भेदभाव रहीत सर्व जातींच्या लोकांमध्यें वेदवाणीचा प्रचार केला आहे, तरी आह्मीं अद्याप ऋषींचें शतांशानें कर्मवीर बनलो नाहीं. अकर्मण्यतेचा हा समय नव्हे. कर्मण्यता पाहिजे आहे. उदाहरणार्थ, पटेल बिल घ्या. त्या बिलानुसार आपण वागण्यास प्रारंभ केला पाहिजे. वेदप्रतिपादित गुणकर्मानुसार आपण कृतीनें वर्णव्यवस्था पाळीत आहों हें सिद्ध करण्याची आतां वेळ आली आहे.

मी आपला बराचवेळ घेतला; परंतु आपण लक्षपूर्वक उत्साह दाखवून माझें भाषण ऐकून घेतलें त्याबद्दल मी आपले

पुनः अंतःकरणपूर्वक आभार मानुन शेवटीं आपणां सर्वांस विनयपूर्वक सांगतों कीं, ऋषि दयानंदाच्या कार्याची आपल्या हृदयावर कांहीं छाप पाडली असेल तर याद राखा कीं, ह्या काठेवाड भूमींमध्येंच बाळ मूलशंकरानें कठीण प्रतिज्ञा करून गृहत्याग केला होता, तर आपणहि या तीर्थ स्थानाहून परत जातांना कठीण प्रतिज्ञा करावी कीं, वैदिक सिद्धांत व विचार आह्मी कृतींत आणण्यासाठीं यत्किंचीतहि कसूर करणार नाहीं. बंधूहो! अंती सत्याचा जय आहे हें लक्षांत बाळगून ऋषीचें मिशन प्रसृत करण्याचा प्रयत्न करा व कामास लागा! परमात्मा तुह्मांस बळ देईल; कारण कीं, कर्मवीरांचा सहाय्यकर्ता तोच ईश्वर आहे. ॥ ॐ शम् ॥

( माणगांव येथें ता० २२ मार्च १९२० रोजीं अस्पृश्य वर्गाच्या परिषदेच्या वेळीं. )

आज माझे प्रिय मित्र आंबेडकर यांनीं या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें आहे. त्यांच्या भाषणाचा लाभ मला मिळावा म्हणून मी शिकारींतून बुध्या येथें आलों आहे. मि० आंबेडकर हे मूकनायक पत्र काढतात व सर्व मागसलेल्या जातींचा परामर्ष घेतात; याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों.

अस्पृश्य लोकांची हजेरी माफ करण्याची बुद्धी मला कां झाली याचें कारण याप्रसंगीं थोडक्यांत सांगावें असें मला वाटतें. हजेरी असल्यामुळें या गरीब लोकांवर गांवकामगार व इतर ऑफिसर्सचा फारच जुलूम होत होता. म्हणजे गांवांत बारा आणे मजूरीचा दर असला तरी गैर हजरीची भीति घालून त्या गरीब लोकांकडून अधिकारी लोक फुकट काम करून घेत होते. फार झालें तर त्यांच्या पोटाला म्हणून कांहीं तरी थोडेसें देत होते.

गुलामगिरीपेक्षां सुद्धां या विसाव्या शतकांत अशी गुलामगिरी चालली आहे! ज्यांना ही हजेरी होती त्यांना त्याप्रमाणें

आपल्या जवळचे आप्तइष्ट पै पाहूणे कोणी आजारी पडल्यास त्यांना तावडतोड भेटतां येत नव्हतें. व कित्येक प्रसंगी तशी भेट न होतांच ते मरतही होते. मीं असें प्रत्यक्ष पाहिले आहे कीं, कित्येक वेळां लहान आजारी मुलांच्या आयांना व बापांना वेळीं अवेळीं जबरदस्तीनें वेठीस धरून नेल्यामुळें तीं लहान आजारी मुलें त्यांच्याकडे लक्ष देण्यास कोणीच नसल्यानें त्यांचे आईबाप परत आल्यावर तीं मेलेलीं त्यांना सांपडली आहेत. यापेक्षां जास्त जुलूम काय असावयाचा!! त्याचप्रमाणें बलुते-दाराकडून वरिष्ट दरजाच्या लोकांनीं कामें करून घेणेंचीं व मागाहून त्यांना कांहीं देत नाहीं ह्मणून सांगणेंचें असें प्रसंगही पुष्कळदां येतात. कोणी जास्त तक्रार केली तर तुला हजेरींत घालीन अशी भीति घालतात.

पाटील कुलकर्णी वगैरेंचीं घरें वगैरे बांधणेंचीं कामें असलेस गोरगरीब मराठे, सूर्यवंशी, सोमवंशी ( अस्पृश्य लोक ) वगैरे रयत लोकांकडून त्यांना धमकी घालून नियमापेक्षां फाजील बलुतें देवविणेंसही गांवकामगार लोक कमी करीत नाहींत. गांवांत एखादी चोरी झाली ह्मणजे तर या हजेरीवाल्या लोकांची दैना फारच होते. चांगल्या वाईट सर्व लोकांना धमकावण्यांत येऊन त्यांच्यावर अनेक तऱ्हेचे जुलूम होतात. गुन्ह्याचें मान पाहिलें तर मी स्वतःच्या अनुभवावरून असें सांगूं शकतों कीं, हजेरीच्या लोकांपेक्षां बिनहजेरीच्या लोकांतच गुन्हेगारांची संख्या जास्त आहे. मात्र बिनहजेरीच्या लोकांना हजेरी लावून बेशरम केल्यानें त्यांची

प्रवृत्ती गुन्हा करणेंकडे होते. एवढा हजेरीचा उपयोग होत होता. त्यांना अब्रूनें व प्रतिष्ठेनें वागण्याचा फायदा काय ? कोणत्याही स्थितींत हजेरी पाठीशीं लागलेलीच आहे. व बेअब्रु कायमचीच आहे. मग त्यांनीं चांगले रीतीनें तरी कां वागावें, असा त्यांचें मनावर परिणाम हजेरीनें होत आहे. मी हजेरी बंद केल्यापासून गुन्ह्याची संख्या कमी झाली आहे. कारण प्रत्येकास अब्रुनें वागावें असें वाटतें.

बलुतेदारांचीं भांडणें मारामाऱ्याही बंद झाल्या आहेत. तलाठी नेमण्याची पद्धत सुरूं होऊन जरी फार दिवस झाले नाहींत तथापि त्यामुळेंही गांवांतले तंटे व लिटीगेशन बरेंच कमी झाले आहेत, असें माझ्या नजरेस आलें आहे.

परंतु वेठ वरळा मात्र मला कमी करितां येईना. कारण हे सर्व लोक वतनाच्या मागें लागत आहेत, तें वतन तरी किती ? २ आरे जमीन अगर पाटीभर धान्य ! यांत कोणाचें पोटतर भरत नाहीं, परंतु तशा स्थितीनें वतनाच्या आशेनें गांवीं राहणें भाग पडल्यानें पोट भरण्याकरितां चोऱ्या वगैरे गुन्हे करण्याशिवाय त्यांना दुसरा मार्गच उरला नाहीं. म्हणून मी सर्व बलुतेदारांस व महार वगैरे वतनदारांस अशी विनंति केली कीं, अशी लहान लहान वतनें व बलुतीं यांच्या मागें तुम्ही लागूं नका. तीं सोडून द्या. व विशेषेंकरून महार लोकांना मी अशी विनंती केली कीं, तुम्हीं साधारण माणशीं दहा एकर जमीन वांट्याला येईल असें तुमच्या सरकीचे

तुकडे करा व हें उत्पन्न तुमच्यातील जे वडील असतील त्याच्या-कडे जसें पाटील सनदी शिलेदार यांच्याकडे चालतें तसें चालवा म्हणजे गांवास फक्त आठ महार शिलेदाराप्रमाणें अगर सनदी शिलेदाराप्रमाणें नेमा म्हणजे त्यामुळें गुलामगिरी नाहींशी होईल. व त्यांना मी नवीन सनदा देण्याची तजवीज मोठ्या खुषीनें करीन. असें झाल्यानें बाकीच्या महार लोकांस गांवांत अगर बाहेर गांवीं कोणताही धंदा करण्यास मोकळीक होईल. आणि सर्वांनीच जें अर्धपोटीं राहावयाचें तेंही वांचेल. हें माझें म्हणणें करवीरच्या महारांनीं कबूल केलें आहे व त्यांचें अनुकरण सर्व करतील अशी माझी खात्रीं आहे, व माझे प्रियमित्र मि० आंबेडकर हे या कामीं मदत करतील अशी मला पूर्ण आशा आहे.

याप्रसंगीं आमचे विख्यात एज्युकेटेड मि. केशवराव व मागसलेल्या करितां झटणारे रावबहादूर बाबू कालीचरण वगैरे असते तर फारच मदत झाली असती. तसेंच सर्व पाटील लोकही मला या कामांत मदत करतील अशी माझी पूर्ण उमेद आहे. आमच्या येथील सुप्रसिद्ध व्यापारी रामभाऊ शिरगांवकर यांचेंही मला या कामीं पाठबळ मिळेल अशी मला पूर्ण आशा आहे.

मी हजेरी बंद केली याबद्दल मला असे ही प्रश्न झाले होते कीं, आजपर्यंतच्या हजेरीचे लोक निदान ब्रिटिश वगैरे

परहद्दींत जातील तेव्हां तरी त्यांना त्यांच्या संबंधानें आगाऊ वर्दी मिळावी असें तारीख ३०।५।१९ रोजीं सातारा पोलीस सुपरिटेंडेंट यांचें लिहून आलें होतें; यावर अतिनम्रपणें मीं तारीख ४।६।१९ रोजीं उत्तर दिलें कीं, ज्याअर्थी मी हजेरी अजीबात माफ केली आहे; त्याअर्थी आपल्या इच्छेस मान देणें अशक्य झालें आहे. परंतु गुन्हेगार लोकांचे दाखले मग ते स्पृश्य असोत व अस्पृश्य असोत मी मोठ्या आनंदानें देत जाईन. व जे खरोखरच चांगलेपणानें वागणारे अस्पृश्य लोक आहेत, त्यांना जन्मभर गुन्हेगाराप्रमाणें वागविणेंस माझें अन्तःकरण मला सांगत नाहीं. याप्रमाणें हजेरी बंद केले गोष्टीची हकीकत आहे.

कांही लोक तलाठी पद्धतीसंबंधानें माझ्यावर असा आक्षेप करितात कीं; जर वतनदार लोकच नोकरींत नको आहेत तर मग पाटील तरी कशाला पाहिजेत? नाहीं नाहीं, तसें नाहीं. पाटील कां पाहिजेत याची कारणें आहेत. कोणीही अजाण अशिक्षित माणूसही कबूल करील कीं, खेडेगांवांत कोणीतरी जबाबदार असा एक कामगार असला पाहिजे. असें जर आहे, तर माझ्यामतें तो पाटीलच पाहिजे. कारण कीं, एक तर कुलकर्णी वतनदाराप्रमाणें तो उपलाणी नाहीं. त्याचीं उत्पनें बादशाही सनदांचीं आहेत. त्यांनीं गांवें वसविलीं आहेत. आणि दुसरे ज्या जातीचे लोक ज्या गांवांत ज्यास्त प्रमाणानें आहेत, त्याच जातीचा पाटील बहुधा तेथें नेहमी

असतो. व कुलकर्यांच्या जातींचे लोक गांवांत हजारीं एक सुद्धां मिळणें दुर्मीळ. कुलकर्ण्यांच्या मागें त्याचे जातीचे अधिकारी वर्ग वकीलशाही व नोकरशाही यांचा पाठिंबा असल्यानें गांवांतील सर्व लोक त्याला भितात व गांवच्या खऱ्या हिताच्या कोणत्याही गोष्टीकडे त्यांचें दुर्लक्षच असतें. ज्या अधिकारी वर्गाचें त्यांना पाठबळ असतें त्यांना आवडेल तीच गोष्ट तो शट्टन करीत असतो व त्या लोकांच्या हिताच्या व सुखाच्या गोष्टीकडे त्याचें लक्ष्य असल्यामुळें गांवांतून गरीब लोकांवर जुलूम करूनही त्या त्या गोष्टी त्याला कराव्या लागतात. परंतु पाटलांची स्थिती तशी नाहीं. निरुपाय झाल्याशिवाय पाटील लोक तसें सहसा करीत नाहींत. कारण त्यांचे जातीचे लोक गांवांत जास्त असल्यानें त्यांचेंच हित पहाणें हें त्याला भाग पडतें. मात्र एका गांवांत दोन पाटील असले ह्मणजे दुही माजून त्यांच्यामध्यें तंटे बखेडे उत्पन्न होतात व ते वाढविण्याकडे लबाड लोकांची प्रवृत्ती असते. ज्या गांवांस एक पाटील आहे तेथें गुन्ह्याचें मान कमी असतें हा अनुभव आमच्या मुलकी अधिकारी वर्गास आहेच.

मी अस्पृश्य वर्गाकरितां जे अल्प स्वल्प यत्न केले आहेत, ते एक लहानशा पुस्तकरूपानें बाबुराव यादव यांनीं प्रसिद्ध केले आहेत, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणें या कामीं सत्यशोधक समाज, आर्यसमाज व अमेरिकन मिशनसुद्धां हे मला मदत करीत आहेत. त्याबद्दल मी त्यांचाही आभारी

आहे. परंतु कमनशिबाची गोष्ट ही कीं, आमचे सुशिक्षित पुढारी वर्गापैकीं फारच थोड्या लोकांचे प्रयत्न या बाबतींत मनोभावें करून होत आहेत. तथापि हळूहळू आपले सर्व समाज या दुर्भागी लोकांच्या कल्याणासाठीं ज्यास्त झटत जातील अशी मला उमेद आहे.

आजच्या सभेचे अध्यक्ष मि० आंबेडकर यांचें करणें मला नापसंत आहे. कारण महार, मांग, चांभार, ढोर हे खरोखर वैश्य जातीचे असून व विशेषतः महार लोक पूर्वी महारकी सूत काढून व्यापार करीत असतां त्यांना अस्पृश्य कोणी ठरविलें असेल कोण जाणे. असा वैश्याचा धंदा सोडून दस्यु ह्मणजे नोकर आणि नोकर ह्मणजे अतीशूद्र. तेव्हां आंबेडकरांनीं असा हा धंदा कां पतकरला आहे मला कळत नाहीं. तथापि मी येथें जमलेल्या सर्व लोकांस हीच विनंती करितों कीं, आतांपर्यंत आह्मीं निकृष्ट अवस्थेस पोंहचणेंचें कारण आह्मीं आमचा योग्य पुढारी योजून काढीत नाहीं. गोड बोलून नांव लौकिक मिळविण्याच्या हेतूनें आमच्या पैकीं कांहीं आप्प-लपोटी मंडळी अयोग्य पुढारी नेमून देऊन अज्ञानी लोकांना फसवितात. पशुपक्षी देखील आपल्याच जातीचा पुढारी करितात, पक्ष्यांत कधीं चतुष्पादाचा पुढारी झाला नाहीं. चतुष्पादांत कधींही पक्ष्यांचा पुढारी नसतो. गाय, बैल, मेंढरें यांत मात्र धनगर त्यांचा पुढारी असतो. त्यामुळें शेवटीं त्यांना कसाब खान्यांत जावें लागते !

ज्यांचें प्रमाण हजारीं एक सुद्धां नसून जे मागसलेल्यांना खुद्द क्षत्रियांना ( ज्यांनीं यांचा मोंगलापासून बचाव केला व ज्यांचे पूर्वज रामकृष्ण सूर्यवंशी सोमवंशी क्षत्रिय हे ज्यांच्या देव्हाऱ्यावर आहेत त्यांना ) सुद्धां शूद्र ह्मणून गोमय काय विष्ठेपेक्षांही अस्पृश्य मानितात व स्पर्श झाला ह्मणजे जे स्वतःची शुद्धि करून घेतात; असे पुढारी काय कामाचे ? पाश्चिमात्य देशांत अगर इतर कोणत्याही देशांत असले पुढारी कोण कबूल करील ?

पशुहून काय ? गोमय किंवा विष्टेहूनही कमी दर्जाचे आपल्या बंधुभगिनींना व देशबांधवांना मानणाऱ्या लोकांनीं पुढारी व्हावयाची इच्छा करणें कितीतरी बेशरमपणाची गोष्ट आहे ! मला ज्या वेळीं मुखत्यारी मिळाली त्या वेळीं ब्राह्मणेतर एकही वकील अगर नोकर नव्हता; परंतु त्यांना वकीलीचें ज्ञानामृत पाजल्यापासून ते वाकबगार झाले आहेत. त्याचप्रमाणें अस्पृश्य मानिलेल्यां लोकांना नोकऱ्या व स्पे० केस करून वकीलीच्या सनदा दिल्या आहेत. यांत ते इतर लोकाप्रमाणें वाकबगार होतील अशी उमेद आहे. मी लवकरच सेल्फगव्हर्मेंट थोड्या प्रमाणावर देणार आहे, त्याचा फायदा सर्वांना व विशेषतः अस्पृश्य मानिलेल्यांनाहीं सारखा मिळावा ह्मणून कम्यूनल रिप्रेझेन्टेशनही देणार आहे.

कित्येक ह्मणतात कीं, राजकारणाचा व स्पृश्या-स्पृश्यतेचा काय संबंध आहे ? कांहीं संबंध असल्यास आह्मी तसें

ही करूं. पण मी ह्मणतों अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणें वागविल्याशिवाय राजकारण कसें होणार. ज्यांना राजकारण करणें आहे; त्यांनीं मनुष्याला मनुष्याप्रमाणें ह्मणजे इतर देशांत वागवितात त्याप्रमाणें वागविलें पाहिजे. आणि तसें वागविल्याशिवाय देशकार्य कसें होणार? आणि असें जो वागवील त्यानेंच देशकार्य केलें असें ह्मणतां येईल. इतरांनीं नाहीं.

हिंदुस्थानाशिवाय इतर कोणत्याही देशांत मनुष्यांत जात नाहीं. परंतु दुर्दैवानें हिंदुस्थानांत मात्र जातीभेद इतका तीव्र आहे कीं, मांजर कुत्रें किंबहुना शेणापेक्षां देखील कमी अशाप्रमाणें आह्मी आपल्या देशबांधवास व भगीनीस वागवितों व अझुनीही आह्मी गैरशिस्त, पुढारी कारितों. ह्मणून गरीबलोक अहमदाबाद, अमृतसर सारखे ठिकाणीं व मागें मुंबईस झालेल्या दंग्यासारखे प्रसंगीं बळीं पडतात. तोंडानें बडबडणारे पुढारी आह्मांस नको आहेत. कृतीनें जातीभेद मोडून आह्मांस मनुष्याप्रमाणें वागवितील असे पाहिजेत. जरी मी आंबेडकरांची निंदाच करीत आलों, तरी त्यांच्या उदारमताबद्दल स्तुतीही करणें जरूर आहे. आज त्यांना पंडीत ही पदवी देण्यास तरी काय हरकत आहे? विद्वानांत ते एक भूषणच आहेत. आर्यसमाज बुद्धसमाज व ख्रिस्ती यांनीं त्यांना आपल्यांत आनंदानें घेतलें असतें. परंतु ते तुमचा उद्धार करण्याकरितां तिकडे गेले नाहींत. याबद्दल

तुम्ही त्यांचे आभार मानिले पाहिजेत व मीही मानतों. शेवटीं आंबेडकरांना माझी अशी विनंती आहे कीं, त्यांनीं जाणेंचे पूर्वीं मेहरबानीनें माझ्या रजपूतवाडीच्या कँपवर माझे बरोबर भोजनाला येण्याची तसदी घ्यावी.

# श्री उधाजी मराठा विद्या वसतीगृहाची कोणशीला बसविण्याचा समारंभ.

## ( नाशीक तारीख १५ एप्रील सन १९२० इ. )

१. माझे प्रिय मराठे बंधूंनीं मराठा विद्यार्थिवसतीगृहाच्या पायाचा दगड बसविण्याच्या महत्वाच्यासमारंभास मला बोलावलें याचा मला मोठा आनंद वाटत आहे. व मी हें काम मोठ्या हौसेनें करीत आहे. ही संस्था मराठ्यांचे कैवारी व उदार दाते श्री० उदाजीराव पोवार महाराज साहेब धार यांच्या औदार्यानें व प्रेमानें उदयास आली. हें जें रोपटें येथें लागलें गेलें त्याला पाणी घालून व योग्य तऱ्हेचें खत देऊन त्याची वाढ करण्यास माळीही उत्तमच मिळाले. निरालस, स्वार्थपराङ्मुख, कर्तव्यनिष्ठ, सत्यावर अचल श्रद्धा असणारे, परोपकारी व आत्मयज्ञ करणारे असे सेवक मिळाल्यावर कोणत्या संस्थेची वाढ होणार नाही ! मराठ्यांचे पुढारीपण स्वीकारून त्या त्या कालास अनुरूप अशी नावाजण्यालायख कामगारी आमच्यांतील पाटील वर्ग हमेषा करीत आला आहे असें मराठ्यांचा इतिहास बरवर पाहणाऱ्यास देखील दिसून येईल. मोठमोठ्या लढाया मारून, देश जिंकण्याच्या कामांत ते कोणास हार गेले नाहींत. या सध्याच्या शांततेच्या काळांतही हे मर्द अज्ञानरूपी लोक शत्रूशीं

झगडत आहेत. हे पाटीलकुलभूषण कोण आहेत आपण जाणतच आहांत. ते माझे मित्र रावसाहेब थोरात पाटील वणीकर व दादा मोरे पाटील पिंपळगांव बसवंत हे आहेत. यांनीं या संस्थेच्या उन्नती करितां किती झीज व कष्ट सोसले आहेत व स्वार्थत्याग केला आहे हें मजपेक्षां आपणांस जास्त माहित आहे. त्यांना सहाय्य करणारे आस्थेवाईक लोक पुष्कळच आहेत त्या सर्वांचीं नांवें सांगणें शक्य नाहीं. थोडीं नांवे सांगून बाकीच्यांचीं गाळणें उचित नाहीं. या सर्वांना त्यांच्या कामगारीबद्दल मी शतशः धन्यवाद देतों. घरच्या प्रपंच्याची हेळसांड करून आपल्या मुलाला समाजसेवेस वाहूं दिल्याबद्दल रा० भाऊसाहेब थोरात पाटील वणीकर यांचेही समाजावर फार फार उपकार आहेत. जसें बीज तसा अंकूर. मुलग्यानें बापाला मागें टाकावें अशींच शहाण्या बापाची इच्छा असते ती भाऊसाहेबांची पूर्ण झाली म्हणून ते धन्य आहेत.

२. या बोर्डिंगाचें धोरणही अनुकरणीय आहे. मराठा शिक्षणपरिषदेच्या प्रसंगीं मराठे लोकांच्या औदार्यानें याची स्थापना झाली असतांही सर्व जातींच्या मुलांस याचें प्रवेशद्वार खुलें ठेवण्यांत चालकांनीं आपल्या मनाचा थोरपणा व उज्वल देशभक्ति दाखविली आहे. सर्व मनुष्यें एकाच ईश्वराचीं लेकरें असल्यानें त्यांचें परस्परांशीं बंधुत्वाचें नातें आहे हें सत्यशो-धक समाजाचें मुख्य तत्व प्रचारांत आणून आपलें मनोधैर्य व सत्यनिष्ठा स्पष्टपणें दाखविल्याबद्दल येथील चालकांची तारिफ

करावी तितकी थोडी. हें कॉस्मापॉलिटन तत्व जितक्या संस्थांतून पसरेल तितकें चांगलें. त्या योगानें जातिभेद मंदावून ऐक्य होण्यास चांगलें साह्य होतें.

३. मी प्रथमतः अगदीं कॉन्झर्व्हेटिव ह्मणजे जुन्या मताचा कट्टा अभिमानी होतों. जातिभेद कायम राहिला पाहिजे व पाळला पाहिजे असें माझें मत असे. अशा दुरभिमानानें इतरांची उन्नती होण्याच्या मार्गांत मी अडथळा करितों याची जाणीव मला नसे. दुसऱ्या जातीच्या लोकांनीं भरविलेल्या सभेंत जाऊन अध्यक्षस्थान स्वीकारणें ह्मणजे आपला धर्म बुडविणें असें मला वाटे. आज ही जातीपरिषदांत अध्यक्ष होणें मला पसंत नाहीं. पण याचें कारण मात्र पूर्वींच्या कारणांहून फार भिन्न आहे. तेव्हां मी जात्याभिमान सोडतों हें वाईट आहे असें मला वाटे. मी जातिपरिषदांस उत्तेजन दिलें तर जातिभेद तीव्र केल्याचें पाप माझ्या डोक्यावर येईल अशी मला आज भीति वाटते.

४. सर्व जातींच्या पुढाऱ्यांना माझें सांगणें हें आहे कीं, आपली दृष्टी दूरवर ठेवा. पाया पुरतेंच पाहूं नका. जातिभेद मोडणें इष्ट आहे. जरूर आहे. जातिभेद पाळणें हें पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गांत हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे प्रयत्न जोरानें केले पाहिजेत. ही जाणीव पकी ध्यानांत ठेवून मग ह्या दिशेचा प्रयत्न ह्मणून जातिपरिषदा भरवा. जातिबंधनें दृढ करणें, जातीभेद तीव्र होणें हा परिणाम अशा परिषदांचा होऊं नये ही खबरदारी घेतली पाहिजे.

५. जातिभेद हा स्वाभाविक आहे, व तो पाळणें व राखणें समाजाच्या उन्नतीस आवश्यक आहे असें प्रतिपादन बरेच वेळा उच्चदर्जाच्या लोकांकडून करण्यांत येतें. आपला व आपल्या पुढील संततीचा उच्च दर्जा कायम राहावा व इतरावर सत्ता गाजविण्यास मिळावी अशी इच्छा या प्रतिपादनाच्या बुडाशीं असते. हिंदुस्थानांत आहे या प्रकारचा जातिभेद पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याही दुसऱ्या देशांत नाहीं. या विश्वांत दुसऱ्या कोणत्याही ग्रहावर तरी तो सांपडेल कीं नाहीं, या विषयीं संशयच. हिंदुस्थानाला जी गुलामगिरी आज हजारों वर्षें भोगावी लागत आहे तिचें प्रधान कारण हा जातिभेद आहे. जातिभेदा पासून नुकसानी पेक्षां फायदाच जास्त झाला आहे असें कोणास तरी दाखवितां येईल काय?

६. सर्व लोकांत जातीच्या रूपानें असे अनुलंघ्य भेद माजल्यावर त्यांच्यांत एकी होणें फार कठीण; केवळ अशक्य आहे. कांहीं थोडा वेळ स्वार्थ साधण्यासाठीं हे भेद नजरेंआड करण्याचा प्रयत्न होईल. पण यापासून फलनिष्पत्ती अगदीं थोडी व तात्पुरतीच. सर्व देशभर भेद माजल्यावर एकी कशी होणार! ती मुळींच शक्य नाहीं. जातिभेद असूंद्या पण जातिद्वेष मात्र नको असें म्हणणारे पुष्कळ आहेत. हें मत प्रामाणिकपणाचें असल्यास त्यांच्या अज्ञानाची कींव केली पाहिजे. कारण जातिभेदाचें कार्य जातिद्वेष हा आहे. तेव्हां कार्य नाहींसे करण्यास कारणही काढून टाकले पाहिजे.

७. जातिद्वेष हा हिंदुस्थानचा फार पुराणा रोग आहे. परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केली, या म्हणण्यांत जातिद्वेषाचें प्रतिबिंब पूर्णपणें पडलेलें दिसेल. पेशव्यांनीं ब्राह्मणे-तरांच्या घरांवर गाढवाचे नांगर फिरविले याचें ही कारण तेंच. ज्यांच्या शेंड्या व जानवीं श्री. शिवाजी महाराज व मराठेवीर यानीं रक्षण केलीं तेच ब्राह्मण मराठे शूद्र आहेत असें बिनदिक्कत प्रतिपादन करतात याचें कारण दुसरें कोणतें ? या जाति-द्वेषाची उचलबांगडी करावयाची असेल तर जातिभेदच मोडला पाहिजे. जातिभेद मोडून आपण सर्व एक होऊं या.

८. माझ्यावर असा एक आरोप आहे कीं, मी जातिभेद नसावा अशा मताचा असून जातिमत्सर वाढवीत असतों. हा आरोप अगदीं मिथ्या आहे. जातिमत्सर वाढवि-ण्याचा माझा प्रयत्न मुळींच नाहीं. जात्यभिमानाच्या, शिवाजी महाराजांच्या किंवा धर्माच्या आड राहून मी गोळ्या मुळींच मारीत नसतों व अशा आडून गोळ्या मारण्याचा मी धिक्कार करितों. माझ्या मागासलेल्या बंधुभगिनींना गुलामगिरींत लोटूं पाहतात त्यांचा मी धिक्कार करितों. मागे पडलेल्यांना मी सारखे म्हणजे एका जातीचे समजतों व त्यांना वर आणण्याचा प्रयत्न करितों. हें माझें पवित्र कर्तव्य आहे असें मी समजतों. असें मी न करीन तर मी कर्तव्यविन्मुख झालों असें माझें मन मला टोचील. या मागसलेल्या जातीला वर आणण्याचे प्रयत्न झाले नाहींत तर जातिभेदाचे कट्टे अभिमानी वीर

तिला दडपून टाकल्याशिवाय राहणार नाहींत. यासाठीं मागसलेल्यांचा कैवार घेणें हें जातिद्वेष वाढविणें नव्हे. हें उघड आहे.

९. जातीभेद मोडून केवळ जन्माच्या सबबीवर दुसऱ्यास हीन मानण्याचें नाहींसें होईल. व या रितीनें जातिद्वेषाचा नायनाट होईल तो सुदीन असें मी समजेन. मी जातिभेद नसावा ह्मणतों. व जातिभेद मोडण्याचा जाहीर रीतीनें प्रयत्नही करतों. तथापि माझे सभोंवताळचे लोकांतून जातिभेदाचें बंड मला मोडतां येत नाहीं ह्मणूनच मी तुमचा अध्यक्ष होण्यास खरोखर योग्य नाहीं. मी असे कांहीं मूर्ख लोक पाहतो कीं, जे आपल्या बंधुभगिनींना पशुपेक्षां व गोमयाहूनही नीच समजतात. पण सर्व लोकांचे आपण पुढारी आहों असें भासवून तुमचें चांगलें करूं अशा थापा देऊन त्यांना फसविण्यांत यांना शरम वाटत नाहीं.

१० जपानांतील सामुराई लोकांनीं आपला जन्मानें प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला ह्मणून जपानमध्यें ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली त्याप्रमाणें ब्राह्मणांनीं जातिमत्सर सोडल्याशिवाय आमच्या लोकांची उन्नती होणार नाहीं. सर्व जातींना हात देऊन त्यांना आपल्या बरोबर घेऊन सर्वांची स्थिती सुधारणें हें काम क्षात्रियांनीं अवश्य केलें पाहिजे तें त्यांचें कर्तव्य आहे. ब्राह्मण लोकांना जन्मसिद्ध धार्मीक बाबींत श्रेष्ठपण आलें आहे, त्याच्या जोरावर त्यांची एक धार्मिक

ब्यूराक्रसीच झाली आहे. ही ब्यूराक्रसी मोडल्याशिवाय व सर्वांस धार्मीक बाबतींत सारखे हक्क मिळाल्याशिवाय कधींही देशोद्धार होणार नाहीं. यासाठीं आमच्या लोकांनीं ब्राम्हणाकडून पूजा करविणें व त्यांच्याकडून धर्मकृत्यें चालविणें हें सोडलें पाहिजे. तसेंच त्यांचे कडून धर्मग्रंथ किंवा कथा पुराणें वगैरे ऐकणें हेंही सोडलें पाहिजे. नाहीं तर ब्राम्हणांच्या श्रेष्ठपणाच्या कथाच आमच्या लोकांच्या कानावर येणार. आमचेच पूर्वज राम कृष्ण यांची पूजा ब्राम्हणलोक करितात. यावरून ब्राम्हणांचा दर्जा व जात आमच्या पेक्षां हलकी आहे हें उघड आहे. असें असूनही ते आम्हास हीन लेखितात. तेव्हां त्यांना सोडून आमचीं कामें आम्हीं चालवावी असें माझें ठाम मत आहे. मी इतकें स्पष्टपणानें बोलत आहे त्याजबद्दल माफी असावी.

मी ब्राम्हणांवर प्रेम करित असतांही जर ते माझा द्वेष व तिरस्कार करतील तर मलाही जशास तसें वागावें लागेल त्यांची माझेशीं प्रेमाची वागणूक आढळून येईल तरच मी माझे घरची देवांची पूजा व इतर धर्मकृत्यें ब्राम्हणांकडून करवून घेण्याचें चालू ठेविन नाहींतर मी ब्राम्हण पुजाऱ्यांना बंद करून माझे घरच्या देवांची पूजा मी मराठे पुजाऱ्यकडून करवून घेईन. ते मला मनुष्य समजत असतील तरच त्यांच्याकडे पुजारीपणा ठेवीन आणि जर कां ते मला जनावराप्रमाणें समजतील तर मी ठेवणार नाहीं.

ब्राम्हणांनीं एकतर सामुराई लोकांप्रमाणें जातिमत्सर सोडले पाहिजेत तरच जपानी लोकांप्रमाणें देशाची उन्नति होईल. नाहींतर मुळींच होणार नाहीं. क्षत्रियांचें मात्र कर्तव्य आहे कीं, सर्व जातींना हात देऊन चालवणें. ब्राम्हणांची रिलिजिअस ब्युराक्रसी तुटून पडल्याशिवाय कधींही देशोद्धार होणार नाहीं. सबब ब्राम्हण पुजारी व ब्राम्हणांकडून धर्म ऐकण्याचें सोडलें पाहिजे. ब्राम्हण लोक आमचे पूर्वज राम कृष्ण यांची पूजा करितात. ब्राम्हणांचा दर्जा व जात आमच्यापेक्षां अशा तऱ्हेनें हलका असूनही ते आम्हांस हीन लेखितात, अशांना सोडून वागावें असें माझें ठाम मत आहे. मी इतकें स्पष्ट बोलून दाखविलें याबद्दल माफी असावी.

## लोकसंग्रहाचे एडिटर

विद्वान व माझ्यापेक्षां शहाणे आहेत. मी त्यांचा किता घ्यावा हें बरोबर आहे. त्यांनीं माझें भाषणाचा विपर्यास केला आहे. सर्व भाषण वांचून माझी योग्य चूक दाखवून तसें त्यांनीं माझे पदरांत घातलें असतें तर त्यांचें तें कृत्य वंद्य व पूज्य मानलें असतें. त्यांचा

## हम करेसो कायदा

चालणार नाहीं. प्रेमानें प्रेम वाढतें व द्वेषानें द्वेष वाढतो. प्रेमानें जनावरास वागविलें तर तें जनावर देखील उलटें प्रेम करितें. मी स्पोर्टस्‌मन आहे. मी माझा चित्ता आफ्रिकेहून आणविला आणि तो कोल्हापुरापासून दोनशें मैलांवरील जंगलांत

सोडिला, तेथून तो मालकास हुडकत परत आला! जनावरें प्रेमानें वागविलें तर इतकें प्रेम दाखवितात. तोच चित्ता जुलमानें वागाविला असता तर पळून गेला असता, मनुष्याला चावला असता. हें आमच्या पुढाऱ्यांना कळूं नये काय? इतरांना हीन किंवा अस्पृश्य ह्मणण्यांत त्यांचा काय मोठेपणा वाढणार?

११. मुंबई, सोलापूर, अहमदाबाद, अमृतसर व लाहोर वगैरे ठिकाणीं जे दंगे झाले त्यांत सुशिक्षित पुढारी मागें राहून गरीब लोकांवर प्रसंग आला. याचें कारण त्यांचें अज्ञान. पुढाऱ्यांचा कावा त्यांना समजला नाहीं. लोकांस थोडें जरी शिक्षण असतें तरी असे प्रकार झाले नसते.

महात्मा गांधी, डॉक्टर सत्यपाल व किचलू यांच्याविषयीं माझी मोठी पूज्यबुद्धि आहे. हे दंगे त्यांनीं मुद्दाम करविले असें ह्मणण्याचें धाष्टर्य मी केव्हांही करणार नाहीं. त्यांच्या हाताखालच्या लोकांच्या चुक्या झाल्या व या चुकांचे शिंतोडे या थोर विभूतीवर उडाले येवढेंच मी ह्मणतो. राजकारणकर्त्यासारख्या मजवर टीका करणारांस माझी विनंती आहे कीं, त्यांनीं माझें समग्र भाषण देऊन प्रत्येक प्यारेग्राफसमोर त्यावर आपली टीका असेल ती छापावी. असें केलें ह्मणजे लोकांस आपलें मत देण्यास बरें पडेल. अर्धाअधिक मजकूर गाळून थोडेसें अवतरण घेतल्यानें माझें सांगण्याचा विपर्यास होतो. राजकारणकर्त्यास अशी विनंती करणें हें मी मोठें धाडस करितों अशीही भीती वाटते. कारण मग त्यांस विरुद्ध टीका करण्यास स्थळें कमीच मिळतील.

१२. युरोपांतील किंवा आमच्या देशांतील थोर पुरुषांचें वर्तन भेद मोडण्याच्या आवश्यकतेची साक्ष देत आहे. लुथर व श्री. शिवाजी महाराज यांचीं चरित्रें आह्मांस हेंच शिकवितात. श्री. शिवाजी छत्रपतींनीं तर मुसलमानाचे मराठे करून घेतले व देशकार्याकरितां महार मांगाचे रिसाले व तोफखाने तयार करून स्पर्शास्पर्शाच्या विचारास जबर धक्का दिला.

आमचे खरे महात्मा बादशहा अकबरशहा हेच आहेत. ज्यानें हिंदुमुसलमानांचीं एकी घडवून आणिली व खुद्द स्वतः जोधबाई नांवाच्या रजपूत स्त्रीशीं लग्न करून तिला हिंदूच राहूं दिलें, व सूर्याला अर्घ्य देण्याकरितां लाखो रुपये खर्च करून व्यवस्था केली, त्याची साक्ष हल्लीं आग्र्याचा किल्ला देत आहे. जी गोष्ट विसाव्या शतकांत अशक्य झाली आहे, ती १७ वे शतकांत यवन बादशहानें सहज केली होती.

१३. इंग्रजी राज्याचें धोरण प्रजेस विद्या देणें हें आहे. इंग्रजांनीं शिक्षणाचीं द्वारें सर्वांस खुलीं केलीं. महाराणी व्हिक्टोरिया व त्यांचे पुढील राजे यांच्या कारकीर्दींत सर्व जातींना विद्यामृतपानाची जशी संधी मिळाली तशी रामकृष्णाच्याकाळीही कोणास मिळाली नाहीं. परंतु विद्यामृतपानाची मोकळीक सर्वांस झाली तरी या पोया बहुतांशीं ब्राह्मणांच्या ताब्यांत राहिल्यानें हें अमृत ब्राह्मणेतरांपैकीं फारच थोड्यांस मिळालें. बहुतेक फायदा ब्राह्मणांचाच जास्त झाला. यामुळें आतां

स्वराज्याच्या हक्काची मागणी करतांना त्यांचीच ओरड जास्त आहे. व स्वराज्याचे अधिकार मिळतील ते सर्व आपले ताब्यांत रहावे अशी त्यांची खटपट आहे. हे अधिकार त्यांच्या एक-ट्यांच्या पदरांत पडूं नयेत, इतर जातींसही त्यांत हिस्सा मिळावा असें प्रतिपादन करणारे लोक त्यांस देशद्रोही, देश-बुडवे दिसतात. जातवार प्रतिनिधींचा हक्क मागणाऱ्यांना अशाच शेलक्या शिव्या व शाप देण्यांत येत आहेत.

१४. माझ्या चिमुकल्या राज्यांतील प्रजाजनांनीं एका बाबतींत तरी विशेष नांव कमाविलें आहे, हें मी अभिमानपूर्वक सांगतों. त्यांचें उदाहरण लोकांपुढें आल्यानें हा किता पुष्कळ ठिकाणीं गिरविला गेला आहे. ब्रिटिश पार्लमेंटला मदर ऑफ् पार्लमेंट्स् असें मोठ्या अभिमानानें इंग्रज व इतर लोक ह्मणतात. त्याप्रमाणें कोल्हापुरास मदर ऑफ् बोर्डिंग हाउसेस ह्मणजे विद्यार्थि-वसतिगृहाची माता असें सार्थ यश मिळालें आहे. तेथें मराठा, जैन, लिंगायत, सारस्वत, मुसलमान, दैवज्ञ, पांचाळ, शिंपी, कायस्थ प्रभू यांच्या मुलांकरितां विद्यार्थीगृहें आहेतच. आर्यसमाज सर्वांस सारखे लेखून गुरुकुल चालवीत आहे, शिवाय अस्पृश्य लोकांच्या विद्यार्थ्यांकरितां अशी संस्था काढून अस्पृश्यांचा अस्पृश्यपणा काढून टाकण्यामध्येंही गरीब अशा कोल्हापूरच्या लोकांनीं पुढाकार घेतला आहे. मागासलेल्या लोकांपैकीं कांहीं लोकांस वकीलीचीही परवानगी देणेंत आली आहे. समाजांतील

कृत्रिम उच्चनीच भाव नाहींसे करणें तसेंच स्त्रियांची योग्यता वाढविणें या संबंधानें समाजसुधारणेसं साह्य करणारे असे-प्रगतीपर कायदे करण्यांतही कोल्हापूरचा पाय पुढेंच आहे. या कामीं मनःपूर्वक उत्साहानें मदत देणाऱ्या माझ्या लाडक्या प्रजेचें मी अभिनंदन करितों व त्यांस धन्यवाद देतों.

१५. सर्व जातीचे लोक पुढें येऊन सामाजिक, औद्योगिक, शिक्षणविषयक, सरकारी नोकरी वगैरे सर्व बाबतींत आपआपली जबाबदारी पुरी पाडण्याचें सामर्थ्य त्यांस येणें याला मी जातवार प्रतिनिधित्व ह्मणजे Communal representation ह्मणतों. मागें पडलेल्यांना अशा प्रकारें पुढें येण्यास उत्तेजन देणें हें माझें कर्तव्य आहे असें मी जाणतों व त्याप्रमाणें हीन स्थितींतील लोकांस वर काढण्यास मी हातभार लावीत असतों. वयांत आलेल्या व आपलें हिताहित कळणाऱ्या मुलाकडे लक्ष्य देण्याची आईबापास जरूरी नसते. पण जीं अज्ञान आहेत, ज्यांस चालतां येत नाहीं, ज्यांस धड उभेंही रहातां येत नाहीं त्यांची काळजी आईबापास जास्त घ्यावी लागते. कोणास हाताचा आधार द्यावा लागतो व कोणास उचलूनही घ्यावें लागतें. असें करणारे आईबाप योग्य तऱ्हेनें आपलें कर्तव्य बजावितात असें होतें. सर्व मुलांस सारखे वागवींत नसल्यानें ते मुलामुलांत पक्षपात करतात असा त्यांचेवर आरोप करणें हें असमंजसपणाचें होईल. हेंच तत्वं लक्षांत घेऊन मी अगदीं निकृष्ट स्थितींत असलेल्या जातींस

१०५९२

जास्त उत्तेजन देत आहे. त्यांना नोकऱ्या सढळ हातानें दिल्या जात आहेत व वकिलीच्या सनदाही त्यांना देऊन त्यांचें शिक्षण, दर्जा व महत्व वाढविण्यांत येत आहे. याप्रमाणें विद्यामृताचे झरेच त्या त्या जातींना दाखवून दिले असल्यानें त्यांची उन्नती झपाट्यानें होईल अशी मला मोठी आशा आहे. ब्राह्मणेतरांनाही याच तत्वावर विषेश उत्तेजन मला द्यावें लागलें. या माझ्या सरळ वर्तनास ब्राह्मणद्वेष असा खोटा दोष लावण्यांत येत आहे हा अन्याय आहे. पण हा आरोप कदाचित् प्रामाणिकपणानें करण्यांत येत असेल.

अलीकडचे कांहीं राजकारणी ब्राह्मण ह्मणतात कीं, ब्राह्मणच आजपर्यंत पुढारीपणा घेत आले व आतांही घेत आहेत. ह्मणून त्यांचा हेवा वाटून त्यांचे पाय मागें ओढण्याकरितां जातवार प्रतिनिधीसारख्या मागण्या केल्या जात आहेत. पण खरी स्थिती तशी नाहीं. आमची ब्राह्मण बंधूस हीच विनंती आहे कीं आपण या कामीं फार पुढें गेलेले आहांत. अपणांस धावण्याची शक्ति आहे आह्मी आतां कोठें रांगत आहोंत; थोडें थोडें पडत झडत उभे राहण्याचा प्रयत्न करीत आहोंत. आमचे श्रम वांचविण्याकरितां आमचेवरील प्रेमामुळें आपण आह्मांला उचलून नेण्यास तयार आहां. पण आपल्या प्रेमाचा व कळकळीचा परिणाम आमच्या नुकसानीचा होईल. आह्मांला आपण रांगूं दिलें नाहीं व पडत झडत उभें राहूं दिलें नाहीं तर आह्मी कायमचे पंगू होऊं. या करितां आपण आमच्या रांगण्याचें व

उभें रहाण्याचें कौतुक करा व उत्तेजन द्या. प्रतिबंध करूं नका. आमची धडपड आमच्या अंगीं शक्ति येण्यासाठीं आहे. आपल्या द्वेषामुळें आह्मी ती करितों ही आपली समजूत चुकीची आहे असें आह्मी आमचे पुढारी म्हणविणारांस नम्रपणें सांगतों.

१६. कांहीं वर्तमानपत्रकारांचा माझ्यावर दुसरा असा आरोप आहे कीं, मी माझ्या लोकांस स्वराज्य देण्यास बिलकूल कबूल नाहीं. हा आरोप अगदीं खोटा असून तो माझ्याविषयीं गैरसमज व्हावा म्हणून माझ्या म्हणण्याचा विपर्यास मुद्दाम करण्यांत येत आहे, याबद्दल मला फार दिलगिरी वाटते. ज्या भाषणासंबंधानें हा आरोप करण्यांत येतो तें भाषण करतांना मी म्हणालों:— " But if I may be allowed to express an opinion at this stage, I would only say that I, for one, would hesitate to make any constitutional changes in my state in the direction of the Reforms until the general level of education among the masses has risen and is at least partially equalised with that of the higher classes. "

*" बहुजन समाजाचा शिक्षणविषयक दर्जा वाढून वरीष्ठ वर्गाच्या बरोबरीनें अंशतः तरी तो आल्याशिवाय सुधारणेच्या दिशेनें माझ्या संस्थानच्या राज्यकारभारांत लोकांस हक्क देण्याविषयींचा बदल करण्याला हात घालणेस मी धजणार नाहीं"*

असें मी सांगितलें. माझ्या ह्मणण्याचा विपर्यास मुद्दाम कसा करण्यांत आला आहे हें आपल्या ध्यानीं येईलच. मतदारसंघास आपले हक्क समजून त्यांचा उपभोग घेण्याची पात्रता थोड्या बहुत अंशानें तरी त्यांच्या अंगी येण्यापूर्वी व लहान सहान जातींस देखील विद्येची गोडी लागण्यापूर्वी स्वराज्य देणें मला सुरक्षित वाटत नाहीं.

१७. शेंकडा ७०।८० लोकांची तयारी नसतांही असे अधिकार लोकांस दिले गेल्यास ते अल्पसंख्याकांच्या हातांत पडतात व जातिभेदानें जखडलेल्या आमच्या देशांत ते एकाच जातीच्या हातीं जाऊन स्वार्थबुद्धीनें त्यांना इतरांचें भयंकर नुकसान करण्यास संधि मिळते. आर्य व अनार्य यांचा मागील इतिहास, त्याचप्रमाणें पेशवाईचा अखेरीकडील इतिहास या माझ्या म्हणण्यास भक्कम पुरावे देतील. स्वार्थाचीं साधनें हातीं आलीं ह्मणजे चांगले लोकही वाईट व जुलमी होतात. मग ज्यांनीं आज पिढ्यानुपिढ्या इतरांस गुलामगिरींत खितपत ठेविलें आहे व ज्यांची इच्छा तसेंच वागण्याची उघड उघड दिसत आहे, त्यांच्या हातीं सर्व सत्ता जाऊं नये याविषयीं खबरदारी घेण्याची केवढी आवश्यकता आहे हें सांगण्यास पाहिजे असें नाहीं. माझ्या भाषणाचा आशय असाच आहे. केसरी वगैरे जहाल पत्रांचें धोरण व कावा कसा आहे हें आपणांस माहीत आहेच. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याच्याअगोदर सध्यां उपयोगांत असलेलीं शाळागृहें विस्तृत व हवेशीर केलीं पाहिजेत

तिकडे खर्च करण्याची ज्यास्त जरूरी आहे हें केसरीचें प्रतिपादन कोणाही सरळ बुद्धीच्या माणसास चीड आणील. No cake to a few until all are served with bread हें इंग्लंडांतील मजूर पक्षाचें धोरण आहे. पण येथें शेंकडा ९० लोक उपाशी आहेत व दहा लोक पोळी खात आहेत. उपाशी लोकांना कोंड्याच्या भाकरीचीही सोय करण्याअगोदर या दहांच्या पोळीवर साजूक तूप वाढा असा ओरडा करणाऱ्यांना रयतेची कळकळ कितपत आहे हें उघड होत आहे. लिंगायत, जैन वगैरे व्यापारी वर्गानें काउन्सिलांत जाऊन काय तागडी धरावयाची आहे? शेतकऱ्यांनीं काय तेथें नांगर चालवावयाचा आहे? असे कुत्सित विचार आपल्या पत्रांत घालण्याची व सभेंत बोलण्याची यांना लाज कशी वाटत नाहीं हें मला समजत नाहीं.

१८ इंग्रज अधिकाऱ्यांच्या हातून सत्ता काढून घेऊन ती विद्यासंपन्न अशा अल्पसंख्याक ब्राह्मण वर्गाच्या हातीं देणें मला बिलकुल पसंत नाहीं. परशुरामाच्या वेळेपासून आजपर्यंतचा इतिहास काय सांगतो? विद्येचा मक्ता फक्त आपणांकडेच ठेऊन इतरांस विद्येपासून दूर ठेवण्याचा अखंड पद्धतशीर प्रयत्न सतत करून ब्राह्मण ब्यूराक्रसीनें या दक्षिणेंत इतरांस गुलामाच्या स्थितीस कसें आणिलें आहे ही गोष्ट विसरणें फार कठीण आहे.

खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हें जें जड व जुलमी जूं लादलें गेलें आहे तें झुगारून देण्याची शक्ती

बहुजन समाजाचे अंगीं येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरूरी आहे. असलें शिक्षण मी माझ्या रयतेस देण्यास प्रारंभ केला आहे. त्या करितां सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून तो जारीनें अमलांत ठेविला आहे. यामुळें पुढील पिढी तरी लिहिणारी वाचणारी लवकरच होईल अशी मला खात्री आहे.

१९. प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे तरी दुय्यम व उच्च शिक्षणाकडे माझें लक्ष कमी नाहीं. माझें संस्थान सातारा व बेळगांव या जिल्ह्यांपेक्षां लहान असतांही आमचेकडे सात हायस्कुलें चालू आहेत व दोन लवकरच सुरू होतील. शिवाय युनिव्हर्सिटीचें पुरें शिक्षण देणारें एक कॉलेजही आहे.

२०. माझ्या रयतेमध्यें प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जारीनें खटपट चालली आहे यावरून शक्य तितकें लवकर रयतेस स्वराज्य देण्याचें माझें धोरण आहे हें आपलें ध्यानीं येईलच. माझी सर्व प्रजा मराठी तिसरी ईयत्ता तरी शिकून तयार झाली असती तर त्यानां राज्यकारभाराचे हक्क आनंदानें देऊन मी आजच विश्रांती घेतली असती. आज पिढ्यानूपिढ्या जी रकम माझे पूर्वज व मी खासगी खर्चाकरितां घेत आहोंत तितकीच रकम माझ्या प्रजेला विनंति करून त्यांचेकडून घेऊन बाकीच्या उत्पन्नाची व्यवस्था माझ्या प्रजेचे प्रतिनिधींनीं प्रजेच्या सुखाच्या व उन्नतीच्या प्रीत्यर्थ

करावी असें मी ठरविणार आहे. आज राज्यकारभाराचें सर्व काम मलाच करावें लागत आहे. प्रजेवर फक्त कर देण्याची जबाबदारी आहे. पुढें कर देणें व योग्य तो खर्च करणें ही जबाबदारी रयतेवर पडेल. पण माझी प्रजा ही जबाबदारी घेण्यास अगोदर पूर्णपणें नसली तरी अंशतः तरी पात्र झाली पाहिजे. म्हणजे रयतेंतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षां सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे असें माझें मत आहे. रयतेंतील मोठा भाग अडाणी राहिला व थोडेसे लोक विद्याचारसंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते या थोड्या लोकांच्या हातीं पडणार व एक स्वदेशी ब्यूराक्रसी तयार होणार. या सुशिक्षित ब्यूराक्रसीचा कारभार आमच्या ओळखीचा आहे. फार लांब कशाला. मराठ्यांचा इतिहासच पहा. शाहू महाराजांची भूल होऊन पेशव्यास अधिकाधिक सत्ता बळकावण्यास संधि मिळाली याचा परिणाम छत्रपतींचा काराग्रहवास हा झाला, जातिभेद तीव्र झाले. जातिमत्सर वाढला व अस्पृश्यांस तर गळ्यांत गाडगें व कंबरेस फेसाटी बांधून फिरावें लागें. हा प्रसंग कोठेंही पुन्हां येणें चांगलें नाहीं. याकरितां अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांत विद्या पसार करण्याकडे अगोदर लक्ष देणें जरूर आहे.

२१ मुलगा कर्ता झाल्यावर त्यावर संसाराचा भार टाकून विश्रांती घेण्याची आमची आर्यपद्धती आहे. त्याप्रमाणें माझ्या प्रजेची योग्यता वाढवून त्यांच्या हातीं सर्व कारभार सोंपवून

माझ्या खर्चापुरती एक ठरीव रकम पेनशन् दाखल घेऊन मी केव्हां मोकळा होईन असें मला झालें आहे. हा माझा हेतू जगदीश कृपेनें लवकरच पूर्ण होवो.

माझ्या म्हणण्याचा विपर्यास होऊं नये म्हणून मी पुनः माझें म्हणणें स्पष्ट करितों. गाड्याचीं दोन्हीं चाकें चांगलीं व मजबूत पाहिजेत. त्याशिवाय गाडा बरोबर चालणार नाहीं. तसेंच गाड्याचें जूंही मजबूत पाहिजे. इंग्रजी मुलखांत सुधारणेच्या नवीन कायद्यानें नोकरशाही व लोकशाही यांच्या मध्येंच सत्ता विभागिली गेली आहे. यामुळें नोकरशाहीच्या हातची सत्ता क्रमाक्रमानें लोकांकडे जाण्याची तजवीज करण्यांत आली आहे. पण संस्थानी मुलखांत ही पद्धति उपयोगी पडेल असें वाटत नाहीं. कारण तेथें सत्ता चार ठिकाणीं विभागली जाणार. प्रजा, नोकरशाही, राजा व ब्रिटिशगव्हर्नमेंट. अशीं चार शकलें राजसत्तेचीं करून क्रमानें अधिकार प्रजेकडे देणें सोयीचें नाहीं. त्यापासून पुष्कळ अडचणी उत्पन्न होतील माझ्या रयतेस कर्तव्याची जाणीव पूर्णपणें आली म्हणजे एकदम सर्व राज्यकारभार त्यांचेकडे सोपविण्यास मी केव्हांही तयार आहे. एवढी जबाबदारी ओळखण्याची पात्रता रयतेंत येईपर्यंत माझें मन साशंक राहील. प्रजेला पूर्ण हक्क दिले म्हणजे राजा फक्त नांवाचा मार्गदर्शक. संस्थानची प्रजा ही ब्रिटिश सरकारास जबाबदार रहाणार. अशी भिन्न परिस्थिती असल्यानें खालसांतील सुधारणेची योजना सर्वांशीं लागू करणें धोक्याचें आहे. यासाठीं

ही सुधारणा घडवून आणण्यास उपाययोजना चांगली विचार पूर्वक झाली पाहिजे.

२२ आधी राजकीय सुधारणा कीं आधी सामाजीक सुधारणा हा वाद समंजसपणाचा नाहीं. या सुधारणा स्वतंत्र नाहींत. एकांत एक गुंतलेल्या आहेत. जणूं काय या दोन सुधारणा राष्ट्रोन्नतीच्या गाड्याचीं दोन चाकेंच आहेत. एकच चाक लावून गाडा सुरक्षित नेणें शहाणपणाचें होईल काय? या गोष्टी विचारानें सिद्ध आहेत. पाश्चात् देशाचा अनुभवही हेंच सांगतो. राजकीय सुधारणा अगोदर पाहिजे. सामाजीक सुधारणेची तूर्त जरुरी नाहीं असें प्रतिपादन ऐकूं येतें तेव्हां तेथेंच कांहीं तरी पाणी मुरत आहे असें समजावें. हें बोलणें कपटी व काव्याचें असतें.

२३ वास्तविक पहातां इंग्रज सरकारनें प्रजेंत शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करण्याचें काम आपल्या प्रत्यक्ष नजरेखालीं घेऊन तें योग्य प्रकारें फैलावल्यावर मग स्वराज्याचे हक्क रयतेचे स्वाधीन करणें हेंच योग्य आहे. बरें असो. आजपर्यंत झालें तें झालें. आतां तरी मिळालेल्या स्वराज्याच्या हक्काची जबाबदारी ओळखून पुढारलेले लोक स्पर्शास्पर्शाचें बंड मोडून इतर सुधारलेल्या लोकाप्रमाणें सर्व प्रजाजन आपले देशबांधव आहेत अशी जाणीव बाळगून निःपक्षपातबुद्धीनें त्याना विद्या देतील व माझे मित्र रावबा थोरातांचें उदाहरण गिरवितील अशी मी आशा करितों.

२४. क्वीन व्हिक्टोरिया या ईश्वरअंशी राज्यकर्त्या होऊन गेल्या त्यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानची व सर्व ब्रिटिश-साम्राज्याची फार भरभराट झाली. पुण्यकीर्ती जार्ज बादशहाची कारकीर्दही विशेष भरभराटीची होऊन सर्वांस उन्नती प्राप्त होऊन सुख लागेल अशी मला खात्री वाटत आहे.

२५. शेवटीं आजच्या प्रसंगीं राजकारणपत्राचे सुप्रसिद्ध संपादक रा. दामले बी. ए एल्. एल्. बी. यांचे मनःपूर्वक आभार मानितों. कारण त्यांनीं माझ्या बऱ्याच चुका माझे नजरेस आणिल्या आहेत. अशाच माझ्या चुका त्यांनीं वरचेवर काढाव्या व मला सुधारावें. ते माझेपेक्षां अनुभावानें व ह्मणून वयानें वृद्ध आहेत. शिक्षणांत तरी त्यांची माझी तुलना होणेंच नाहीं. त्यांनीं आपलें आयुष्य देशकार्यास वाहिलं आहे. राज्यकारण ( Politics ) हा तर त्यांचा आवडीचा विषय. रात्रंदिवस या विषयाचा निदिध्यास. राजकारणी लोकांत त्यांचें हमेषचें वागणें. माझें सारें आयुष्य घोडे व जनावरें यांची पैदास करणें, शिकार खेळणें, मल्लविद्या व इतर शरीरवृद्धीचे खेळ यांत गेलें. राजकारणाचा अभ्यास माझ्या हातुन झालेला नाहीं. दामले माझे गुरु होण्यास योग्य आहेत. त्यानीं माझ्या चुका वारंवार काढाव्या व त्या दुरुस्त कराव्या. त्यांनीं मला भेटून युक्तिवादानें माझीं खात्री करावी ह्मणजे माझी वास्तवीक सुधारणा होईल. माझी जी प्रामाणीक समजूत आहे किंवा होईल त्या प्रमाणें मी बोलतों व वागतो. याला पाहिजे तर दुराग्रह ह्मणा. प्रत्येकाला भाषण

स्वातंत्र्य या दिवसांत आहे अशी माझी समजूत आहे. व त्याप्रमाणें मी वागत आहे. माझ्या कल्याणाची अशीच आस्था राजकारणकर्ते व इतर देशभक्त यांनीं बाळगावी अशी माझी त्यांस विनंती आहे.

( नाशीक तारीख १६ एप्रील सन १९२० इ० रोजीं झालेली निराश्रित सोमवंशीय समाजाची सभा. )

मित्रहो, आजच्या ह्या सभेच्या प्रसंगीं तुह्मीं मला प्रेमानें आमंत्रण केलें, याबद्दल मी तुमचा आभारी आहे. तुमची ही संस्था पाहून मला फार संतोष वाटतो. हल्लींच्या तीव्र जीवन-कलहाच्या कालांत कोणताही समाज जर शिक्षणसंपन्न असेल तरच तो टिकाव धरूं शकेल, ही गोष्ट तुमच्यांतील पुढाऱ्यांना पटली आहे, याचा मला आनंद वाटतो. तुमच्यासारख्या हतभागी व विपन्न ज्ञातीला पुढें यावयाचें असेल तर त्याबद्दलचा प्रयत्न तुह्मांतील पुढाऱ्यांनींच केला पाहिजे. स्वावलंबन ही यशाची किल्ली आहे. या दृष्टीनें या संस्थेचे चालक जे तुह्मांपैकींच आहेत, त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच.

या प्रसंगीं मोकळ्या मनानें माझ्या अंतःकरणांतील तुमच्या हिताचे विचार मला कळवावेसे वाटतात. प्रथमतः तुह्मांला माझें सांगणें हें आहे कीं, तुमच्या उद्धाराच्या सर्व आशांची मदार आमच्या ब्रिटिश साम्राज्याच्या चिरस्थायीपणावर अवलंबून आहे. समतेच्या तत्वाच्या जोरावर तुह्मांला झगडा वयाचें आहे; व समता, बंधुता व स्वातंत्र्य यांचें उगमस्थान, ब्रिटिश राष्ट्र हें आहे गेल्या महायुद्धाच्या आपत्तीचे परिणाम जगाला आतां कडक रीतीनें जाणवूं लागले आहेत. अशा वेळीं

आमच्यावर जर ब्रिटिश साम्राज्याचें छत्र नसतें तर आपल्या कोट्यावधि देशबंधूंना अन्नपाण्याशिवाय तडफडून मरण्याची पाळी आली असती; परंतु हल्लीं या देशांत एकही मनुष्य उपाशी मरत नाहीं, यावरून आमच्या साम्राज्याची महति किती वर्णन करावी! तरी या गोष्टी नेहमीं डोळ्यांपुढें ठेवून तुह्मीं ब्रिटिश साम्राज्याशीं अंतःकरणपूर्वक राजनिष्ठ व कृतज्ञ राहून लढाईच्या अथवा शांततेच्या काळांत साम्राज्याचें हित त्यास हरएक बाजूनें मदत करण्यास तयार राहिलें पाहिजे.

आतां, मी एका नेटिव्ह संस्थानचा राज्यकर्ता असल्यानें, ब्रिटिश मुलखांत येऊन मीं भाषणें कां करावीं, असा माझ्यासंबंधानें एक आक्षेप घेण्यांत येतो. त्यास, एक तर मी राजा या नात्यानें तुह्मांत आलों नसून आपल्या कोट्यवधि देशबंधूंचा एक हितचिंतक व सेवक या नात्यानें आलें आहें; ह्मणून जर कोणी प्रेमानें माझे विचार मला विचारले तर ते न सांगणें हें सभ्यपणाचें होणार नाहीं; किंबहुना विचारणाऱ्याचा मी त्यांत उपमर्द केला असें होईल, शिवाय दुसरें असें कीं, नेटिव्ह संस्थानें हीं साम्राज्याशीं एकजीव झालेले त्याचे अवयव आहेत. साम्राज्यांतील कोट्यवधि व्यक्तींचे साम्राज्याशीं प्रजा या नात्यानें, किंवा सनदा, तहनामे इत्यादि द्वारांनीं संबंध जडलेले आहेत. अर्थात् हा संबंध कोणताही असला तरी साम्राजांतील आह्मां सर्वांचे हितसंबंध एकच आहेत; म्हणून साम्राज्याच्या व त्यांतील प्रजाजनांच्या

कल्याणाच्या गोष्टींत मन घालून त्यासंबंधीं आपले विचार प्रदर्शित करणें यांत वावगें असें कांहींच नाहीं; किंबहुना तो माझा हक्कच आहे, असें मी मानतों.

आमच्या धर्मात ज्ञातिभेदामुळें जो उच्चनीचपणा आलेला आहे, तशाप्रकारचा जन्मजात भेदभाव जगाच्या पाठीवरील दुसऱ्या कोणत्याही धर्मात नाहीं. या जातिभेदाचे अत्यंत हिडिस स्वरूप जर कोठें असेल तर इतर जातींकडून तुह्मांला ज्या रीतीनें वागविण्यांत येतें त्या रीतींत दिसून येतें. तुह्मी आमचे बंधु असतां तुह्मांला अस्पृश्य ह्मणून लेखून, मांजरें, कुत्रें, कुत्रीं यांपेक्षांही तुह्मांला नीचपणानें वागविण्यांत येतें, ही किती लज्जेची गोष्ट आहे बरें! ही अस्पृश्यता अलीकडे केव्हांतरी मध्येंच घुसडून दिली असली पाहिजे; कारण या नाशिक-सारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं अनादि कालापासून ह्मारलोकांच्या स्नानाचें कुंड इतर ज्ञातींच्या कुंडांच्या मध्येंच आहे; अर्थात् त्या ठिकाणीं स्पर्शास्पर्शाचा विधिनिषेध असणें शक्य नाहीं. असें असतां हल्लींच्या व्यवहारांत तुह्मांला आह्मी अस्पृश्य ह्मणून दूर ठेवतों, ही किती शरमेची गोष्ट आहे! या प्रकारा-संबंधानें समाजातील श्रेष्ठ ज्ञातींना जसजशी खंती वाटेल त्या मानानें त्यांचे ठिकाणीं खऱ्या स्वदेशाभिमानाचें बीजारो-पण झालें असें होईल; व सुशिक्षित जातींतून जेव्हां हा खरा स्वदेशाभिमान संचार करूं लागेल तेव्हांच त्यांचेकडून तुह्मांला टिकाऊ अशी कांहीं तरी मदत होईल. माझ्या राज्याचीं अधिकारसूत्रें माझ्या हातीं आलीं, तेव्हां कोल्हापुरांत सर्व

एकाच सुशिक्षित जातीचें वर्चस्व होतें. ऑफिसांतून माग-सलेल्या जातींचा एकही नोकर दिसत नव्हता; म्हणून त्यांचा दर्जा वाढविण्याकरितां मागसलेल्या सर्व जातींच्या लोकांना नोकऱ्या देण्याचें धोरण मला ठेवावें लागलें. त्यांतील कित्येकांना वकिलीच्या सनदा दिल्या. त्यांच्या शिक्षणासाठीं स्पेशल स्कॉलरशिपा ठेवून त्यांना निरनिराळीं बोर्डिंगेंही करून दिली. माझ्या २५ वर्षांच्या प्रयत्नाचे आतां कोठें सुपरिणाम दिसूं लागले आहेत. मानलेल्या अस्पृश्य जातींखेरीज इतर ज्या मागास-लेल्या जाती आहेत, त्यांचें पाऊल येथें आतां बरेंच पुढें पडत चाललें आहे. त्यांची स्थिति आतां नुकत्याच चालू लागलेल्या मुलासारखी आहे. तुमचा समाज मात्र अजून रांगण्याच्या स्थितींतही आलेला नाहीं; म्हणून आतां तुम्हां-लाच दर काढण्याकडे माझें लक्ष वेधलें आहे. हरएक प्रका-रचें उत्तेजन मुम्हांला देण्याचें माझें धोरण आहे. तुमच्यासाठीं माझ्या राज्यांत मीं आतांपर्यंत काय केलें आहे, हें मीं सांगत बसण्यापेक्षां माझ्या राज्यांतील तुमचे ज्ञातिबंधूच तुम्हांला सांगतील.

अलीकडे थोड्या दिवसाखालीं माझ्या इलाख्यांत तुमच्या ज्ञाति-बंधूंची सभा झाली; त्या सभेस मी हजर होतो; व मीं त्या वेळीं लहानसें भाषणही केलें. तें भाषण वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्यानंतर पुण्याच्या कांहीं पत्रकर्त्यांनीं आपली अमोल्य वेळ व जागा खर्च करून मजसारख्या अज्ञानानें केलेल्या भाष-णावर टीका केली; तें योग्यच झालें; परंतु टीका करतांना

त्यांचे हातून माझ्या भाषणाचा विपर्यास झालेला आहे. त्याचें कारण माझी मराठी भाषेवर असावी तशी कमांड नसल्यामुळें कदाचित् माझे मनांतील विचार मला बरोबर व्यक्त करतां आले नसावेत; यामुळें विपर्यास करण्यास जागा मिळाली; व मला ब्राह्मणजातीचे पाय मागें ओढण्यासाठीं झालेल्या कटाचा मेरुमणी असें त्यांनीं म्हटलें. मेरुमणी होण्याच्या मी योग्यतेचा नाहीं. माझ्या भाषणाचा आशय इतकाच होता कीं, जगाच्या पाटीवर हिंदुधर्माशिवाय कोणत्याही धर्मांत ज्ञातिभेदभाव नाहींत. हिंदुधर्मांत मात्र ज्ञातिभेदभाव आहेत; त्यामुळें मीं कालच मराठ्यांच्या परिषदेंत भाषण केल्याप्रमाणें, पूर्वीं परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केली, तरी ब्राह्मणी--वर्चस्वाची पीछेहाट होऊन पुनः राम व कृष्ण हे क्षत्रिय देव्हाऱ्यांत बसले. शाहूमहाराजांच्या वंशजांस पेशव्यांनीं लुप्तप्राय केलें, तरी पेशवाईच्या अस्ताबरोबर सातारच्या प्रतापसिंहमहाराजांचा उदय झाला. प्राचीनकाळापासून या उलाढाली होत असून, त्याच्या बुडाशीं आमचा जातिभेदच आहे. अशा उलाढाली पुनः होणें इष्ट नाहीं; म्हणून मोठ्या जोरानें मी सांगतों कीं, हा जातीभेद मोडून समाजाचा पाया शुद्ध केल्याशिवाय आम्हांला सेल्फ-गव्हर्मेंट दिलें तरी नको; कारण तें वरील अनुभावाप्रमाणें ढांसळून पडणारच; म्हणून पुन्हां जोरानें असें सांगतों कीं, माझे असें मत आहे कीं,-- ठाम मत आहे कीं,--आधीं सोशल रिफार्म होऊन आपली एकी झाली म्हणजेच आम्हांला स्वराज्याचे पूर्ण फायदे मिळतील. थोडे दिवसांपूर्वींच मुंबईस मी सेंट कोलंबा

स्कॉच मिशनमध्यें गेलों होतों, व अमेरिकन मिशनचा माझा फार दिवसांचा परिचय आहे. दोन्हीं ठिकाणचीं माणसें म्हणजे मिस् सदरलंड, डॉ० व्हेल व डॉ० वॉन्लेस हे सातासमुद्रावरून इकडे आले असून, केवळ अन्नवस्त्रापलीकडे कोणतीही अपेक्षा न ठेवतां केवळ निष्काम व परोपकारबुद्धीनें अहोरात्र आमच्या लोकांना विद्यादान व जीवदान करीत आहेत. त्यांनीं आमचीं मनें न दुखवावीं म्हणून आपल्या संस्थांतून आमच्या खाण्यापिण्याची व्यवस्था आमच्या जातीधर्माप्रमाणें कडक ठेवलेली आहे. अशा उदाहरणानें ते आमच्या मनाची व शरीराची जोपासना करीत आहेत. अर्थात् मी तरी यांना अवतारी माणसेंच म्हणतों. आमच्यांत गांधीसारख्या कांहीं व्यक्ति अवतारी आहेत; व त्यांचेबद्दल माझ्या ठिकाणीं पूज्यबुद्धि आहे; परंतु वरील मिशनांप्रमाणें कोणताही भेदभाव न ठेवितां निष्काम व निस्वार्थबुद्धीनें समाजाची सेवा ती ईश्वराचीच सेवा ही भावना मनांत बाळगून रंजल्यागांजलेल्यांना वर आणण्यासाठीं व त्यांना व्याधिमुक्त करण्यासाठीं अहोरात्र झटणाऱ्या संस्था आमच्यांत कितीशा आहेत ! मि. गांधीच्या संबंधानें माझ्या भाषणाचा एका एडिटरानें विपर्यास केलेला आहे. मी वर सांगितलेंच आहे कीं, गांधीच्या संबंधानें माझी अत्यंत पूज्यबुद्धि आहे. त्याचप्रमाणें श्रद्धानंद, किंवा मिसेस् बिझांट् ही माणसें अवतारी आहेत तथापि, त्यांच्या हातुन चुका होणें अशक्य आहे, हें मात्र मला कबूल नाहीं; व या चुका कबूल न करण्याइतके ते हटवादीही नाहींत. आपल्याकडून झालेल्या चुका

मि. गांधी, श्रद्धानंद वगैरे पुढाऱ्यांनीं स्वतःच कबूल केलेल्या आहेत. अर्थात् त्यासंबंधानें माझ्या भाषणांत उल्लेख आला म्हणून खुद्द मि. गांधींनाही राग येणार नाहीं. तथापि या पत्रकारानें माझ्यावर केलेल्या टीकेमुळें माझ्याबद्दल गांधींचा व सर्व जगाचा निष्कारण गैरसमज होणार आहे. असो. मि. गांधीसारखी पूज्य माणसें आमच्याकडे आहेत; पण त्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी आहे. सर्व समाजाचा विचार करतांना, समाजांत सामान्यतः पुढारी म्हणून जे वावरतात त्यांचें शील, नीतिधैर्य वगैरे सद्गुण कोणत्या कसाचे आहेत हेंच पाहिलें. पाहिजे. महाराष्ट्रांत सुशिक्षित जातींपैकीं बहुतेक पुढाऱ्यांच्या ठिकाणीं पतित जातींच्या संबंधानें सहानुभूतीचा पूर आल्याचें कित्येकदां दिसतें; परंतु त्यांच्याशीं सहभोजनादिद्वारें एकी करण्यासंबंधानें प्रत्यक्ष कृतीचा प्रसंग आला कीं, हे लोक आपल्या बायका मुलांची सबब पुढें करितात; परंतु थोड्या विचारांतीं ही सबब अगदीं शुष्क आहे, असें तेव्हांच दिसून येतें. कारण अनादि कालापासून हिंदुस्त्रिया आपल्या नवऱ्या-करितां सती जाण्यासही मागेंपुढें पाहात नाहींत, असें इतिहास सांगतो; मग असल्या सहभोजनासारख्या शुष्क बाबतींत आपल्या पत्नीचा अडथळा होतो, असें म्हणणें म्हणजे आपल्या सकल हिंदुकुलस्त्रियांचा उपमर्द करणें नव्हे काय? अर्थात् अंगीं नीतिधैर्य नसल्यामुळें किंवा ती गोष्ट मनापासूनच नको असून देखावा करण्याची मात्र प्रबळ इच्छा असल्यामुळें ही बायकांची ढाल लपण्यासाठीं पुढें करण्यांत येते, असेंच मानलें पाहिजे.

तेव्हां अशा नामर्द मनोवृत्तींच्या पुढाऱ्यांच्या सहानुभुतीचा तुम्हांला कितीसा उपयोग होणार? त्याचप्रमाणें परवां एकेप्रसंगीं निपाणी येथें एका विद्वान् ब्राह्मण वक्त्यानें आम्हांस स्वराज्य मिळालें तर आपण अस्पृश्य मंडळीबरोबर सहभोजन करण्यास आज तयार आहों, असें म्हटलें. आतां मानलेल्या अस्पृश्यांच्या ठिकाणीं जर खऱ्या बंधुत्वाची भावना बाणलेली असेल, तर त्यांच्याशीं भोजन करणें यासारखी शुष्क गोष्ट करण्यास स्वराज्य मिळण्यासारखी प्रचंड अट कशाला पाहिजे? यावरून अस्पृश्यांसंबंधानें आपली बंधुभावना असल्याचें हे जे वरचेवर सांगतात त्याचा खरेपणा किती आहे, हें स्पष्ट होतें; तरी त्यांच्या मदतीवर विशेष भर न देतां आपल्या ज्ञाती–बंधूंना विद्यामृताचें जीवन देण्याला तुम्हींच कंबरा बांधल्या पाहिजेत, असें माझें तुम्हांस कळकळीचें सांगणें आहे. माझ्या राज्यांत मागासलेल्या जातींना वर आणण्याबद्दल माझे जे प्रयत्न झाले आहेत त्याबद्दल उच्च म्हणविणाऱ्या एका सुशिक्षित जातीचा माझ्यावर रुसा झालेला आहे; परंतु ज्याप्रमाणें एखादा डॉक्टर किंवा लेडी डॉक्टर हीं अगदीं अशक्त व दुबळ्या मुलाला पौष्टिक अन्न व औषधें देऊन त्याची जोपासना सर्वांपेक्षां विशेष काळजीनें करून त्याला इतर मुलांच्या जोडीला आणून बसवितात, त्याप्रमाणेंच आम्हीं अस्पृश्य मानलेल्या लोकांना वर आणलें पाहिजे. पुण्यनगरींतील कित्येक लोकांनीं माझ्यावर असा आरोप आणला आहे कीं, महाराज पंक्तिप्रपंच करून आपल्याच जातीला पुढें आणतात. मी असें निक्षून सांगतों कीं, ही गोष्ट निखालस खोटी आहे. श्रीशिवछत्रपतींच्या

नांवाला किंवा त्यांच्या गादीला बट्टा आणणारें असें नीच वर्तन माझ्याकडून होणार नाहीं. राज्याधिकारसूत्रें हातीं आल्यानंतर मागासलेल्या जातींना वर आणण्याचे मीं अनेक प्रयत्न केले; परंतु यावरून ब्राह्मणांचे ठिकाणीं माझा द्वेषभाव आहे, असें मात्र मुळींच नाहीं. अनेक ब्राह्मण माझ्या पूर्ण विश्वासाचे अंमलदार व सल्लागार आहेत; अनेक ब्राह्मणांना मीं इनामें वगैरे दिलीं आहेत, व इतर जातींप्रमाणें त्यांच्या कल्याणाची इच्छा बाळगलेली आहे. या सर्व गोष्टी माझे ब्राह्मण प्रजाजनच या विद्वान् एडिटरांना सांगतील. सारांश अशक्त मुलाला ताकद आणण्यासाठीं त्याची आई त्याची जशी विशेष काळजी बाळगते, त्याचप्रमाणें माझे हे प्रयत्न आहेत. माणगांव येथील माझ्या भाषणांत माझ्या प्रजाजनांना लौकरच थोड्या प्रमाणावर स्वराज्य देण्याचा माझा विचार असल्याचा उल्लेख होता. यावर एका एडिटरानें—'लौकरच ह्मणजे किती वर्षांत व थोड्या प्रमाणावर ह्मणजे किती आणे, याचा खुलासा कोणी भविष्यवादी करील काय'—असा सवाल केला आहे. त्यावर माझें इतकेंच ह्मणणें आहे कीं, हा खुलासा तावडतोब करतां आला तर मला फार आनंद झाला असता. परंतु, काल मराठ्यांच्या सभेंत मीं सांगितल्याप्रमाणें, ही बाब फार महत्वाची असून अनेक गोष्टींचा मला विचार करणें जरूर आहे; व हें होण्यास कांहींसा कालावधी होणें अपरिहार्य असल्यानें वरील सवालाचा आतांच खुलासा करतां येत नाहीं, याबद्दल मला वाईट वाटतें. तथापि, या वेळीं असें विचारावेंसे वाटतें कीं, परवां सोलापु-

रच्या सभेंत एका वक्त्यांनीं हीन जातींवरील अस्पृश्यतेची आपाचे मनांत आणली तर "तेव्हांच" नाहींशी करतां येईल, असें सांगितलें. त्यास, हें 'तेव्हांच' अजून कां आलें नाहीं; व तें केव्हां येणार, याचा खुलासा होईल काय? त्याच-प्रमाणें मागें एका प्रसंगीं एका पुढाऱ्यानें आपण 'चांभाराचा गणपती आपल्या गाडींत घेतला होता; व चांभाराच्या ठिकाणीं आपला भेदभाव नाहीं,' असें सांगितलें होतें. त्यास हा भेदभाव प्रसिद्धपणें टाकून देण्याचा दिवस अजून कां उगवला नाहीं? व तो उगवणार तरी केव्हां? आतां ही अपृश्यता हळूहळू समाज आपोआपच पुढाऱ्यांना मागें टाकून नाहींशी करूं लागला आहे, हें खरें; व त्याप्रमाणें माझ्या प्रजाजनां-कडेही ऑटोमॉटिकली कांहीं राज्यकारभार जाईल, अशी मला आशा आहे. परवां सोलापुरास अहालमवाळांचा जो तंटा झाला, त्याची हकीकत देतांना एका पत्रकारानें 'पुण्याहून किंवा कोल्हापुराहून गेलेल्या तीन हजार रुपयांच्या थैली'चा उल्लेख केला आहे. त्यास ही थैली माझ्याकडून गेली असें ध्वनित करण्याचा त्याचा उद्देश असेल तर त्यावर माझें इतकेंच सांगणें आहे कीं, माझेकडून थैली गेली ही गोष्ट निखालस खोटी आहे. मागसलेल्यांच्या हिताची मला कळकळ आहे; व त्यांनीं योग्य कारणांसाठीं रक्कम मागितली तर ती मीं दिलीही असती. तरी मी रक्कम दिली नसतां, गुप्तपणें दिली असें ध्वनित करून मजवर भ्याडपणाचा नीच आरोप करण्यांत त्या पत्रकाराला काय वाटलें असेल तें असो.

असो. याप्रमाणें आमच्या पत्रकारांचें माझ्यावर प्रेम आहे; तथापि मी त्याची पर्वा करीत नाहीं. मी अज्ञान आहे, व त्यांच्या चौथ्या हिश्शानेंही माझी विद्वत्ता नाहीं. तथापि, मला जें वाटतें तें मी मनोभावानें करतों. अर्थात् इतरांच्या रागाची किंवा लोभाची परवा बाळगण्याचें मला कारण नाहीं.

सरतेशेवटीं माझें तुह्मांला इतकेंच सांगणें आहे कीं तुमचें हें पवित्र कार्य तुह्मीं न डगमगतां अखंड चालू ठेवा; आणि परमेश्वर तुह्मांला या कार्याला पूर्ण यश देईल असा मला भरंवसा वाटतो.

# अखिलभारतीय बहिष्कृत–समाज–परिषद्.

## ( नागपूर तारीख ३० मे १९२० ).

माझी योग्यता नसतां व माझे अनुमतीची जरूरी न ठेवतां मोठ्या बंधूप्रेमानें व सत्तेनें आपण मला अपला समजून आजच्या कॉनफरन्सचा अध्यक्ष नेमिलें, याजबद्दल मला मोठा अभिमान वाटतो.

कांहीं वर्षांपूर्वीं माझ्या कोत्या समजुतीनें मी आपणाकडे बंधूप्रेमानें पाहत नव्हतों. आतां माझी चूक मला समजून आली आहे, व यापुढें तुमचेवर माझें बंधुसारखें प्रेम राहील अशी मला खात्री वाटते, हें उघडपणें सांगण्यास मला मोठा अभिमान वाटतो. वास्तवीक पाहतां आजच्यासारख्या बहुमानास मी विद्येनें योग्य नसतां आपण मला अध्यक्षाचा मान दिला याबद्दल मी आपला फार आभारी आहे.

आपलें कार्य साधण्यासाठीं दुसऱ्यास पाहिजे तितका मोठे-पणा द्यावयाचा, त्याची मनधरणी करावयाची, मी तुमच्या उद्धारासाठीं प्रयत्न करतो असें खोटेंच सांगावयाचें, वगैरे प्रकारांनीं अज्ञ लोकांस फसवून त्यांच्यावर आपली छाप बस-वावयाची असे कांहीं स्वार्थसाधू लोक आहेत. अशा लोकां-

सारखे वागून आपणाला तोंडघशी पाडून माझा स्वार्थ साधण्याची दुर्बुद्धि ईश्वरानें मला देऊं नये, अशी माझी त्याजवळ प्रार्थना आहे.

आज आपण येथें सर्व हिंदुस्थानांतील अस्पृश्य वर्गांपैकीं पुढारी मंडळी जमलेलें आहां. अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणें हें फार निंद्य आहे. सर्व या शब्दाचा तुमच्या संबंधानें उपयोग करितात म्हणून मी त्याचा उपयोग केला आहे. तुम्हीं अस्पृश्य नाहीं. तुम्हांस अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षां जास्त बुद्धिवान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी, असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटकावयव आहांत. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाहीं. आपण निदान बरोबरीचीं भावंडे आहोंत, आपले हक्क समसमान तरी खास आहेतच, अशी भावना धरून आपणास पुढील कामास लागलें पाहिजे. या सत्कार्यांत जे लपंडाव करितात त्यांची लबाडी ओळखण्या इतकी समज हल्लीं जनतेस खास आलेली आहे.

मला आज सर्वांत मागासलेले देशबंधूंनीं या कॉनफरन्सचा अध्यक्ष होण्यास बोलविलें आहे. वास्तविक पहातां मी कोणाचा पुढारी नाहीं; व पुढारी होऊंही इच्छित नाहीं मला पुढारी समजून माझ्या मागें कोणी येऊं लागल्यास त्यास आपण माझ्यामागें येऊं नका असें नम्रतपूर्वक सांगतों, व होईल तितका या बाबतींत प्रतिबंध करितो. हा प्रतिबंध मी अगदीं प्रथम-

पासूनच ह्मणजे घराच्या बाहेर पडण्यापूर्वी माजघरांतच करितों; कारण तशी खबरदारी न घेतल्यास व कांहीं वेळ त्यांना मागें येऊं दिल्यास त्यास तक्रार करण्यास जागा होईल. ते ह्मणतील कीं, आह्मीं इतका वेळ आपले मागें आलों असतां आपण आतांच आह्मास कां झिडकारतां? माझीं मतें व माझें आचरणही माझे स्वतापुरतींच आहेत. माझे घरच्या मंडळींनीं, आप्तेष्टांनीं अगर मित्रांनींसुद्धां विचार न करितां माझे मागून येऊं नये, अशी माझी इच्छा आहे. त्यांना या बाबतींत स्वयंनिर्णयाचें तत्त्व लावण्याची मी पूर्ण मोकळीक ठेविली आहे. माझीं मतें ज्यास पसंत असतील त्यांनीं स्वतःचे इच्छेप्रमाणें स्वतंत्रपणें माझें अनुकरण करावें; त्यांना माझ्याकडून कोणत्याही प्रकारचें उत्तेजन अगर मदत मिळणार नाहीं.

आह्मी सर्व हिंदी आहोंत, बंधू आहोंत. हिंदी प्रजाजन कोणत्याही वर्णाचे असोत; कोणत्याही धर्माचे असोत, ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तीच्या दृष्टीनें धर्माची बाब महत्त्वाची असेल; पण राष्ट्रीय बाबतींत तो केव्हांही आड येतां कामा नये. या पुरती धर्म ही बाब फारच कमी महत्त्वाची आहे, असें मला वाटतें. धर्म शब्दाची थोडक्यांत व्याख्या देवाजवळ पोंचण्याचा मार्ग अशी करितां येईल. लंडन, मुंबई, कलकत्ता, वगैरे मोठमोठ्या शहरास सर्व बाजूंनीं रस्ते येऊन मिळतात, ह्मणजे सर्व ठिकाणच्या लोकांचा उद्देश त्या त्या शहरीं थोड्या वेळांत व श्रमानें पोंचण्याचा असतो. त्याचप्रमाणें निरनिराळ्या देशांत व परिस्थींत उत्पन्न झालेल्या धर्मांचाही उद्देश तोच आहे.

यामुळें भिन्न भिन्न रस्त्यांनीं मुख्य शहरास पोचणारे लोकांना एकमेकांचा द्वेष करण्याचें जसें कारण नसतें, तसेंच निरनिराळे धर्म पाळून ईश्वराजवळ पोचणारे लोकांनीं तरी परस्पराचा द्वेष कां करावा!

निरनिराळे धर्म स्थापन झाले त्यावेळची स्थिती काय असेल ती असो; पण आजच्या स्थितीस तरी अमुक एका धर्माचें आचरण करून अमुक मनुष्य देवाजवळ पोचलेला आहे असें प्रत्यक्ष दिसत नाहीं, व तसा मार्गदर्शक आभास मिळत नाहीं तोपर्यंत माझा तेवढा धर्म चांगला व इतरांचा वाईट, असा पोकळ अभिमान करण्याचा अधिकार कोणासही नाहीं, हें उघड आहे.

'दया धरमका मूल है, नरक मूल अभिमान.' यावरून पहातां देशाची म्हणजे देशबंधूंची सेवा करणें, जनीं जनार्दन शोधणें व पहाणें, हाच खरा धर्म आहे. या बाबतींत सर्व धर्मांचें ऐक्य आहे. परोपकार हा पुण्य मार्ग आहे व परपीडा हें पाप आहे, असेंच सर्व प्रतिपादन करितात. याप्रमाणें विचार केल्यास धर्मभेदाच्या किंवा जातीभेदाच्या सबबिवर एकमेकांचा मत्सर करणें अगदीं चुकीचें आहे.

राज्य संपादन करण्याच्या महत्वाकांक्षेनें पुर्वीं या देशांत लढाया झाल्या. अकबर, शिवाजी महाराज, वगैरे महात्म्यांचे काळीं धर्मद्वेषानें किंवा जातीद्वेषानें कोणी लढाया करीत नसत. अकबर पादशहाच्या पदरीं मराठे, रजपूत व इतर हिंदू सरदार व लढवय्यें लोक अनेक होते. विजयनगरच्या

राज्याचे पदरीं किंवा श्रीशिवाजी महाराज यांचे सैन्यांत मुसलमानांची संख्या कमी नव्हती. या सर्वांनीं स्वधर्मीया बरोबर, किंवा स्वजातीयां बरोबर लढण्याच्या प्रसंगीं देखील आपलें इमान कायम राखिलें. अशा वेळीं त्यांचा निमकहलालपणा व बंधुप्रेम चांगलें प्रकारें दिसून येई.

खरा धर्म सर्व देशांत एकच आहे, हें मी सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें वागणारावर म्हणजे शुभ कर्म करणारावर ईश्वर संतुष्ट असणार, व त्यांना कांहीं शिक्षा करणार नाहीं. पण आह्मी खरा धर्म सोडून म्हणजे जनीं जनार्दन न पाहतां बनावट उच्चनीच भाव उत्पन्न करून त्याप्रमाणें ग्रंथ तयार करून, त्यांच्या आधारावर आमच्या बंधूंना पशुपेक्षांही नीच मानण्याचे भयंकर पातक करीत असतां, आह्मी भागवताचे हजारों सप्ताह बसविले, मोठमोठीं अनुष्ठानें सुरू केली, नानाप्रकारची स्तुतीस्तोत्रें गाईलीं, कीर्तनें, पुराणें यांची झोड उडविली, किंवा भजनें करून कानकानटाळ्या बसेपर्यंत टाळ कुटले, अनवाणी क्षेत्राच्या यात्रा केल्या, देवाच्या मुर्तीस कोंटागणें घातलीं, तरी ईश्वर अशानें तुष्ट होईल काय? तो तुष्ट होणार नाहीं हें खास. इतकेंच नाहीं, तर आमच्या पतकाबद्दल तो आह्मास शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाहीं अशी आमची सद्सद्विवेक बुद्धी आम्हास खास सांगते. ईश्वराची अवकृपा आमचेवरची दूर झाली पाहिजे, तर आह्मी आमच्या सर्व देशबंधूंना मोठ्या प्रेमानें, आपल्या बरोबरीचे हक्क देऊन वागविलें पाहिजे.

इंग्लीश राष्ट्राचे आमच्या देशावर व विशेषेंकरून आमच्या अस्पश्य मानलेल्या बंधूंवर फार उपकार आहेत. त्या राष्ट्रानें मनुधर्म शास्त्रासारखे एका जातीचे प्राबल्य स्थापन करणारे कायदे काढून टाकून सर्व हिंदी प्रजेमध्यें समसमान हक्क निर्माण केले. ब्राह्मणास फांशी देऊं नये त्यास धर्मकार्यांत, अध्ययनांत, वृत्तींत, दानधर्म, पूजाअर्चा वगैरे हरएक बाबतींत परमेश्वराचे योग्यतेचे मानून दुसऱ्या सर्व जातीस तुच्छ, कस्पटा-समान व ब्राह्मणाची सेवा करण्याकरितां निर्माण केलेले आहेत, अशा तऱ्हेचा कायद्यांत, रुढींत, आचारांत व धर्मांत प्रतिबंद घालून ठेवणें, ह्मणजे सद्सद्विवेक बुद्धीला, सर्व उच्च मनोभावनांना तिलांजली दिल्यासारखें आहे. व हल्लीं समानतेच्या दृष्टीनें पाहतां अशांची योजना कायदे पंडितात करण्यास कोणासही लाज वाटेल ! डोळे काढावे, डागावे, वेद वाचूं देऊ नयेत, असे जे, अमानुष कायदे एकेकाळीं मनूनें रूढ केले होते, ते हल्लीं इंग्रज सरकारांनीं नाहींसे केले आहेत. परंतु हल्लीं असलेल्या हिंदु कायद्यांतही पुष्कळ दुरुस्ती झाली पाहिजे. राष्ट्रीत्वाची व समाजाची कल्पना वाढलेली आहे. मिश्रविवाह, परदेशगमन जातिभेद, पर-धर्मीयांविषयीं सहिष्णुता वगैरे सर्व कल्पना फार जोरानें पुढें येऊं लागल्या आहेत. त्या कल्पनांना पोषक असे कायदे पाहिजे आहेत, व तसे नसल्यास समाजाचे गाडें अडकून रहाणार आहे.

सर्व प्रेजला सारखे हक्क आहेत, सर्वांना सारखे कायदे लागूं केले पाहिजे, त्यांत जातीभेदावर कमी अधीक शिक्षा असा अन्याय होतां कामा नये, हें समानतेचें तत्व इंग्रजांनीं राज्यकारभारांत प्रथम लागूं केले व त्यांच्या मिशनरी लोकांनीं शाळा काढून अस्पृश्यांच्या मुलांस फार ममतेनें वागविण्याचें उदाहरण सर्वांचे अगोदर घालून दिलें. अशाप्रकारें न्यायी यूरोपखंडांतील हॉलंड, बेलजम वगैरे देश आपल्या ताब्यांतील परदेशचे लोकांला शिक्षण वगैरे देऊन उन्नती करीत नाहींत. पण इंग्रजलोकांचें या कामीं 'फार लक्ष असल्यामुळें ते श्रेष्ठ पदवीचे आहेत, इतकेंच नव्हे तर आमचे बरेंच लोक स्वराज्य नको म्हणत असताना इंग्रजलोक आपण होऊन तें आम्हांस देत आहेत, हा त्यांचा केवढा थोरपणा आहे? सर्वांस समदृष्टीनें पाहणारें जें इंग्लीश साम्राज्य त्याच्याशीं आम्ही फार राजनिष्ठ राहिलें पाहिजे हें सांगण्यास नकोच. आमच्यावर त्यांचे फार फार उपकार आहेत. गेल्या महायुद्धांत मुसलमान, मराठे, जैन, महार, लिंगायत वगैरे आमच्या सर्व जातींच्या बंधूंनीं सरकारास मोठ्या होसेनें व उत्सुकतेनें मदत केली याचें तरी कारण काय? आपण सर्व हिंदी आहोंत, हिंदी राष्ट्राचें कल्याण इंग्रजी राजसत्तेवर अवलंबून आहे, आमचीं भिन्न भिन्न धर्मतत्त्वें आमच्या बंधुप्रेमाच्या आड येऊं देतां कामा नये, तर आम्ही आमच्या उपकारकर्त्यांची अडचण ओळखून आम्हास देतां येईल तितकी मदत देणें हें आमचें कर्तव्य आहे, वगैरे उच्च भावनांनीं आमचे सर्व लोक प्रेरीत

झाले, हेंच तें कारण होय. याप्रमाणें आमच्या कृतज्ञतेची खातरी आम्ही आमच्या ब्रिटिशबंधूंस पटवून दिली आहे. ईश्वरी इच्छेनें हिंदुस्थानच्या कल्याणाकरितांच आम्ही ब्रिटीश एम्पायरचे अवयव झालों आहों व आमचे हितसंबंध त्यांच्याशीं एक जीव झाले आहेत.

इकडच्यापेक्षां मद्रासकडच्या आपल्या अस्पृश्य बंधूंस फार त्रास सनातन धर्मवाल्याकडून होतो. तिकडचे ब्राह्मण सर्वच ब्राह्मणेतरांशीं फार अन्यायानें वागतात. इकडे महाराष्ट्रांतही तशीच स्थिती आहे. मद्रास येथें ब्राह्मणेतर लोकांचा निराळा पक्ष स्थापन करून त्यांच्यामध्यें आपल्या हक्कांची जाणीव उत्पन्न करणारे थोर मनाचे प० वा० डॉ० नायर यांना धन्यवाद देणें फार जरूर आहे. पंचमांचा उद्धार करण्याविषयीं त्यांचा उद्योग मोठा होता व आपले घरांत खासगी नोकर ते पंचमास ठेवीत.

या देशाची उन्नती लवकर किंवा उशिरा होणें, हें येथील जातीभेद ज्या प्रमाणांत नाहींसा होईल त्यावर अवलंबून आहे. हा जातीभेद नाहींसा होण्यास भिन्न भिन्न जातींचे शरीरसंबंध विस्तृत प्रमाणावर होणें फार जरूर आहे. रोटीव्यवहार जास्त प्रमाणावर आतां होणार, त्याविरुद्ध कोणी कितीही धडपड केली तरी तिचा विशेष उपयोग होणार नाहीं. पण बेटी-व्यवहाराची तशी गोष्ट नाहीं. असे विवाह होण्याकडे प्रवृत्ती

होण्यास अगोदर कायदेशीर अडचणी दूर झाल्या पाहिजेत. ह्मणजे असले विवाह कायदेशीर ठरले पाहिजेत, व त्या पासूनच्या संततीस औरस संततीचे सर्व हक्क मिळाले पाहिजेत. याकरितां नामदार मि. पटेल यांनीं वरिष्ठ-कायदे-कौन्सिलांत प्रश्न आणला होता. तशा कायद्याची फार जरूरी आहे; पण असे विवाह होऊं लागल्यास मग ब्राह्मणांचें जन्मसिद्ध महत्वही कमी होणार. ब्राह्मणावर हें एक मोठें संटक ओढवणार असल्यानें ब्राह्मणी पत्रांनीं त्या बिलाला मोठा कसून विरोध केला. ब्राह्मणी हिताकडे लक्ष्य दिलें म्हणजे हें त्यांचें करणें बरें दिसेल, पण देशहिताकडे यांनीं अगदींच दुर्लक्ष केलें असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. भिन्न जातीचे स्त्री-पुरुष विवाह-बंधनाशिवाय एकत्र राहून त्यांनीं अनीतीचें वर्तन उघड उघड केल्यास या धर्माभिमान्यास खपतें, पण तसा अनी-तीचा संबंध ज्यांस नको त्यांना कायदेशीर विवाह करण्याच्या मार्गांत मात्र यांचा अडथळा. असे हे सार्वनिक नीतिमत्तेचे शत्रु आहेत. याच प्रसंगीं माझे मित्र मि. अरुंडेल यांचेविषयीं दोन शब्द सांगितल्याशिवाय माझ्यानें रहावत नाहीं. यांनीं एका ब्राम्हण युवतीशीं विवाह केला म्हणून आमचे सनातन धर्म वादी ब्राम्हण बंधूंची मर्जी त्यांचेवर फार खपा झाली आहे. व ते नानाप्रकारें त्यांस दूषण देत आहेत. वास्तविक पाहतां इंग्लंड व हिंदुस्थान यांचा, ईश्वरी इच्छेनें जुळून आलेला संबंध जास्त दृढ होण्यास अशा प्रकारचे विवाह फार आवश्यक आहेत. काम असे पर्यंत मात्र तुम्ही आम्ही एक, अशा गप्पा मारणें,

व तें संपल्यावर तुह्मी ते तुह्मी व आह्मी ते आह्मी, असा आप-मतलबीपणा मला बिलकूल पसंत नाहीं. लग्नकार्यांत निरर्थक पैसा फार खर्च होतो, शिक्षणासारख्या उपयुक्त कामाकडे तो लागला पाहिजे, वगैरे गप्पा ते मारतील; पण रजिस्टर करून थोड्या खर्चांत विवाह करण्याची मुभा मात्र त्यांना द्यावीशीं वाटत नाहीं. रजिस्टर न झालेली इकडचीं हिंदूपद्धतीनें लग्नें करून गेलेल्या पुरुषानें विलायतेंत किंवा फ्रान्सांत जाऊन उघडपणें तेथील पद्धतीप्रमाणें विवाह करावा. असें करण्यानें कोणताही गुन्हा होत नाहीं, असा कायदा इंग्लंड वगैरे देशांत आहे. अशा रीतीनें अनेक तरुण पुरुषांनीं तिकडे विवाह करून इकडे हिंदू पद्धतीनें परिणिलेल्या आपल्या निरपराध बायकांस पती जिवंत असतांच वैधव्याच्या गर्तेंत लोटीलें आहे. पण याची खंती आमच्या सनातन—धर्मवाद्यांस वाटत नाहीं ! इकडे विवाह रजिस्टर करण्याची सवड असती तर अशा तरुणांस तिकडे दुसऱ्या बायका करण्यास कायद्याचा प्रतिबंध झाला असता. पण मग भिन्न जातींतील विवाह बंदी उजळमाथ्यानें यांना करितां आली नसती. ह्मणून पटेल बिलाविरुद्ध यांची सगळी हाकाटी ! भिन्न जातीच्या मुलीशीं विवाह करून जी संतती होईल, तिला धर्माभिमानी अशा पूर्वजांच्या व भाऊबंदांच्या मिळकतीचा वारसा येणेंबरोबर नाहीं, अशी एक आपत्ती प्रगतिकारांनीं पुढें केली होती; पण ही तक्रार अगदीं पोकळ व मतलबी आहे. आजच्या कायद्याप्रमाणें कोणी ख्रिश्चन झाल्यास किंवा मी हिंदू नाहीं अशी प्रतिज्ञा करून विवाह केल्यास,

त्यांच्या संततीस जर वारसा येतो आणि ती गोष्ट प्रगतिकार व त्यांचे सनातनवादी उघड्या डोळ्यांनीं पहात आहेत, व त्या विरुद्ध तक्रार करण्याची हिंमत त्यांचे अंगीं नाहीं, तर त्यांनीं भिन्न जातीच्या मुलींशी, हिंदू राहून लग्न करणाराविरुद्ध मात्र हाकाटी करावी, हें केवढें आश्चर्य? आपल्यासारख्या पतिताच्या उद्धारार्थ पटेल बिलासारख्या कायद्याची फार जरूरी आहे, ह्मणून त्या दिशेनें जे प्रयत्न करीत असतील त्यांचे आपण आभारी असलें पाहिजे.

दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें, पण आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं, ही म्हण बरेच वेळां अनुभवास येते. इंग्रज लोक हिंदुस्थानास लुटीत आहेत असें खोटेंच भासवून इंग्लिश सरकारच्या विरुद्ध अराजकत्व उत्पन्न करण्याचे प्रयत्न उघड किंवा गुप्तरीतीनें आज दहावीस वर्षें करणारे ब्राह्मण लोक आपल्या खोट्या ग्रंथांतील लबाड्या उघडकीस आणणारे सत्यशोधकांचे जलसे बंद करावेत ह्मणून सरकाराकडे तारा कर-तात याची त्याना लाज कशी वाटत नाहीं!

'बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें' असे श्री तुकोबाराया म्हणतात. हे ह्मणणें मला परम वंद्य आहे; पण फसवे लोकांचा मला तिटकारा आहे. माझ्या मताप्रमाणें तरी समाजसेवेचें पवित्र काम करीत असतां, त्यास विघ्नें आणणारे बरेच लोक आपण सर्वांचे पुढारी आहों, आपणास तुमच्याविषयीं फार सहानुभूति आहे, असा बहाणा करून

समाजास खालीं ओढण्याची कुटिल नीति चालू ठेवीत असतात. माझ्या नाशीक येथील भाषणावर बरीच प्रतिकूल-टीका प्रसिद्ध झाली आहे. त्या टीकेचें मला मोठें कौतुक वाटतें. कोल्हापूरसंबंधानें स्वतःला ज्यांस कांहींच माहिती नाहीं, आपली सर्व माहिती कर्णोपकर्णी आहे, अशी ज्यांनीं सुरुवातीसच कबुली दिली आहे, त्यांनीं कोल्हापुरांत एखाद्या खटल्यासंबंधानें काय झालें आहे, काय चाललें आहे, काय होणार आहे, यासंबंधीं माहिती काढण्याची तसदी न घेतां, तोंडास येईल तें वायफळ बोलावें, व पुराव्याशिवाय वाटेल ते तर्क लढवावे, ही गोष्ट किती शरमेची आहे बरें! या सर्वांचा अंतस्थ हेतु ह्मटला ह्मणजे रूढ समाजरीतीस अगर प्रस्थापित विशिष्टवर्गाचे हक्कास कोणी हात लावण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्यास भेवडावून टाकावें, व विशिष्ट वर्गाचें वर्चस्व कायम राखावें एवढाच आहे. समाजास बुडविणारी अशी बेजबाबदार माणसें लोकांचे पुढारी ह्मणून मिरवितात; अशा लोकांची मला तर कींवच येते.

या असल्या वाकड्या चालीच्या मंडळीच्या हातून समाज-सुधारणा होणें शक्य नाहीं. कावळ्याला जसें क्षतच दिसा-वयाचें; तसें यांना जेथें तेथें वाईटच दिसतें. उदाहरणार्थ, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या कांहीं लोकांना मी माझ्या संस्थानांत वकीलीच्या सनदा दिल्या त्यावरील टीका पहा. वैद्यकी, वकिली, वगैरे धंदे आपलींच चरण्याचीं कुरणें आहेत व तशीं ती राखिलीं पाहिजेत, अशी कांहीं विशिष्ट जातीची सम-

जूत होऊन बसली आहे. उत्तम माणसांनींच सर्व कामें करावींत हें ह्मणणें तात्त्विकदृष्टीनें कोणासही कबूल करावें लागेल. मला राज्यकारभारांत सर्व तत्त्वें परिस्थितीस अनुसरून थोडींबहुत बदलणें भाग पडतें. इंग्रज सरकारनीं आरंभीं शिक्षणबाबतींत कितीतरी कमी दर्जाच्या हिंदी लोकांस कलेक्टर, जज्ज, वगैरे सारख्या मोठाल्या जागा देऊन राज्यकारभाराचें काम शिकविलें, त्याचप्रमाणें आरंभीं वकिलीच्या सनदाहि परीक्षेशिवाय साधारण शिक्षणाच्या माणसास देण्यांत येत असत, व हल्लींहि इंग्रज सरकाराच्या राज्यांत परीक्षा पास झालेले लोक पुष्कळ मिळत असतांही मुखत्यार वकिलीच्या सनदा परीक्षेशिवाय देण्यांत येत आहेत. ज्या सनदा मी महार, मांग, चांभार इत्यादि लोकांना दिल्या, त्याच जर ब्राह्मण, कायस्थ, सारस्वत, अशा लोकांना दिल्या असत्या तर त्याबद्दल कांहीं गवगवा झाला नसता, व तशा दिल्या त्या वेळीं झालाही नाहीं. पण आतां तितकेच योग्यतेच्या मराठ्यांस व अस्पृश्य माणसांस दिल्यावर गवगवा केला जातो, ही त्यांच्या उदार अंतःकरणाची साक्षच आहे. मॅट्रिक पास झालेले अगर इंग्रजी चांगले शिकलेले, महार, मांग यांस वरिष्ठ दर्जाच्या धंद्यांत आणतांच ब्राह्मणी समाज खवळून गेला. तेच महार मांग, जर ख्रिश्चन झाले असते, तर माझें कृत्य टीकेस पात्र झालें नसतें. ज्या महार-मांगास मी वकीलीच्या सनदा दिल्या त्यांच्यापेक्षां विद्येनें व अकलेनें फार कमी अशा पुष्कळ वरिष्ट जातीचे लोकांस कित्येक देशी संस्थानांतून वकिलीच्या

सनदा देण्यांत येतात, त्याबद्दल मात्र समाजास कांहीं कमीपणा वाटत नाहीं. सनदा दिल्यामुळें कोणाही व्यक्तिस वकीलपत्र अमक्यास दिलेंच पाहिजे असें भाग पडत नाहीं. वाटेल तो वकील वाटेल त्यांनीं करावा, अशी मुभा असतेच. अशा वकिलीच्या सनदा देण्यांत माझा हेतु एवढाच आहे कीं, जे धंदे अस्पृश्य वर्गास रुढीनें, कायद्यानें, अगर दडपशाहीनें बंद झालेले आहेत, ते त्यास मोकळे करून द्यावेत व त्यांची स्थिति सुधारून, त्यांच्यांत आपण इतर माणसांचे बरोबरीचे आहोत असा आत्म विश्वास उत्पन्न करावा. मी स्पोर्टस्मन आहे. घोड्यासंबंधी माझा असा अनुभव आहे कीं, त्यास पाणी दाखविले तरच तो पितो. दाखविलें नाहीं. तर तो पीत नाहीं; तसेच वकिलीं करण्याची संधी या लोकास मिळाल्यास ते तें लवकरच उचलतील. तशी संधी न मिळाल्यास तें काम करावें असें त्यांस वाटणार नाहीं. मातंग, टंक, पराशर, वसिष्ट, चोखामेळा, हे जरी हलक्या मानलेल्या जातीमध्यें उत्पन्न झाले तरी ते आपल्या योग्यतेनें पुढें आले. यावरून पाहतां या जातींत योग्यता कमी असते असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. इंग्लंडमध्यें देखील थोडेच वर्षांपूर्वीं कायद्याच्या शिक्षणावर विशेष जोर न देतां 'इन्स ऑफ' कोर्ट मध्यें जेवणाच्या संख्येवर बॅरीस्टर होता येत असे. हिंदुस्थानांतील मॅट्रिक्युलेशनची परिक्षा पास न झालेले लोक देखील याप्रकारें बॅरिस्टर होऊन येत. अशा लोकांना कायद्याची किंवा दुसऱ्या शिक्षणाची विशेषशी जरूरी नसे. पण हें टेबल बॅरिस्टर वाटेल

त्यां कोर्टांत काम चालविण्याच्या योग्यतेचे समजले जात, व अशा लोकांमधून सुद्धां नामांकित कायदेपंडित निपजले आहेत.

आतां महार, मांग, वगैरे हलक्या मानलेल्या जातींना मी वकीलीच्या सनदा देतो, या योगानें उच्च वर्गीय लोकांचा अपमान होतो असें कांहीं बऱ्या लोकांस वाटतें, पण ही त्यांची चूक आहे. विद्या घेऊन दोन तपे थांबून नंतर समाज बरोबरीचे हक्क देईल किंवा नाहीं या विचारांत बुचकळ्या खात पडण्यापेक्षां त्यांस एकदम दास्यत्वापासून मुक्त करून आजपर्यंत जगांतील इतर कोणत्याही ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस न येणाऱ्या समाजाच्या जुलमाचा, जाचाचा, आणि निर्दयपणाचा अंत करावा, या योगानेंच खरें राष्ट्रकार्य होईल अशी माझी दृढ समजूत आहे. व त्या मार्गानेंच आपला कार्यभाग उरकला जाणार आहे, काळाकडे बोट दाखवून कांहीं न करणाऱ्या समाजधुरंधरानीं अन्य मार्ग स्विकारल्यास त्यांचा तो त्यांसच लखलाभ होवो. जातिभेद नाहींसे झाले पाहिजेत हें हल्लीं बऱ्याच लोकांस कबूल झालें आहे, व हे खरेंही आहे. परंतु प्रश्न एवढाच आहे कीं, त्या कामाची सुरवात कोठून व्हावयाची? ज्या जातीचे लोकांना हलके मानले जाते, त्यांनीं जातीभेद मोडावा असे ह्मणणे साहाजीकच आहे. परंतु त्या दिशेनें त्यांनीं कितीही यत्न केले तरी त्याचा तादृश्य उपयोग होणार नाहीं. या कामीं सुरवात उच्च ह्मणविणाऱ्या जातीकडूनच झाली पाहिजे. प्राचीन काळापासून वंशपरंपरागत उपभोगिलेलें वर्चस्व त्यांनीं सोडून देण्यास तयार झालें पाहिजे, व या पवित्र स्वार्थ

त्यागाचा कित्ता त्यांनीं सर्वांस घालून दिला पाहिजे. जपानांतील जातीभेदाचा बीमोड होण्यास मोठें कारण उच्च वर्गाचे सामुराई लोकांनी सुरवात केली हेंच आहे. तसें झालें नसतें तर जपानची स्थिति कधींही सुधारली नसती. जातिभेद मोडण्याचे प्रयत्न केवळ खालच्या वर्गाकडून सुरू झाल्यास त्याचे परिणाम अनार्थावह होण्याचा संभव आहे. तेंच काम उच्च ह्मणविणाऱ्या लोकांकडून प्रथम झाल्यास हें स्वार्थ त्यागाचें उदाहरण इतर सर्व जातींना बोधप्रद होईल. जोंपर्यंत असें झालें नाहीं तोंपर्यंत हल्लींच्या स्थितीचा उपयोग करून वैमनस्य न वाढवितां प्रत्येक जातीनें आपली सुधारणा करून घेण्याचे यत्न सुरू ठेविले पाहिजेत. खालील जातीनीं आपली सुधारणा करून आपला दर्जा वढवून घेण्याचा व वरच्या पायऱ्यावर चढण्याचा प्रयत्न चालूच ठेविला पाहिजे. आणि वरील जातीनींही जरूर तर कांहीं पायऱ्या खालीं येऊन त्यांना हात देऊन वर घेतलें पाहिजे. असें झालें ह्मणजे सुरळीतपणें व सलोख्यानें हें जातीभेद मोडण्याचें बिकट काम सिद्धीस जाण्याचा संभव आहे. आम्हांसारख्या मराठ्यांनासुद्धां जात मोडून एकी करण्यास भाग पाडलें पाहिजे. धर्मबंधनाच्या अडचणी कित्येक लोक पुढें आणतात परंतु तशी स्थिति नाहीं. गेल्या युद्धांतसुद्धां मेसापोटेमियामध्यें हिंदु–मुसलमान खांद्याशीं खांदा लावून लढले. या कामीं त्यांना धर्माचा अडथळा झाला नाहीं. फक्त आपण एकाच राष्ट्राचे भिन्न भिन्न भाग अगर एकाच देहाचे भिन्न भिन्न अवयव आहोंत, या भावनेनें सर्व लोक प्रेरित झाले होते. व त्यामुळेंच

अखेर इंग्लिश राष्ट्राला यश मिळालें. हिंदुस्थानचें रक्षण ब्रिटिश सरकारकडून अनेक वेळां झालें तेंही याच तत्वावर. आपल्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांना ते कधींही विसंबत नाहींत. खिस्तधर्मीय लोकांकडून जरी आमचा छळ झाला, तथापि आपल्या धर्माच्या लोकांस एका बाजूस ठेवून त्यांच्या पासून आमचे संरक्षण करण्यास ब्रिटिशसरकारच कारण झालें. त्याप्रमाणें रशियनलोक जोरांत असतांना त्यांच्यापासून अगर अफगाण लोकांपासून हिंदुस्थनावर संकट येण्याचा संभव दिसला, तेव्हां देखील ब्रिटिशसरकरनी आपल्या सेनेची आहुती देऊन आमचा बचाव करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. तेव्हां धर्माच्या योगानें दुही माजते, धर्म एकीच्या आड येतो, असें कधींही ह्मणतां येणार नाहीं!

शेवटीं मी पुन्हां एकवार सांगतों कीं, माझी मतें मी लोकांपुढें निर्भीडपणें मांडतों ह्मणून लोकप्रियता मिळविण्याकरितां मला कांहीं लोक ओंगळ शिव्या देतात. पण त्या हास्यास्पद होतात व ते सुजनांच्या निंदेस पात्र होतात. याचें मला वाईट वाटतें. मी मागसलेल्या लोकांचा उद्धार करण्याचा प्रयत्न करतो, त्यांचा दर्जा समाजांत वाढावा असे माझे प्रयत्न आहेत, पण त्याचा विपर्यास करून मजवर ब्रह्मद्वेषाचा आरोप करण्यांत येतो. तो कितपत खरा आहे, याचा विचार आपणच करावा. व हें विचार करण्याचें काम मी आपल्यावरच सोंपवितों.

आपण मला आज आपला असें ह्मटलें आहे. त्याच-प्रमाणें शेवटपर्यंत प्रेम दृढ ठेवा. मी देखील कितीहि अडचणी आल्या, कितीहि त्रास झाला, तरी त्याला न जुमानतां आपल्या उन्नतीच्या महत्कार्यास शक्य तेवढा हातभार लावण्यास कधीहि मागें घेणार नाहीं. असें आश्वासनन देऊन मी आपलें भाषण संपवितों.

## Extempore Speech at Nagpur.

मी आज आपला अध्यक्ष झालो ह्मणून व मी आपला कैवार घेतों ह्मणून एक विवक्षित जात नेहमीं माझी टवाळी व निर्भत्सना करिते व लोकमत माझ्या विरुद्ध करण्यास चिथावून देते. परंतु अशा करण्यानें मला उत्साह व उत्तेजन येते व जीं वर्तमानपत्रें माझी निर्भत्सना करितात त्याचे मी अभिनंदनच करितों. मला कितीही त्रास व उपहास सोसावा लागला तरी तो मी निमुटपणें सोसतो व तुमच्या सेवेस मी हांके बरोबर हजर राहातो. माझी नोकरी घेण्यास आपण कोणतीही शंका बाळगूं नका. मी व माझे प्रिय मित्र निंबाळकर, भोसले, बाबूराव यादव, कदम, दत्तोबा पेंटर, बेळगांवे पाटील, यांनीं आपल्या सेवेस सर्व झीज सोसून आपले देह झिजविण्याबद्दल शपथा घेतल्या व आपल्या सर्वांच्या कृपेनें माझा मुलगा कर्ता आहे, तो माझे मागें सर्व पाहण्यासारखा आहे. तरी माझेवर एकाद्या " ऑलीगार्कीनें " आपल्या ब्युरॉक्रसीचा अम्मल जर

स्थापीत केला तर मी माझें सर्व राज्य मुलांवर सोंपवून तुमच्या सेवेस तयार राहाण्याची प्रतिज्ञा केली आहे. व माझ्याकडून सेवा घ्याल अशी आशा आहे.

जो दुसऱ्यावरी विश्वासला ॥
त्याचा कार्यभाग बुडाला ॥
जो आपणचि कष्टत गेला ॥
तोचि जाण भला ॥

या नियमा प्रमाणें आपल्या हितसाधक बंधूंनीं मदत केल्यास त्यांच्या मदतीचा मोठ्या जोरानें निषेध करा.

आमचे मित्र डॉ. परांजपे असें म्हणाले कीं, वर्णाश्रम धर्मा प्रमाणें क्षत्रीयवर मुळींच नाहींत. व बाकीचेहि वर्ण नाहींत. परंतु ही मात्र गोष्ट मला मान्य नाहीं. ब्राह्मणांना ब्रह्म कर्म रोज करावे लागतें व त्यांचें सामर्थ्य शापानें एकाद्यास भस्म करण्याचें असते. त्याच प्रमाणें कोणतेंहि ब्रह्मतेज त्यांचें अंगी दिसत नाहीं. दस्यू व चांडाळाची वृत्ती हेहि ते घेतात. नोकरीचा पेशा हें एक त्यांनीं आपले चरण्याचें कुरण बनवून टाकले. यावरून हे ब्राह्मण मुळींच नाहींत. निदान या दक्षिणेंत तरी हें खात्री पूर्वक सांगता येईल. कारण पृथ्वीवर ब्रह्मतेज कोणांतच नाहीं वैश्य वैश्याचा धंदा करितात ते गीतेंतल्या नियमा प्रमाणें वैश्य आहेत. शूद्र, शूद्राचा धंदा वृत्ती. क्षत्रीय, क्षात्रकर्म रोज करण्याचे कारण, नसते क्षात्रकर्म रोज करूं

लागल्यास सर्वच मरून जातील. परंतु क्षात्रकर्म दाखविण्याची वेळ शेंदोनशें वर्षांतून एक दोन वेळच येते. त्या प्रमाणें महायुद्धांत मराठ्यांनीं क्षात्र कर्म दाखविले. परंतु डॉ० परांजपे यांचे ह्मणण्या-प्रमाणें मात्र ब्रह्मकर्म करणारे ब्राह्मण नसल्यामुळें दस्यु, नोकर पेशे करणेवाळी अशी ही नवीनच जात बनली आहे. ब्राह्मणा-शिवाय तीन वर्ग जीवंत आहेत, हें सहजच लक्षांत येईल.

# कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेपुढें अध्यक्ष या नात्यानें झालेलें भाषण.

( हुबळी ता० २७ जुलई सन १९२० इ. )

सर त्यागराज चेट्टी, माझे प्यारे मर्द भाई व भगिनीं नोः—

मी आज या परिषदेचा अध्यक्ष होण्यास लायख व योग्यतेचा नसतांना आपण मला आपलाच समजून हक्कानें अध्यक्ष केलें; याबद्दल मला कितीतरी अभिमान वाटत आहे. या इलाख्यांत धारवाड हुबळी वगैरें ठिकाणीं मीं विद्येकरितां माझे तरुणपण घालविलें; त्या मुलखांत मी आज दुसऱ्यांदा आपल्या परिषदेचा अध्यक्ष आपण केल्यामुळें आलों आहे.

या प्रसंगामुळें आह्मांस आज सर त्यागराज चेट्टी यांच्या सारख्या महा पुरुषांची प्राप्ति झाली आहे. मिस्तर चिकोडी सारखे उत्साही गृहस्थांचीं जोड मिळाली आहे. मिस्तर मेणशिनकाई व मिस्तर कंबळी यांनीं तर रात्रंदिवस मेहनत करून आपली परिषद यशस्वी केली आहे.

ब्राह्मणांनीं विद्या रक्षण केली व विद्येची ज्योत राखिली याबद्दल आह्मी त्यांचे किती तरी अभिनंदन करावें. परंतु

त्यावेळीं नामदार रानडे, गोखले, आगरकर यांचे सारखें उदारमतवादी असते तर, खरोखरच त्यांनीं सर्वांना विद्यादान दिलें असतें व आप्पलपोटेपणानें दुसऱ्यांना विद्या शिकवूं नये असा जो प्रकार चालू झाला, त्याला आळा पडला असता. व ब्राह्मण ब्राह्मणेतर हा भेद राहिला नसता. व आज ब्राह्मणेतरांची ह्मणून परिषद स्वतंत्र भरविण्याचा प्रसंग आला नसता.

मी जात नको असें प्रतिपादन करितो. परंतु वर्ग पाहिजे, असें माझें ठाम मत आहे. ब्राह्मणी धर्मांत जात असल्यामुळें ब्राह्मण जातीनें, कुलवान ब्राह्मणेतर स्त्रीशीं कसेंही असभ्यतेचें वर्तन केलें तरी त्यांचा कुलोद्धार होतो. उदाहरणार्थः—कृष्ण-स्त्रियांवर कांहीं संकट आलें असतां दाल्भ्य ऋषीनीं त्यांना व्रत करण्याबद्दल उपदेश केला. तें व्रत असें आहे कीं:—रविवारीं, हस्त, पुष्प व पुनर्वसु नक्षत्रावर स्त्रीनें औषधीयुक्त उदकानें उत्तम प्रकारें स्नान करावें, नंतर विष्णूची "लिंगस्थानाय नमः, कंदर्पनिधयेनमः" इत्यादि मंत्रपूर्वक पूजा करावी. नंतर अवयवांनीं अव्यंग अशा ब्राह्मणास बोलावून त्यास यथेच्छ पंचपक्कान्नांचें भोजन देऊन नंतर हा साक्षात् कामदेव असें चित्तांत मानून, तो रती साठीं जें जें इच्छील तें तें तिनें करून सर्व भावानें आपला देह, हास्ययुक्त भाषण करीत, त्यास अर्पण करावा. पुढें हें व्रत घेतल्या दिवसापासून जो ब्राम्हण रतिसुखासाठीं रविवारीं येईल त्या दिवशीं त्याला सर्व भावें करून

अवश्य मानावें व तो गेल्यानंतर इतरांचा आश्रय करावा. ( पहा, मत्स्य पुराण कलकत्ता प्रत अध्याय ६९ वा. )

महाभारतात गृहस्थाश्रम धर्म असा सांगितला आहे:— एक ब्राम्हण ओघवती राणीकडे जाऊन तिला "मी अतिथि आहे, माझे मनोरथ पूर्ण कर, हा अतिथि धर्म आहे" असें सांगून तो तिचा उपभोग घेऊं लागला. इतक्यांत तिच्या नवऱ्यानें बाहेरून येऊन दारावर थाप मारली; तेव्हां ब्राम्हणानें आंतून ओरडून सांगितलें कीं "हे अग्निपुत्रा, सुदर्शना, मी ब्राम्हण तुझ्या येथें अतिथि आलों आहे. ही तुझी पत्नी अतिथियोग्य अशा सत्कारानें मला रतिसुख देऊन संतुष्ट करीत आहे." त्यावर तो बाहेरून हंसून म्हणाला "माझी सर्व संपत्ती, बायको फार काय तर प्रत्यक्ष माझे प्राणही मी अतिथिला देईल अशी माझी प्रतिज्ञा आहे व गृहस्थाश्रमीयांचा हा धर्म आहे." (पहा, महाभारत अनुशासनपर्व अध्याय दुसरा. )

कदाचित् याजवर कांहीं लोक असा आक्षेप घेतील कीं या जुन्या पुराणांतील कथा आहेत. त्या आतां कशास उकरून काढतां? परंतु त्यांचे परिणाम आज तारखेपर्यंत ही जनतेस कसें भोगावें लागत आहेत हें खालील उदाहरणावरून दिसून येईल. विक्रम संवत् १९५७ सालीं आषाढ महिन्यांत अलाहाबाद येथील एका गृहस्थानें आपल्या मातेच्या अनुमतीनें पुराणांतील गोष्टीस अनुसरून आपल्या स्त्रीचें

दान करून टाकिलें. तिच्या दंडास धरून उपाध्याय तिला आपल्या घरीं नेऊं लागला. त्या गृहस्थानें आपल्या स्त्रीस परत मिळविण्याकरितां पांच हजार (५०००) रुपये देऊं केलें. पण व्यर्थ; शेवटीं तंटा विकोपास गेला व ब्रिटिश माजिस्ट्रेटनें असा निकाल दिला कीं देणगी इंग्रजी कायद्याच्याविरुद्ध असून उपाध्याय शिक्षेस पात्र आहे. त्या वेळच्या वृत्तपत्रींत याची सविस्तर हकीगत दिसून येते. जर एक ज्ञात याप्रमाणें प्रबल नसती तर असें प्रसंग केव्हांच आले नसते. करितां ज्ञाती मोडून वर्गास महत्व देऊं या. जे आपणांशीं सहकार्य करण्यास अगर सहानुभूति दाखविण्यास तयार नाहींत त्यांना विनवून पाहूंया, बोधून पाहूं या, सुविचार सांगून पाहूं या; त्यांनीं तें न मानल्यास त्यांचा द्वेष न करितां आपण त्यांच्या वाटेस न जाण्याचें ठरवूं या. व परमेश्वर न्यायी आहे. त्यांच्या अवनतीच्या कृत्याबद्दल त्यांना पश्चात्ताप होईल असें आपण वर्तन करूं या. व त्याना खरा पश्चात्ताप झाला आहे असें दिसून आल्यास व पुन्हां ते आपल्या पूर्व वळणावर जाणार नाहींत अशी आपली खात्री झाल्यावर त्यांना आपणांत बंधुप्रेमानें मिसळून घेऊं या. " चातुर्वर्ण्यं मया सृष्टम् गुणकर्मविभागशः " याचा आधार घेऊन जन्मावर श्रेष्ठपणा स्थापित करण्याचा प्रयत्न होत असतो. पण तो चुकीचा आहे. हें विस्तारानें दाखविणेची जरूरच नाहीं. वसिष्ट वगैरे ऋषी हलक्या कुळांत उत्पन्न झाले असतांही गुण व कर्म यांच्या योगानेंच त्यांना ब्राह्मणत्व मिळालें आहे. हीच परंपरा आजपर्यंत

चालत आली असती तर आज दिसत असलेली समाजाची अवनति व दुही दिसलीच नसती.

नुकत्याच संपलेल्या मोठ्या युद्धांत हल्लीं जी आमची मदत राष्ट्राला झाली ती लोकसंख्येच्या मानानें योग्य झाली असें मला मुळींच वाटत नाहीं. मी रिक्रुटींग बोर्डाचा मेंबर असल्यानें ही गोष्ट मला खात्रीलायक माहीत आहे. ब्राह्मण ब्राह्मणेतर हा भेद नसता तर, लढाईत यापेक्षां जास्त मदत साम्राज्यास झाली असती; व त्या योगानें राष्ट्रकार्यही मोठ्या जोरानें झालें असतें.

जैन व लिंगायत वगैरे लोक मूळचे हिंदू असून, नीतीनें, बुद्धीनें, व शरीरसंपत्तीनें मजबूत असल्यानें, ब्राह्मणांनीं आप्पलपोटेपणानें शिक्षणाचा मार्ग बंद केला, त्यास नाराज होऊन त्या धर्मांतून निघून, त्यांनीं नवीन धर्म स्वीकारला; व अशा रीतीनें ब्राह्मणी जूं झुगारून देऊन ते स्वतंत्र झाले. तरी ब्राह्मणेतर आपले आप्तइष्ट होत, भाऊबंद होत, हें आपण स्वतंत्र झाला असतांही न विसरतां, आपल्यांत व्यापार धंदा कसा वाढला, विद्यावृद्धी कशी झाली, सांपत्तिक स्थिति कशी सुधारली हें आपल्या गरीब मराठे व इतर ब्राह्मणेतर बंधूस समजून सांगून त्यांच्यांत व्यापाराची व विद्याज्योतीची जागृति करावी, व बंधुप्रेम वाढवावें. सुदैवानें प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें झाल्यास, एकदोन पिढींतच आपली उन्नति होणार आहे; विटून गेलेल्यांना, कंटाळून गेले-

त्यांना जड जोखडाखालीं त्रासून गेलेल्यांना विद्यादान व व्यापारी--ज्ञानदान देऊन आमचे जैन, लिंगायत-बंधू, बंधूप्रीतीची वाढ करीत आहेत; हें पाहून किती-तरी आनंद होत आहे. व त्यांचें आमच्यावर जसें प्रेम आहे तसेंच आमचेंही त्यांच्यावर पूर्ण प्रेम आहे; हें आजच्या सारख्या प्रसंगानें वारंवार व्यक्त होत आलेंच आहे. अशाच प्रकारची सहकार्यता आमच्या कार्यास ज्याप्रमाणें महात्मा रानडे, गोखले, आगरकर, वगैरे उदार मतवादी ब्राह्मणांकडून मिळत होती, व जी ज्योती त्यांचें निधना-नंतर बहुतेक विझून गेल्या सारखींच दिसत आहे. त्या ज्योतीचें पुनर्जीवन होऊन ती सहकार्यता पुन्हां एकबार आह्मांस मिळूं लागेल असें आम्हीं प्रयत्न करावें.

केसरीकारांनीं असें म्हटलें आहे कीं "सद्बुद्धीनें बोलावयाचें तर ईश्वराचें मुख, बाहु, ऊरु, व पावलें असा भेद न करितां सर्व मनुष्य जात एकाच ईश्वरापासून निर्माण झाली आहे असेंही म्हणतां येईल. पण बोलणाराची बुद्धी सरळ असेल तेव्हां. तीं सरळ नसली म्हणजे सैतानालाही बाय-बलांत आधार सापडूं शकतो." याबद्दल त्या पत्रकाराचे आह्मी अभिनंदनच करितों. आमचें म्हणणें तरी तेंच आहे. परंतु "बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें." आजपर्यंत आम्हीं एकाच ईश्वराचीं लेंकरें आहोंत या समभावनेनें ब्राम्हण म्हणवि-णारांनीं ब्राम्हणेतरांना केव्हां तरी वागविलें आहे काय? वाग-

विणें तर दूरच राहो, परंतु बोलणें तरी आतां सुचूं लागलें आहे. हें कशाचें फळ आहे?

क्षत्रियांचे गुरु ब्राम्हणच होते असेंही तेंच पत्र म्हणतें. वशिष्ठ ऋषींचा जन्म वेश्येपासून झाला आहे. त्यांनीं आपल्या गुणकर्मानें अधिकार संपादून ब्राम्हणपद मिळविलें होतें. ब्रम्हाधिकारयुक्त ब्राम्हण हे आम्हांस केव्हांही पूज्यच वाटतील. मग ते जन्मतः शूद्र असोत अगर अतिशूद्र असोत. महाभारत, भागवत, वगैरे महापुराणें व इतर पुराणें हीं सर्व ब्राम्हणांनींच लिहिलेलीं आहेत. त्यांतील लिहिणारांचे विरुद्ध विधानें, हीं लिहिणारांसच बंधनकारक होतात, इतरांस विरुद्ध त्यांत असलेलीं विधानें मात्र इतरांस बंधन होऊं शकणार नाहींत हें पुराव्याचें कायद्यांतील तत्व कायदे पंडित म्हणविणारांस शिकवावयास पाहिजे काय?

समाजाची नीतिमत्ता वाढणें हें सामाजिक सुधारणेचें एक महत्वाचें अंग आहे. वाईट रीतीभाती व धर्मभोळेपणा यांच्या योगानें आमचेमधें मद्यपान, बालविवाह, जुलमाचें वैधव्य, देवास मुली वाहणें असें घातक प्रकार रूढ होऊन त्या पासून शारीरिक, मानसिक व बौद्धिक अवनति झाली आहे. ही अवनति दूर करण्यास आपण उपाययोजना करावी. या बाबतींत शील बनविणें हेंच मुख्य कर्तव्य आहे. शीलवान् नागरिकाशिवाय राष्ट्र बनणें अगर उदयास येणें या गोष्टी शक्यच नाहींत. शारीरिक उन्नतीकडेही आपण लक्ष दिलें

पाहिजे. परंतु केवळ शारीरिक शौर्य, वीर्य कितीही अंगांत असलें तरी नीतिमत्तेची अवनति झाल्याबरोबर रोम सारखीं बलाढ्य राष्ट्रेंही कशीं रसातळास मिळालीं हें आपण विसरतां कामा नये.

गेल्या लढाईंत ज्या विविक्षित हिंदु जातींची मदत फार झाली आहे, राजनिष्ठेकरीतां व राष्ट्रकार्याकरितां, जातीभेद व धर्मभेद विसरून, ज्यांनीं आपलें कर्तव्यकर्म उज्वळपणें पार॰ पाडीलें आहे त्यानीं इतरांना हा एक कर्तव्यकर्माचा धडाच घालून दिला आहे. राष्ट्राची उन्नति व आपल्या सार्वभौम सरकारशीं राजनिष्ठा, हाच आपला धर्म समजून वागण्याचें श्रेष्ठ धारिष्ट दाखविण्याची संधी इंग्रज सरकारनीं गेल्या युद्धांत आपणास दिली, याबद्दल त्यांचे खरोखरच आपण फार आभार मानले पाहिजेत. त्याचें योगानें आपल्या धार्मिक व सामाजिक उत्क्रांतीस व उन्नतीस फारच मदत झाली आहे.

इंग्रज सरकारचें राज्य, इ० स० १८५७ साला नंतर, या देशावर चिरस्थाई झालें; त्या वेळे पूर्वी आह्मी जवळ जवळ रानटी स्थितींतच होतो. रेलवे नव्हत्या, तार ऑफिसें नव्हतीं, धर्मसहिष्णुता व नियमितपणा याही गोष्टींस आह्मीं पारखेच, स्वराज्य मागण्या इतकीं लायखी आपणांत यावी अशा प्रकारचें शिक्षण देऊन आमच्यांत सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणली, ही गोष्ट आह्मांस केव्हां ही विसरतां येणें शक्य नाहीं.

मुसलमान हे नेहमीं मराठ्याप्रमाणें क्षात्र कर्म करितात. त्यांच्या चाली रीतीही बहुतेक मराठ्याप्रमाणें आहेत. मराठ्यांच्या फौजेंत मोठे मोठे मुसलमान सरदार होते, त्या प्रमाणेंच मुसलमनांच्या फौजेंत मराठे सरदार होते. हल्लीं इंग्रज सरकारचे फौजेंत मराठे व मुसलमान खांद्यास खांदा भिडवून लढले आहेत, व तुर्कस्थान सारख्या मुसलमान राष्ट्रावर जय मिळविला आहे; टर्की, पर्शिया आफगाणिस्थान वगैरे मुसलमान राष्ट्रांना रशियन आस्वलाच्या तावडींतुन आजपर्यंत वांचविण्याचें श्रेय इंग्लंडांसच दिलें पाहिजे. सन १८७७ साली रशियानें कॉन्सटन्टीनोपल घेऊन युरोपांतून तुर्कांची उचलबांगडी करण्याचा घाट घातला होता, व तो बहुतेक यशस्वीही झाला होता. इतक्यांत, इंग्लंडनें धांव घेऊन तुर्कस्थानचा त्या वेळीं बचाव केला. त्याचप्रमाणें सन १८८० सालचे सुमारास खलीपातचें संरक्षणही इंग्लंडानेंच केलें; ही गोष्ट विसरतां कामा नये. हल्लींच्या लढाईत टर्कीचें रक्षण करावें, असें इंग्लडास मूळ पासूनच वाटत होतें. परंतु टर्कीमधील जहाल पक्षानें जर्मनासी संगनमत केल्यामुळें त्यांचेवर मोठ्या नाखुषीनें तरवार उपसणें इंग्लंडास अपरीहार्य झालें.

तुर्कोस ते वैरी असतांना व त्यांचे बरोबर लढण्यांत हिंदुस्थानांतील हिंदुमुसलमानांचें रक्त खर्ची पडलें असतांना त्यांना क्षमा करा असें ह्मणणें ही गोष्ट निराळी आहे. परंतु त्यांना मित्र ह्मणणें हें उचित होईल काय ! औरंगजेब व शिवाजी

यांचें वेळीं उभय पक्षांत हिंदु व मुसलमन सरदार होते. त्यांनी राष्ट्रोन्नतीस विघातक अशा मागण्या कधीं केल्या होत्या काय ? मराठे व मुसलमान यांचा हा परंपरागत धर्म आहे " ज्याचें खावें मीठ त्याशीं राहावें नीट. " आरब, टर्क हे आमचे बंधूच आहेत. त्यानां मूठभर अविचारी चळवळ्यांच्या सांगण्यावरून कडेलोट करून टाकून देणें तरी योग्य होईल काय? तथापी त्यानां दुष्मनांप्रमाणें न वागवितां मित्राप्रमाणें वागविण्यांत येत आहे, हें इंग्रज सरकार त्यांच्या हितानहिताचा विचार किती काळजीपूर्वक करीत आहे या वरून सिद्ध होत आहे. मुसलमानी धर्माच्या पवित्रस्थानांचें रक्षण करण्याची जबाबदारी इंग्लंडनें आपणावर घेतली व तें काम आतां पर्यंत शक्य तितक्या चांगल्या रितीनें पार पाडलें आहे. अशा प्रकारचे इंग्लंड व हिंदुस्थान सरकारचे प्रयत्न सर्वांस माहीत आहेतच. परंतु सर्व गोष्टी आपल्या मनाप्रमाणें होत नाहींत म्हणून हिंदुस्थानच्या मुसलमानांस वाईट वाटणें साहजिक आहे. व त्याबद्दल आमच्या सारख्या त्यांच्या लच्या हितचिंतकांस सहानुभूती फार वाटते. इंग्रज सरकारचे प्रयत्न कसें चालले आहेत हें माहीत असतांही, त्यांच्या प्रामाणिकपणाविषयीं शंका घेऊन, लोकांचीं मनें कलुषित करण्याचें काम कांहीं मुसलमान व हिंदु पुढाऱ्यांनीं चालविलें आहे ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. त्याच्या योगानें बहुजन समाजाचें मनांत सरकारविषयीं अप्रीति

उत्पन्न होते व वाढते हें मुळींच इष्ट नाहीं. हें सर्व ध्यानीं आणूनच आमचे हिज एक्झालटेड हायनेस् निझामसाहेब यांनीं आपल्या प्रजेस या चळवळीपासून अलिप्त राहण्यास बजावलें आहे. त्यांचें उदाहरण ब्रिटीश इंडियांत व इतर ठिकाणीं घेतील अशी मला उमेद आहे. निझाम, अरब व खुद्द टर्क यांचे पेक्षां आपल्या ह्मणण्यास अधिक महत्व द्यावें असें बाकी राहिलेल्या मूटभर मुसलमानांचे अवनतीस पोंहचलेलें, व आपणास पुढारी ह्मणवून घेणारे कसें दाखवूं शकतील; मुसलमानांच्या बहुसंख्यकांनीं जर ही चळवळ केली तर हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांनीं त्यांना मदत करणें योग्य होईल. परंतु मूटभर नाराज लोकांचा पुढाकार घेऊन बेकायदेशीर व बेसनदशीर चळवळींत सामील होऊन अवनतीस कारण होऊं नका. हिंदुमुसलमानांची पूर्वापार चालत आलेली व नुकत्याच महायुद्धांत खांद्याशीं खांदा भिडवून एकदिलानें लढून घट्ट बसलेली सामाजिक घडी पुन्हा विस्कळीत होऊं देऊं नका. सरकार बरोबर असहकारिता करणें ह्मणजेच आपली उन्नति खुंटविणें आहे. व समाजाचा मूळ पायाच ह्मणून काढणें आहे. सरकार सुव्यवस्थित चालेल तेंव्हांच आह्मांला आमची शारीरीक धार्मिक व नैतिक उन्नति करून घेण्यास अवसर मिळेल. या साठीं देशाचें खरें हित ज्यानां करून घेण्याचें आहे तें अशा चळवळीपासून अलिप्त रहातील अशी मला उमेद आहे.

चेम्सफर्ड मॉंटेग्यु रिफार्म्स प्रमाणें आज आह्मांस स्वराज्य मिळत आहे. एवढेंही स्वराज्य कोणत्याही पूर्वींच्या कॉंग्र-

रापासून मिळालें नव्हतें याचा आम्ही दुरुपयोग न करितां सदुपयोग करून आमच्या बादशाहास दाखविलें पाहिजे व ते चिरायु व्हावेत म्हणून परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे. आम्ही योग्य पुढारी नेमून दिले पाहिजेत व रिफार्म यशस्वी करून दाखविल्या पाहिजेत. जर अयोग्य व अविचारी पुढारी नेमिलें तर त्याचें दुष्परिणामास आम्हीच जबाबदार होऊं सरकार होणार नाहीं. हें लक्षांत ठेविलें पाहिजे व आपली सामाजिक व धार्मिक उन्नती करून घेतली पाहिजे. म्हणजें आमच्या मध्यें जे पुष्कळसे जातीभेदामुळें पक्ष झाले आहेत ते मोडले पाहिजेत. सर्वांना समतेनें वागविलें पाहिजे, सर्वांना विद्या-दान दिलें पाहिजे व सर्वांचा धार्मिक हक्क समान समजलें पाहिजे, वगैरे सुधारणा कशा केल्या पाहिजेत याचा विचार परिषदेनें करावा. या कामांत कांहीं ब्राह्मण म्हणविणारेही मदत करतीलच, व अशा आमच्या हितकर्त्यांचे आम्ही उपकारच मानू. ब्राह्मणेतरांनींही ही आजची सभेची संधी न दवडतां आपापसांतील भेद भाव मोडून खऱ्या बंधुप्रेमानें सामाजिक ऐक्य व धार्मिक सहिष्णुता कृतीनें घडवून आणली पाहिजे. अशाप्रकारची ही परिषद नविनच आहे. यांत काळाचा व द्रव्याचा व्यर्थ व्यय झाल्याचा आरोप आपणार न येईल असें आपल्या कृतीनें आपण दाखविलें पाहिजे.

स्वराज्य दानामुळें हिंदुस्थानांत निरनिराळ्या चळवळी सुरूं झाल्या आहेत व होतील, त्यामुळें हिंदुस्थानास

सध्यां केवळ धार्मिक व सामाजिकच नव्हे तर सर्व प्रकारें नाजुक परिस्थिति प्राप्त झाली आहे. आपल्या इलाख्याचें माजी गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन् यांना पांच वर्षांची मुदत अपुरी आहे ह्मणून अशा जोखमीच्या प्रसंगीं योग्य धुरीण असण्याकरितां ती मुदत वाढवून मागितली व त्यांनींही मोठ्या उत्साहानें कठीण प्रसंगांत कामकरून वाढलेल्या मुदतींतही आपली शरीर संपत्ती उत्तम राखून काम केलें व कांहीं लोकांचे जें असें ह्मणणें आहे कीं गव्हर्नरास हिंदुस्थानांत पांच वर्षांपेक्षां जास्त मुदत ठेवल्यास त्यांचे प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो यास हरताळ लाविला. आमच्या इलाख्याचें हल्लींचें अधिपति सर जॉर्ज लॉइड हे तरुण असून व हिंदुस्थानास नवीन असतां व येथील अनुभव नसतां त्यांनी सत्याग्रह व संपा सारख्या मोठ्या कठीण प्रसंगांत शांत राहून इतर इलाख्याप्रमाणें फौजेची मदत न घेतां व रक्तपात न होऊं देतां शांतता राखिली हें त्यांस फारच भूषणावह आहे. व आतां तर त्यांना येथील परिस्थितीचें पूर्णज्ञान झालें आहे. नवीन होणाऱ्या कौन्सीलसमुळें सामाजिक धार्मीक व इतर बाबतींत पुष्कळ फरक होण्याचा संभव आहे व अशा उत्क्रांतीच्या वेळीं आमचे गव्हर्नर आह्मांस आणखी पांच वर्षे लाभल्यास आमचा भाग्योदय झाला असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. गव्हर्नमेंटमध्यें आतां पासूनच त्या दृष्टीनें आपण खटपट केली पाहिजे.

आपलें ब्राह्मणेतरांचें योग्य हक्क मागण्याचे काम पवित्र आहे, भूतदयेनें प्रेरित असल्यानें धार्मिकही आहे. यास ईश्वरी आशीर्वाद खात्रीनें आहे असें समजून आपण सर्व उत्साहानें कामास लागूं या. मी आपणांसर्वांच्या सेवेस तत्पर आहे. परमात्मा आपणास पूर्ण यश लवकरच देई-लच देईल.

## कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेपुढें समारोपादाखल झालेलें भाषण.

( हुबळी ता० २७ जुलई सन १९२० इ. )

काहीं वर्षांपूर्वीं काहीं ब्राह्मण पुढाऱ्यांनीं लोकसेवेचा मोठा आव आणून प्राथमिक शिक्षण सरकारनें दिलें पाहिजे असा ओरडा केला. परंतु पुढें त्यांनीं स्वतः काय केलें? फक्त तोंडाची वाफ दवडली एवढेंच. तेंच दुसरें उदाहरण घ्या. आय. सी. एस्. ची परिक्षा हिंदुस्थानांतही झाली पाहिजे अशी चळवळ त्यांनीं सुरूं केली, ती चालूं ठेविली, व कमिशन नेमून घेतलें. परंतु आमच्या सुदैवानें त्यांना त्यांत यश आलें नाहीं. त्यांतील इंगीत आपण नीट ध्यानांत घ्या. जर प्राथमिक शिक्षणाची खटपट ते मनापासून करते तर, ज्या प्रमाणें आय. सी. एस्. परिक्षे करीतां फंड उभारला, त्या प्रमाणें प्राथमिक शिक्षणकरितां फंड उभारून गांवोगांव मास्तर पाठवून प्राथमिक शिक्षणास खेड्यापाड्यांतून सुरवात करणें अशक्य होते काय? आय. सी. एस्. च्या खटपटीका व कॉलेज स्थापन करण्याला मात्र पैसा भरपूर मिळतो पण प्राथमिक शिक्षणास मात्र या लोकाजवळ पैसा नाहीं. कां? त्याच्या

योगानें ब्राह्मणेतरांस फायदा झाला असतां, हेंच त्यांतील इंगित होय.

अनाथबालिकाश्रमासारख्या संस्था सर्वांच्या पैशावर उभारल्या जातात. परंतु त्यांचें नियमांचें निरीक्षण केल्यास मलई सर्व ब्राह्मणांच्याच पदरीं पडते असें दिसून येईल. त्यांतील एकच नियम घ्या. ज्या जातींत पुनर्विवाहाची चाल नाहीं अशांच्या विधवानां फक्त या आश्रमांत घेण्यांत येईल असा एक नियम आहे. म्हणजे ब्राम्हण व मराठे अशा दोनच जाती राहिल्या. त्यांत मराठ्यांत बहुतेक पडदा आहे. म्हणजे आश्रमाचा फायदा घेणारे फक्त ब्राह्मण राहिले. ब्राह्मणेतरांनीं पैसे मात्र द्यावे, फायद्याची आशा धरूं नये. अशा या ब्राह्मणी काव्यास फसूं नका. आपलें शिक्षण आपल्या हातीं घ्या. व उन्नतीच्या मार्गास झपाट्यानें लागा.

ब्राह्मण व ब्राह्मणेतराच्या वादास आतां कोठें थोडें रूप येऊं लागलें आहे. वर्तमान पत्रांत माझी नालस्ती सुरूं झाली आहे. धाकधमकी दाखवून व सभ्यतेस अनुचित असें माझ्या व माझ्या घरच्या मंडळी विरुद्ध लेख वर्तमानपत्रांत रोज येत आहेत. व या उपरही जर मी भ्यालों नाहीं व अशा चळवळींतून अंग काढून घेतलें नाहीं तर ज्याचा उपयोग त्यांनीं जॅकसन, रँड व जाधवराव यांजवर केला अशा अति नीच भ्याड, व सभ्यतेला न शोभण्या जोग्या त्यांच्या हत्याराची

योजना माझे विरुद्ध केली जाईल अशीही मला भीति घालतात. परंतु असें भ्याड व मनुष्यजातीस लाजविणारें हत्याराचा उपयोग करून त्यांची मनीषा तरी ईश्वर तृप्त करो.

ब्राह्मणेतरांची उन्नती कांहीं द्वेषी व उपद्यापी लोकांस इतकी असह्य होते कीं, त्या उन्नतीच्या मार्गांत अडचणी आणाव्या अशी त्याना इच्छा होते. आपली ब्राम्हणेतर परिषद भरण्याचें ठरल्यावर हुबळी येथील बाजारास आग लागावी व गेल्या रात्रींच श्रीनंदीची मूर्ती भग्न व्हावी! या गोष्टी आमच्या मार्गांत विघ्न आणण्याच्या उद्देशानें तर केल्या नसतील! अशा गोष्टींनीं नाउमेद होण्याचें कारण नाहीं. आम्हीं मुळीच नाउमेद होणार नाहीं. उलट आमचा उत्साह असाच वाढणार आहे. असले प्रयत्न आमच्यांतील बंधुप्रेम वाढवितील यांत मला तरी शंका नाहीं.

इंग्रजी राज्यापासून आमच्या उन्नतीचें द्वार कसें मोकळें झालें हें पुनः पुनः सांगण्याची जरूरी नाहीं. श्रीप्रतापसिंह महाराज छत्रपति हे पेशव्यांचे ताब्यांत असतां लहानपणीं लिहिणें वाचणें शिकण्याचीही त्यांना बंदी होती. तेव्हां त्यांच्या पूज्य व थोरणी आईनें त्यास रात्रीं बारा वाजतां उठवून ब्राह्मणेतर पंतोजीकडून लिहिणें वाचणें शिकविण्याचें काम केलें. पुढें पेशवाई जाऊन इंग्रजाकडे राज्य आल्यावर आपले क्षात्रियत्वाचे हक्क परत मिळविण्याचें व ब्राह्मणांचें फाजील महत्व कमी कर-

ण्याचें काम त्यांनीं हातीं घेतले. तेव्हां ब्राह्मण लोकांनीं चिडून खोटी कारस्थानें रचून, इंग्रज सरकारचा गैरसमज केला व त्यांस गादीवरून दूर करविलें. तशीच भीती मलाही ते आज घालीत आहेत. पण मी ईश्वरी व इंग्रजी न्यायावर व आपल्या सारख्या खऱ्या देशप्रेमी स्नेह्यांच्या सहानुभूतीवर विश्वास ठेवून स्वस्थ मनानें माझें कर्तव्य करीत राहीन.

ब्राह्मण या शब्दाचें लक्षण स्मृति ग्रंथांतून दिलेलें आढळतें. त्या लक्षणा प्रमाणें ब्रह्मकर्म रत असा एक तरी मनुष्य हल्लीं ब्राह्मण ह्मणविणारांत मिळेल कीं काय याची शंका आहे. आतां नुक्तीच सांगितलेली मनुष्यपणाला लाज लावणारीं नीचकृत्यें करणारास ब्राह्मण कसें ह्मणतां येईल? असें असल्यानें हल्लींच्या काळांत खऱ्या ब्राह्मणांच्या अस्तित्वा विषयींच संशय प्रगट केल्यास त्यांत चुकलें कोठें? नुकत्याच झालेले युद्धांत आपला लोप झाला नाहीं असें क्षत्रियांनी सिद्ध केलें आहे. वैश्य तर आपल्या व्यापारानें सधन होऊन उजळ माथ्यानें फिरत आहेत. शूद्र बिचारे रात्रंदिवस सेवा करून आपली उपजीविका करीत आहेत. परंतु ब्राह्मणांनीं मात्र कर्मलोप केल्यामुळें जुन्या वर्ण व्यवस्थे प्रमाणें आपलें अस्तित्व आजीबात गमावलें आहे असें कट्या वर्णाश्रमाभिमान्यास देखील कबूल करावें लागेल.

आतां आम्ही काय करावें हें थोडक्यांत सांगतो. येथें भरल्या तशा ब्राह्मणेतरांच्या सभा जागोजागीं भरल्या

पाहिजेत. ब्राम्हणेतरांची चळवळ यशस्वीपणानें कशी चाल-वावी हें आपणास मद्रासकडून शिकलें पाहिजे. यासाठीं मद्रासचे वक्ते आणूया व पुण्या मुंबईस, त्यांनीं केलेल्या कामाची जाणीव करून देऊंया. व ते येतील अशी माझी खात्री आहे. ब्राम्हणेतरांची परिषद भरवा. पुणें मुंबई वगैरे ठिकाणीं लवकरच भरवा. मुंबई पुणें येथील ब्राम्ह-णेतर या चळवळीच्या चिकाटींत मद्रासपेक्षां फारच मागें आहेत. तेथील ब्राम्हणेतरांचे पुढाऱ्यांचे शिक्षणापुढें आमचे पुढारी म्हणजे केवळ मुलाप्रमाणें शोभतील.

प्यारे बंधु हो, एक व्हा, व जोराचा यत्न करा. व बौद्धिक गुलामगिरींतून सुटून जा! स्वतंत्रतेकरितां जीव द्या, काय वाटेल तें करा. परंतु तुम्हाला जे पशुप्रमाणें वागवितात त्यांचे पासून स्वतंत्रता मिळवा.

बारीकसारीक भेद विसरून एक व्हा व जोराचा यत्न करा. परमेश्वराचें घरीं जें रुजूं आहे व शुभ आहे तेंच कृत्य करा; अन्यायानें वागूं नका.

मद्रासच्या ब्राम्हणेतर लोकांच्या परिसानें आपणही सोनें बनूंया. सामाजिक सुधारणामध्यें धैर्य व स्थैर्य दाखविलें नाहीं तर राजकीय बाबतींत तरी आम्ही काय करूं शकणार? आणि राजकीय बाबतींत आमचे अंगीं स्थैर्य नसेल तर—तर आमच्या राजनिष्ठेची काय किंमत?

यासाठीं सामाजिक व धार्मिक सुधारणे मध्यें मनोधैर्य धरा आणि एक राष्ट्र करा. म्हणजे तुमच्या राजकीय सुधारणेस जोर येईल व मग तुमची राजनिष्ठा उज्वल होईल.

ब्राम्हण तुम्हास भिवावितील. तुमची व तुमच्या कुटुंबातील माणसांची निंदा करतील. त्यांचा प्रतिकार केला पाहिजे. मी नागपूरच्या भाषणांत सांगितलें आहे कीं, एखाद्या विविक्षित जातीचे लोक तुम्हांला मदत करतो असें म्हणून पुढें येतील, त्यांच्यावर विश्वास ठेवूं नका व स्वस्थ बसूं नका. " जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला. " हे ब्राम्हणेतर पंथूनी, पुष्कळ ब्राम्हण लोक साबपणाचें ढोंग करून, तुम्हांस मदत करितो म्हणून पुढें येतील. परंतु त्यांच्यावर बिलकूल विश्वास ठेवूं नका.

मीं खामगांव येथिल मराठा शिक्षण परिषदेंत जातवार प्रतिनिधींची सवलत फक्त दहा वर्षां पुरतीच मागितली होती. ती मिळाली नाहीं. तरी नाउमेद होऊं नका. कम्युनल रिप्रेझेन्टेशनचे दान आतां आम्हांस नकोच आहे. We will first deserve and then desire. कम्युनल रिप्रेझेन्टेशन दिलें असतें तर आम्ही थोडे दिवसांत लवकर पात्र झालों असतो. अमच्या ब्राम्हण बंधु बरोबर जोरानें झगडून आमचे हक्क मिळविण्याचें कामीं कष्ट सोसून आम्ही चिकाटीनें प्रयत्न केले पाहिजेत. पांडवांतील भीमसेन

याची पाठ जमीनीस लागली म्हणजे त्यास शंभर हत्तींचें बळ येई असें सांगतात. यांतील तात्पर्य तेवढें आपण घेऊंया. जितक्या जोरानें आपणास प्रतिकार होईल, जितक्या अधिक अडचणी आपल्या मार्गांत येतील, तितक्या अधिक उत्साहानें, अधिक जोरानें, व अधिक ईर्षेनें आपण आपल्या कार्यास लागूंया व यश मिळवूं या.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८५०